म. ग्रं. सं. ठाणें
विषय १८५
सं. क्र. २८१

REFBK-0015570
REFBK-0015

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७३९२९ ५।७।७१
१९७१ ५।३।७१

# प्राचीन आख्यानक कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रा. क्र. ९५५६०
शाखा

संपादक

प्रा. गजमल माळी, एम्. ए.

मराठी विभाग प्रमुख, देवगिरी कॉलेज, औरंगाबाद

REFBK-0015570
REFBK-0015570

मूल्य रु. ३ = ००

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : जुलै १९६६

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
"तपश्चर्या"
व्हीनस प्रकाशन
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ : पुणे २

श्री. दादासाहेब पोहनेरकर

आणि

प्रा. भालचंद्र कहाळेकर

यांस

# आभार

– विद्यापीठीय अभ्यासक्रमातून आख्यान या वाङ्मयीन रचना प्रकाराचा अभ्यास होऊ लागला आहे. हा अभ्यासक्रम लक्षात घेऊन, मराठी आख्यानक कवितेच्या परंपरेचा विद्यार्थिवर्गाला परिचय व्हावा आणि आख्यानाचे स्वरूप स्पष्ट व्हावे, या हेतूने पुस्तक तयार करण्याचा हा विनम्र प्रयत्न आहे. प्राचीन आख्यानक कवींचे वेचे निवडताना आख्यान – विषयात विविधता यावी ही दृष्टी ठेविली आहे.

– या पुस्तकाचे हस्तलिखित तयार करीत असताना अनेकदा प्रा. म. ना. अदवंत यांचेशी मी चर्चा केली आहे. डॉ. वि. म. कुलकर्णी आणि प्रा. नरहर कुरुंदकर यांनी प्रास्ताविक वाचून काही सूचना केल्या, त्यांचा मी स्वीकार केला आहे. या तिघांचाही मी आभारी आहे. माझे मित्र प्रा. रा. ग. जाधव व प्रा. डागे यांच्या सहकार्याचाही उल्लेख करावयास हवा. श्री. स. कृ. पाध्ये यांनी 'व्हीनस प्रकाशना' करिता याही पुस्तकाचा स्वीकार केला, याचा मला आनंद होतो.

टिळक पुण्यतिथी<br>
१ ऑगस्ट १९६६<br>
अंगुरीबाग, औरंगाबाद

गजमल माळी

# अभ्यासाची साधने

१. महाराष्ट्र सारस्वत : वि. ल. भावे, डॉ. शं. गो. तुळपुळे
२. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : प्रा. ह. श्री. शेणोलीकर
३. प्राचीन मराठी आख्यानक कविता : प्र. वा. बापट
४. लोकसाहित्याची रूपरेखा : दुर्गा भागवत
५. मुक्तमयूरांची भारते : डॉ. ना. गो. नांदापूरकर
६. मोरोपंतांचे विराटपर्व : प्रा. म. ना. अदवंत
७. वैदिक संस्कृतीचा विकास : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
८. महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण : श्री. व्यं. केतकर
९. प्राचीन महाराष्ट्र : श्री. व्यं. केतकर
१०. वैदिक निबंध : ना. गो. चापेकर
११. नाथांचा भागवतधर्म : डॉ. श्रीधरराव कुलकर्णी
१२. महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य : बा. रं. सुंठणकर
१३. प्राचीन मराठी गीतभांडार ( प्रस्ता. ) : डॉ. ना. ग. जोशी
१४. राज्यव्यवहार कोश : रा. गो. काटे
१५. पंडित कवी : डॉ. के. ना. वाटवे
१६. संत, पंत व तंत : प्रा. श्री. म. माटे
१७. एकनाथदर्शन
१८. पुष्पांजलि : प्रा. द. सी. पंगु
१९. प्राचीन मराठी कविपंचक : प्रा. द. सी. पंगु
२०. अर्वाचीन मराठीतील खंडकाव्यें : डॉ. हरिभाऊ तोडमल
२१. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुति : प्रा. गं. बा. सरदार

२२. मोरोपंती आख्यानें : प्रा. भगवंत देशमुख
२३. चंद्रहास्य कथा ( प्रस्ता. ) डॉ. ना. गो. नांदापूरकर
२४. महाराष्ट्र धर्माचे प्रणेते : आकाशवाणीवरील भाषणांचा संग्रह.
२५. मराठी साहित्याची रूपरेखा : डॉ. वि. पां. दांडेकर
२६. प्राचीन पंडिती काव्य : डॉ. के. ना. वाटवे
२७. वैदिक इंडेक्स : मॅक्समुलर
२८. संस्कृत डिक्शनरी : आपटे
२९. पाली व मागधी साहित्याचा इतिहास

* * *

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रस्तावना | | १–२६ |
| १. कपोत–कपोती आख्यान | एकनाथ | २७–३२ |
| २. शकुंतलेचा राजसभा प्रवेश | मुक्तेश्वर | ३३–३७ |
| ३. व्याधाख्यान | वामन पंडित | ३८–४१ |
| ४. हंसदूत | रघुनाथ पंडित | ४२–४७ |
| ५. अभिमन्यु वध | श्रीधर | ४८–५९ |
| ६. सावित्री आख्यान | मोरोपंत | ६०–६७ |
| ७. टीपा | | ६९–१०४ |


* *

# प्रास्ताविक

आजच्या जीवनात अनंत घटना घडतात, तशा त्या प्राचीन काळातही घडत होत्या. या घटनांचा परिणाम मानवी जीवनावर होऊन प्रवाही जीवन बदलत होते. मानवी जीवनात घडून येणारा हा बदल कधी मनःपूत, तर कधी नैसर्गिक अपरिहार्यतेमुळे होत होता. या घटनांचा परिणाम जसा या जीवनावर होत होता, तशी मानवी मनावरही त्यांची प्रतिक्रिया उमटत होती. मानवी मनात भावनांची अनंत स्पंदने उठत होती. घटनांविषयी माणसे आज जशी बोलतात, कारणमीमांसा करतात, तशी प्राचीन काळातील माणसेही बोलत होती. परंतु सूक्ष्म निरीक्षण करणे, पाहिलेल्या, अनुभवलेल्या घटनांचे स्मरण ठेवणे, आणि घटनांचा कोणताही अंश नष्ट न होऊ देता त्यांना शब्दांतून सजीव करणे या क्रिया उत्तरकाळातील होत. अनुभूती शब्दातून निबद्ध करण्याच्या क्रियेने व स्मरणाने सर्व घटनांना नंतरच्या पिढीच्या स्वाधीन करणे आज आपल्याला शक्य झाले आहे. वैयक्तिक जीवनातील अनुभूतींना कलारूप देऊन, त्यांना अक्षरत्व प्राप्त करून देणे आज कलावंताला अशक्य वाटत नाही. प्राथमिक अवस्थेत असलेला मानव घटनांनी उत्स्फूर्त होत असे. घटनांचे अलिप्त राहून निरीक्षण करणे, स्मरण करणे व पुन्हा त्यांना शब्दांकित करणे त्यास शक्य नसे. ज्या अनुभवापासून तो दूर रहात असे त्याची पुनर्निर्मिती करणे त्यास अशक्य वाटत असे. काही घटनांची जाणीवपूर्वक नोंद घेण्याची गरज जशी आज आपल्याला वाटते तशी त्यास कदाचित वाटत नसावी. या घटनांचे मानवी जीवनातील अस्तित्व मात्र परिणामाच्या रूपाने उरत असे. जीवनाच्या प्रवाहालाच वेगळे वळण लावणाऱ्या काही घटनांचा परिणाम सहजासहजी

बुजवून टाकणे मानवाला शक्यही नव्हते. या परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या घटनांचे स्मरण व्यक्तिजीवनात उरले नव्हते, हे खरे असले, तरी समूह-जीवनातून त्यांचे विस्मरणही झाले नव्हते. लोकस्मरणात या घटना जिवंत राहिल्या. कालान्तराने त्यातील काही भाग स्मृतिशेष झाला. अनंत घटनांचा परस्पर संबंध दाखविणारी कारणपरंपरा नष्ट झाली.(ज्या घटनांमधील कारणपरंपरेचे सूत्र हाती लागले नाही, त्या घटनांचा संबंध दाखविणारी नवी कल्पित कारणपरंपरा निर्माण करण्यात आली व त्यातूनच दैवतकथांचा (Myths) जन्म झाला. दैवतकथांची कल्पित पुटे बाजूस सारल्यास मानवी मनाच्या विकासाच्या खुणा, दिशा आपल्याला शोधता येतील. दैवतकथांच्या मागे दडलेली ही वास्तवसृष्टी म्हणजे त्या त्या काळातील मानवी जीवनच होय.)

दैवतकथांची निर्मिती आणखीही एका दिशेने झाली. विकासोन्मुख असलेले मानवी मन सभोवताली घडलेल्या घटनांची नोंद घेऊ लागले; त्यांचा अर्थ शोधू लागले. जवळपास पसरलेल्या सृष्टिक्रमाचे निरीक्षण करून मानवी जीवनाचा संबंध निसर्गातील घटनांशी बांधू लागले. उषेचे दर्शन त्यांच्या कुतूहलाचा विषय बनले. मानवी स्वरूपातच निसर्गातील या घटनांकडे त्याने पाहिले. सूर्य, चंद्र, वायू, अग्नी इत्यादींना अर्थ देताना त्यांना मानवी देह आहे अशीच कल्पना या मनाने केली. परंतु आपल्यापेक्षा सूर्य, चंद्र, वायू, अग्नी इत्यादींमध्ये अधिक शक्ती आहे याची जाणीव त्यास झाली, व या शक्तीची पूजा बांधली तर आपले जीवन सुरक्षित राहू शकेल असे त्यास वाटले. या जाणीवेतून सूक्तांची निर्मिती झाली. ज्या ज्या निसर्गदृश्याचे मंगल दर्शन त्यास झाले त्याविषयीची आपुलकी त्यास वाटू लागली. रौद्र दर्शन देणाऱ्या दृश्याविषयी भीती व्यक्त झाली. म्हणून प्राचीन काळात निर्माण झालेल्या वेद व पुराण वाङ्मयातील दैवतकथांतून भारतीयांच्या जिज्ञासेचा विकास बघावयास मिळतो. जीवनाविषयी त्या काळात त्यांना वाटणाऱ्या आकर्षणाचे काही विशेष लक्षात येतात. प्राचीन काळातील भारतीयांच्या कुतूहलाच्या इतिहासाचा आलेख दैवतकथांच्या अभ्यासातून मांडता येईल.

(अनंत घटनांविषयी वाटणाऱ्या कुतूहलातून दैवतकथांची निर्मिती झाली. ही कुतूहलाची भावना परिष्कृत तथा अपरिष्कृत मानवात सारखीच असल्याने

कथेची ओढ सार्वत्रिक व सार्वकालिक असल्याचे लक्षात आले. लोकभाषेत असंख्य अलिखित कथा निर्माण झाल्या. प्राचीन काळातच या लोककथांचे निवेदन करणारी घराणी निर्माण झाली असावीत. वैदिक काळात ही घराणी अस्तित्वात असावी असे 'आख्यानविद'सारख्या शब्दावरून वाटते. सूत, मागध, चारण व बंदी या घराण्यांनी पूर्वापार चालत आलेल्या कथांचा सांभाळ केला. या अलिखित लोककथांचे नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणावर संस्कृतीकरण करण्यात येऊन त्यांचा समावेश वैदिक वाङ्मय व पौराणिक वाङ्मय यात झाला. प्राचीन काळी राजाच्या दरबारी कथक असत. आत्रेय ब्राह्मण्यकात आख्यानविद शब्द आला आहे, त्याचा अर्थ कथा सांगणारे असा आहे. लोकांनी परंपरेने सांभाळलेल्या कथांचे निवेदन करणे हा या आख्यानविदांचा किंवा कथकांचा व्यवसाय होता. पौराणिक काळात कथाकारांना व गाथाकारांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आणि यज्ञविधीत त्यांचा याज्ञिकांनी समावेश करून घेतला. होता, अध्वर्यू, उद्गाता व ब्रह्मा पुरोहितांच्या या चार वर्गांपैकी पहिल्या तीन वर्गांनी संहितातील मंत्रपरंपरा सांभाळली. ही मंत्रपरंपरा अत्यंत प्राचीन आहे. या मंत्रपरंपरेइतकीच जुनी असलेली यज्ञात समाविष्ट झालेली कथकांची सूतपरंपरा आहे. संहितांतून सूतांचे उल्लेख आढळतात. ब्राह्मणातून यज्ञसंस्थेत मंत्रपरंपरेचा प्रभाव असल्याचे जसे दिसते, त्याचप्रमाणे या सूत्रपरंपरेचाही प्रभाव असल्याचे स्पष्ट आढळते. यज्ञसंस्थेत कथा निवेदन करणे हे यज्ञाचे प्रमुख अंग नव्हते, तरी संहितांतील परंपरेचा आधार असलेल्या कथांचे निवेदन यज्ञप्रसंगी होत असे. रोमहर्षक घटनांनी भरलेल्या या पारंपारिक विविध कथांच्या श्रुतिगत संकलनातून नंतरच्या काळात पुराणांची व महाकाव्यांची निर्मिती झाली. पुराणांची निर्मिती ही सामान्य जनांना वैदिक धर्माचे व्यावहारिक स्वरूप समजावून सांगण्याच्या प्रेरणेतून झालेली असल्याने प्राचीन काळापासून चालत आलेल्या कथांची अतिशयोक्त वर्णने त्यातून आलेली आहेत. पुराणातील कथांना परंपरेचा आधार आहे. यातील अद्भुतता व चमत्कार बाजूस सारल्यास कथेमागील इतिहासाचा दडलेला वास्तव भाग सापडू शकेल. सारांश, या काळात कथांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. यज्ञात त्यांचे निवेदन घडू लागले. यज्ञप्रसंगी कथा ऐकण्यासाठी सर्व थरांतील

लोक एकत्र येत असत, असा उल्लेख शतपथ ब्राह्मणात मिळतो. याचा अर्थच असा की, वेदांच्या व पुराणांच्या काळात समाजातील सर्व घटकांपर्यंत या कथांचा ओघ पोचला होता.

प्राचीन भारतीय वाङ्मयातून विविध कथा विखुरलेल्या आहेत. ऋग्वेद संहितांतील काही सूक्तांतून कथांचे त्रोटक उल्लेख येतात, परंतु संपूर्ण कथा तेथे येत नाही. त्या कथा लक्षात घेतल्यावाचून मात्र सूक्तांचा अर्थ उकलत नाही. (ऋग्वेदात तीस आख्याने आल्याचे उल्लेख आढळतात. भारतीय परंपरेचे सारे विशेष प्रथम या ऋग्वेदातील आख्यानातूनच प्रगटले. ऋग्वेदातील बहुतेक सूक्तांचा हेतू देवतांची स्तुती हा आहे.) इंद्र हा या काळातील प्रमुख देव. दस्यू, दानू, रोहिण, वृत्र इत्यादींचे हनन करणारा हा आर्यप्रिय देव आहे. सोमरसाचे पान करून तो युद्धावर जातो व आपल्या उपासकाला विजयी करतो. (ऋग्वेदातील वरुण हा अहिंसक व शान्तताप्रिय देव आहे. रुद्र देवाविषयीच्या सूक्तांतून या देवतेविषयीचा भीतियुक्त आदर व्यक्त झाला आहे. मर्यादित मानवी जीवन दिव्य शक्तीला नेहमीच शरण जाते. प्राकृतिक दिव्य शक्तीत मानवी स्वरूपाचे चित्र कल्पून या काळातील देवतांची निर्मिती झाली. नंतरच्या काळात निर्माण झालेला ब्रह्मदेव अशरीरी आहे, पण या देवता सदेही आहेत. मानवी भावनांचा आरोपही या देवतांवर केलेला आहे. मानवी शक्तीपेक्षा जीवनाचा विकास व विनाश करणारी वेगळी दिव्य शक्ती आहे यावर ऋग्वेद काळातील मानवांचा विश्वास होता. या देवतांना शरीररूप देऊन त्यातून अनेक घटनांची निर्मिती या काळातील सूक्तकारांनी कल्पिली. सूक्तांमधून आलेले कथांचे त्रोटक उल्लेख प्रचंड वास्तव घटनांचे कदाचित अवशेषही असतील.) इंद्राने केलेली युद्धे व त्याला प्राप्त झालेले विजय हे त्या काळातील वास्तव जीवनाशी संबंध दाखविणारे उल्लेख असावेत. कथारूपाने या घटना आज उरलेल्या असाव्यात. शौनकाने अशा कथांचे पहिले संकलन केलेले दिसते. या काळातील सर्वच कथा बृहद्देवतेत संकलित झालेल्या नाहीत. नंतरच्या काळात अनेक कथा स्मरणातून गळून गेल्या असाव्यात.

संहितांतील देवतांचे व कथांचे स्वरूप स्वाभाविक अवस्थेतील वाटते. एक प्रकारची नैसर्गिकता या कथांच्या मागे उभी आहे. ब्राह्मणे ज्या काळात

निर्माण झाली त्या वेळी मात्र या देवतांच्या व कथांच्या स्वरूपात अंतर पडत गेले. यज्ञक्रियेचे व मंत्राचे टीकात्मक विवरण ब्राह्मण ग्रंथातून झाले. उपास्य व उपासक यांचे या काळातील संबंध यान्त्रिक स्वरूपात वाढल्याने या काळातील प्रवृत्ती व्यावहारिक झाल्या. सूक्तातून व्यक्त झालेल्या आदर्श जीवनमूल्यांना प्रत्यक्ष व्यवहारात स्थान मिळावे, त्यांची जोपासना समाजाकडून व्हावी व ती मूल्ये समाजाच्या सर्व घटकांपर्यंत जाऊन पोहोचावीत याकरिता कथामाध्यमाचा जाणीवपूर्वक वापर होऊ लागला. (कथेची ओढ सार्वत्रिक असल्याचे लक्षात येताच धर्मतत्त्वांच्या प्रसाराकरिता कथांचा उपयोग होऊ लागला. संहितांतून साठलेल्या कथांच्या भोवती उत्तरकाळात धार्मिक वलय निर्माण झाले.) बौद्ध-जैनांनी तर धर्मतत्त्वांच्या प्रसाराकरिता कथेचे प्रभावी माध्यम वापरले. (पुराणातील व महाकाव्यातील परंपरेवर आधारित असलेल्या कथांची पुनर्निर्मिती जेव्हा प्राचीन मराठी आख्यानक कवींनी केली तेव्हा भाविक दृष्टीने त्यांनी या कथाविश्वाकडे पाहिले. प्राचीन आख्यान-कवितेच्या मागे भाविक दृष्टी उभी आहे याची पार्श्वभूमी ही अशी आहे.)

— २ —

कथेकडे पाहण्याची भारतीय मनाची अशी भाविक दृष्टी होती, व त्यामुळेच पुढील काळात या कथांच्या भोवती धार्मिक वलय निर्माण झाले. वैदिक वाङ्मय, बौद्धांचे त्रिपिटक व जैनांचे आगम साहित्य व नंतरचे टीका-वाङ्मय यांतून धर्मातील आचार–विचारांच्या स्पष्टीकरणाकरिता विविध कथांची अभिव्यक्ती झाली. याच वेळी कथा-सरित्सागर, पंचतंत्र, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी यांसारखी संकलने होत होती. अद्‌भुत कथांना वाङ्मयीन मूल्ये प्राप्त करून देण्याचा प्रयत्नही या काळात झालेला दिसतो. प्राचीन काळातील कथांचे तीन प्रवाह असल्याचे स्पष्ट दिसते. पहिल्या प्रवाहात कथांच्या कलात्मक मूल्यांची अनभिज्ञता दिसते, तर धर्माचे एक आवश्यक अंग म्हणूनच त्यांचा विकास झालेला आढळतो. यज्ञ वा धार्मिक विधिप्रसंगी सांगितलेल्या कथांतून दिव्यत्वाची व आदर्श जीवनमूल्याची प्रतीती आणून देणे हेच कथकाचे उद्दिष्ट असे. परिप्लवाख्याने यज्ञप्रसंगी सांगण्याची प्रथा शतपथ

ब्राह्मणात वर्णिली आहे. त्या वेळी अध्वर्यू होत्यास "भूतानि आचक्ष्व। भूतेषु इयं यजमानन् अध्यूह" (इतिहास सांग, इतिहासामध्ये या यजमानाला रमव, असा आदेश देतो.) येथे इतिहास याचा अर्थ उदात्त कथा असा आहे. यज्ञप्रसंगी निवेदिलेल्या कथांतून आदर्श व उदात्त जीवनाचेच चित्रण झालेले आपल्याला दिसते. प्राचीन साहित्यातून उदात्त व आदर्श कथा आख्यानांचे विषय झालेल्या दिसतात.

संस्कृतातील विदग्ध वाङ्मयात कुठेही आख्यान शब्दाची व्याख्या केलेली नाही. ऋग्वेदसंहितांत संवादरूपात काही सूक्ते आहेत. शक्य तितक्या संक्षिप्त स्वरूपात विचार व्यक्त करण्याचे सूक्तांचे स्वरूप असल्याने, या संवादांतून कथांचे अस्पष्ट धागे आढळतात. प्रा. आल्डनबर्ग यांच्या मते या अर्धनाटकीय संवादांतूनच आख्यानांचा प्रथम परिचय होऊ लागतो. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळात ९५ व्या सूक्तात एकूण १८ ऋचा आहेत. त्यांत पुरुरवा व उर्वशी यांचा संवाद वर्णिला आहे. ऋग्वेदाच्या याच मंडलात यम व यमी यांचा संवाद आला आहे. यमी आपल्या भावाला मनुष्यजातीचे बीज नष्ट होऊ नये म्हणून शरीरसंबंधाकरिता आवाहन करते. यम आपल्या कोमल शब्दांनी सगोत्र संबंधाची अवैधिकता स्पष्ट करतो. यमीची भावना अधिकाधिक उत्कट होऊ लागते. यम निर्धारपूर्वक तिच्या मतांचे निराकरण करतो, तेव्हा ती त्याच्यावर पुरुषत्वहीनतेचा आरोप करते (१०-१-१३). शेवटी यम परपुरुषाशी शरीरसंबंध येऊ दे असा आदेश देतो व येथे हा संवाद संपतो. याच मंडलाच्या ९५ व्या सूक्तात सूर्याच्या विवाहाचे संवादरूपाने वर्णन आले आहे. सूर्याची मुलगी सूर्या (उषा) हिचा पाणिग्रहणसंस्कार, दोघे अश्विनीकुमार तिच्याशी लग्न करण्यास उत्सुक असताही, सोमाबरोबर होतो. पुढे विवाहप्रसंगी करावयाच्या प्रार्थना आहेत. अगस्त्य व लोपामुद्रा, गृत्समद, वसिष्ठ व विश्वामित्र, सोमाचे अवतरण, राजा सुदास, नहुष, अपाला, नचिकेता इत्यादी संवादसूत्रांतूनच पुढे कथात्मक आख्यान आकारास आले असावे. ऋग्वेदातून आलेल्या या कथाप्रसंगांना अथर्ववेदादी ग्रंथांतून पुराणसंहिता असे म्हटले आहे. आख्यान ह्या शब्दाचे अस्तित्व प्रथम ब्राह्मण वाङ्मयात आढळते. परंतु तेथेही या शब्दाचे स्पष्टीकरण आलेले नाही. ब्राह्मणात राजसूय यज्ञाच्या प्रसंगी होता शुनःशेपाचे

आख्यान सांगतो, असा उल्लेख आहे ( ७-१८-१० ). त्यापूर्वी ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलात सूक्त २४ वे यात शुनःशेपाचा उल्लेख आहे, व आत्रेय ब्राह्मण्यकात हे आख्यान आले आहे. शुनःशेप आख्यानाची कथा अशी आहे.

राजा हरिश्चंद्र यास १०० बायका होत्या, परंतु तो निपुत्रिक होता. एकदा राजाने पुत्रप्राप्तीकरिता नारदास मार्ग विचारला. नारदाने वरुणास शरण जाण्यास सांगितले. मला पुत्र झाल्यास तो मी तुला बळी देईन अशी राजाने वरुणाची प्रार्थना केली व वरुण प्रसन्न झाला. राजास मुलगा झाला. त्याचे नाव रोहित.

वरुणाने मुलाची मागणी केली. दर वेळीं राजा काही तरी निमित्त सांगून वेळ मारून नेत असे. रोहित मोठा झाला. वरुणाची मागणी चालू होती. एके दिवशी राजाने सर्व हकिगत रोहितास सांगितली. रोहित धनुष्य घेऊन रात्रीच घरातून पळून गेला. वरुणाने हरिश्चंद्राला ग्रासले तेव्हा त्यास उदर रोग झाला. त्या वेळी रोहित घरी आला, पण इंद्राने त्यास घरात येऊ दिले नाही. अशी सात वर्षे गेली. एकदा तो अरण्यात उपवाशी फिरत असता अजीगर्त ऋषीच्या आश्रमाजवळ आला. अजीगर्तास शुनःपुच्छ, शुनःशेप व शुनोलांगूल असे तिघे पुत्र होते. रोहिताने १०० गाई देऊन मधल्या शुनःशेपास विकत घेतले. शुनःशेपाला घेऊन रोहित घरी आला व राजाला त्याने साऱ्या घटना सांगितल्या. हरिश्चंद्राने वरुणाची प्रार्थना केली व रोहिताऐवजी शुनःशेपाचा स्वीकार करण्यास विनवले. वरुणाने ते मान्य केले. शुनःशेपास घेऊन यज्ञभूमीकडे गेले. तेथे त्यास यूपास बांधण्यास कोणीच तयार होईना. शंभर गाई घेऊन अजीगर्त तयार झाला. अजीगर्ताने शुनःशेपास मारण्याकरिता पुन्हा शंभर गाई घेतल्या. या वेळी शुनःशेपाने देवाची प्रार्थना केली. प्रजापतीची त्याने प्रथम प्रार्थना केली. त्या देवतेने सांगावे अमक्या देवतेची प्रार्थना कर... शेवटी उषेची प्रार्थना त्याने आरंभली. त्या वेळी त्याचे पाश हळूहळू सुटू लागले. राजा हरिश्चंद्राचे पोटही ओसरू लागले.

नंतर विश्वामित्राने शुनःशेपाच्या हातून यज्ञ पुरा केला, व त्यास दत्तक घेतले. विश्वामित्राने त्याचे नाव देवांनी दिला म्हणून देवरात असे ठेविले.

परमेश्वराच्या वरदायी सामर्थ्याची जाणीव निर्माण करण्याचे या कथा-भागामागील उद्दिष्ट स्पष्ट आहे. ऋग्वेदातून अंशरूपाने आलेल्या किंवा बृहद्देवता, निरुक्त, नीतिमंजरी वा सायणभाष्य यांतून प्रसंगरूपाने आलेल्या आख्यानांच्यामागील प्रेरणाही मानवसमाजाच्या कल्याणाचीच आहे. यम–यमी संवाद काय किंवा शुनःशेपाचे आख्यान काय, त्यांच्यामागे ईश्वर-विषयक आस्तिक्यबुद्धी व मानवी जीवनविषयक दृढ शुभंकर भावना असल्याचे दिसून येते. आख्यानाच्या निर्मितीमागील ही प्रेरणा लक्षात घेऊनच,

" स्वाध्यायं श्रावयेत्पित्र्ये धर्मशास्त्राणि चैवहि ।
आख्यातानीतिहासांश्च पुराणानि खिलानिच । "

( मनुस्मृती ३-२३२ )

मनूने श्राद्धप्रसंगी ही आख्याने ऐकावी असे म्हटले आहे.

(प्राचीन साहित्यातील आख्यानांच्या विषयासंबंधी ही ठळक लक्षणे लक्षात येत असली तरी काव्यप्रकाराचे नेमके स्वरूप स्पष्ट होत नाही. प्राचीन साहित्यातून कथा, आख्यान, आख्यायिका, इतिहास, पुराण, अर्थवाद, संलाप, व्याख्यान, अनुव्याख्यान, अन्वाख्यान इत्यादी शब्द आढळतात. या साऱ्याच शब्दांचा वापर नेमका कोणत्या काव्यप्रकाराकरिता होत असे याचे निश्चित स्वरूप स्पष्ट होत नाही. कथा, इतिहास, पुराण व आख्यान हे शब्द समानार्थी महाभारतात येतात.) छांदोग्य उपनिषदात कथा या शब्दाचा उपयोग दार्शनिक वादविवाद या अर्थी केला आहे. (आख्यान हा शब्द ब्राह्मण वाङ्मयात धार्मिक कथात्मक गीतप्रकार या अर्थी आला आहे.)

अस्याख्यानस्य विषये पुराणं वर्तते द्विजाः
अंतरिक्षस्य विषये प्रजा इव चतुर्विधाः ।

( चित्रशाळाप्रत, आदिपर्व २, ३८६ )

(आख्यान व पुराण यांचा संबंध महाभारतात असा स्पष्ट केला आहे. आख्यानातून पुराणातील विषयांचा आविष्कार झाला आहे ही ज्ञानदेवाचीही भूमिका आहे.) भारताच्या आदिपर्वातच आख्यान, उपाख्यान, कथा, पुराण, इतिहास हे शब्द समानार्थी आले आहेत. (पतंजलीने आख्यान व आख्यायिका

असे दोन शब्द कथासाहित्यासाठी वापरले असून, अति पुरातन व पूज्य कथांना तो आख्यान म्हणतो. आख्यायिका हा शब्द तैत्तिरीय आरण्यकात एकदाच येतो ( १, ६, ३. ) तेथे त्याचा नेमका अर्थ कोणता आहे हे स्पष्ट नाही. अलंकारशास्त्रकर्त्यांनी आख्यायिका आणि कथा यांना वेगळे मानले आहे. 'आख्यायिका कथावत् स्यात् कवेर्वंशादिकीर्तनम् । अस्यामन्यकवीनां च वृत्तं गद्यं क्वचित् क्वचित् ।' ( आपटे डिक्शनरी पृ. ३१२ ) असे आख्यायिकेचे गद्यपद्य स्वरूप स्पष्ट केले आहे. अग्निपुराणात कथेचे पाच प्रकार सांगितले आहेत. त्यांपैकी एक आख्यायिका हाही प्रकार आहे. (आख्यायिका कथा खण्डकथा परिकथा तथा । कथा निकेति मन्यन्ते गद्यकाव्येच पंचधा । १, १२ ) आणि राज्यकर्त्यांच्या वंशाची विस्तारपूर्वक प्रशंसा करणे हे आख्यायिकेचे प्रमुख अंग मानलें आहे. ती गद्यपद्यमिश्रित असते असे तिच्या स्वरूपाविषयी स्पष्टीकरण अग्निपुराणातून आले आहे. ज्ञात किंवा सत्य विषयाचे स्पष्टीकरण करणारी ती आख्यायिका होय असे सांगून, हर्षचरित्र हे आख्यायिकेचे उदाहरण दिले आहे.

इतिहास व पुराण हे दोन शब्द कथा या अर्थी प्राचीन वाङ्मयात आढळतात. अथर्ववेदात या शब्दांचा पहिल्यांदा वापर झालेला आढळतो. ( १५, ६, ४ ). शतपथ ब्राह्मण, जैमिनीय, बृहदारण्यक आणि छांदोग्य उपनिषदातून अनेकदा इतिहास हा शब्द येतो. छांदोग्य उपनिषदातून पुराणासह इतिहास म्हणजे पाचवा वेद असे म्हटले आहे. ( आपटे डिक्शनरी पृ. ५२६ ). श्रौतसूत्रात इतिहास व पुराण यांना स्वतंत्र वेद मानले आहे. (१६.२१. २. २७). गोपथ ब्राह्मणात इतिहासवेद, पुराणवेद असे शब्द आढळतात ( १. १० ). शतपथ ब्राह्मण्यकात इतिहास व पुराण यांना वेदासमान मानले आहे. तेथे अन्वाख्यान व इतिहास यांतील अंतर स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला असला तरी स्वरूपभेदाविषयी निश्चित विधान केलेले नाही ( ११, २, ६, ९ ). इतिहास शब्दाचा आख्यान शब्दाशी असलेल्या संबंधावर प्राचीन साहित्यातून स्पष्ट प्रकाश टाकलेला नाही. वैदिक कवींना इतिहास व पुराण शब्दांतून पौराणिक कथा, कथात्मक इतिहास, व सृष्टिविषयक कथांचे ज्ञान होत असे. यांनाच पाचवा वेद मानले असून त्यातून अन्वाख्यान, अनुव्याख्यान, व्याख्यान यांची निर्मिती झाली असे झीगचे

मत आहे. आख्यान, इतिहासाचा व पुराणांचा भाग होते. आख्यानाचा संबंध वृत्तान्तकथनाशी आहे असे झीगचे म्हणणे आहे; व प्राचीन काळीं आख्याने गद्यपद्यरूप होती असा त्याचा कयास आहे. अग्निपुराणातही साहित्याची गद्य, पद्य व चम्पूकाव्ये अशी तीन रूपे मानली आहेत.

देवादीनां संस्कृतं स्यात्प्राकृतं त्रिविध तृणाम् ।
गद्यंपद्यं च मिश्रं च काव्यादि त्रिविध स्मृतम् ॥
(अग्निपुराण, १, ८.)

आख्यान हे गद्य व पद्य यांचे मिश्रण असून गद्यामागून पद्य व पद्यामागून गद्य यायचे असे झीगचे मत आहे. परंतु पुराव्याअभावी अभ्यासकांनी हे मत मान्य केलेले नाही. सारांश, प्राचीन संस्कृत साहित्यातून आख्यान शब्दांचा वापर झालेला असला, तरी आख्यान हा विशिष्ट काव्यप्रकार आहे असे कुठेही स्पष्टीकरण आलेले नाही. एवढे खरे की, उदात्त व पवित्र अशा प्राचीन कथांचा आविष्कार आख्यानातून होतो असे उल्लेख आढळतात.

जैनांच्या व बौद्धांच्या साहित्यातूनही आख्यानांचे उल्लेख आलेले आहेत. इ. स. पूर्व ५ व्या शतकात महावीर आणि गौतमबुद्ध यांचे मगध हा देश कार्यक्षेत्र होते. जनसाधारण लोकांकरिता त्यांनी ज्या भाषांतून उपदेश केला त्या प्राकृत होत्या. महावीर व गौतमबुद्ध यांनी प्राकृत भाषांतून धर्मप्रवचनाला प्रारंभ केल्याने त्यांना प्रतिष्ठा प्राप्त झाली, व त्यात हालाची सत्तसई, प्रवरसेनाचे सेतुबंध, वाक्पतिराज याचे गउडवहो यांसारखे ग्रंथ निर्माण झाले. महावीराच्या प्रवचनांचा त्याच्या शिष्यांनी नंतर संग्रह केला. आगमसाहित्य या नावाने तो प्रसिद्ध आहे. या साहित्यात जैन उपासकांचे आचार-विचार, नियम, व्रते, सिद्धान्त, परमतखंडन व स्वतःच्या मतांची स्थापना, इत्यादी विषयांची चर्चा आली आहे. या विचारांची चर्चा करीत असताना अनेक आख्याने त्यात आलेली आहेत. आगमसाहित्याचा काळ अतिप्राचीन असल्याने त्यातील वचनातून दडलेल्या अनेक परंपरा अनाकलनीय झाल्या. या परंपरांना पुन्हा सजीव करण्याकरिता निर्युक्ती, भाष्य, चूर्णी व टीका निर्माण झाल्या. हे समीक्षासाहित्य प्राचीन काळापासून चालत आलेल्या अनेक ऐतिहासिक, धार्मिक, व प्रामुख्याने लौकिक कथांनी समृद्ध आहे.

जैनांच्या या साहित्यातून कथा या अर्थी कथा, उपकथा, अंतर्कथा, आख्यान, आख्यायिका, वार्ता, उदाहरण, दृष्टान्त, वृत्तान्त आणि चरित्र इत्यादी शब्द आढळतात. 'वसुदेवहिण्डी' या ग्रंथात आख्यायिका, कथा-विज्ञान आणि व्याख्यान या शब्दांचा वापर केलेला आढळतो. हरिभद्रसूरींने 'समराइच्चकहा'मध्ये अर्थकथा, कामकथा, धर्मकथा आणि संकीर्णकथा असे कथांचे चार प्रकार सांगितले आहेत. उद्योतनसूरीने 'कुवलयमाला' ग्रंथात धर्मकथा, अर्थकथा व कामकथा असे कथेचे तीन प्रकार असल्याचे म्हटले आहे. धर्मकथेचे आक्षेपणी, विक्षेपणी, संवेदिनी व निर्वेदिनी असे चार प्रकार निवेदिले आहेत. 'आख्यानमणिकोष' हा ग्रंथ आम्रदेव-सूरी व इतर आचार्यांनी निर्माण केला आहे. आगमसाहित्यातील 'नायाधम्मकहाओ' या ग्रंथातून कथांच्या द्वारा धार्मिक उपदेश केलेला असून जिनपालित व जिनरक्षित यांचे सुंदर आख्यान आले आहे. 'उत्तरा-ध्ययनसूत्र' या ग्रंथात अनेक आख्याने आल्याचा उल्लेख आहे. समीक्षा ग्रंथातून गांधार, श्रावक, तोसालिपुत्र, स्थूलभद्र, कालक, करकंडू, मृगापुत्र, मेनार्य, चिलातीपुत्र, मृगापती, सुभद्रा इत्यादी आख्याने विखुरलेली आहेत. जैनांनी उदात्त व पवित्र धार्मिक कथांकरिताच आख्यान शब्द वापरला आहे. लौकिक जीवनातील कथांचा आविष्कार करीत असताही जैन ग्रंथकारांनी धार्मिक भावनेतूनच त्यांच्याकडे पाहिले आहे.

प्राचीन साहित्यातून आख्यान हा शब्द अशा प्रकारे अनेकदा येतो. प्राचीन व पवित्र धर्मकथांचा आविष्कार ज्यातून झाला आहे अशा वाङ्मय-प्रकारास जैन साहित्यातून आख्यान असे म्हटलेले दिसते. पारलिप्त, हरिभद्र, उद्योतनसूरी, नेमिचंद्र, गणचंद्र, लक्ष्मणगणि, देवेन्द्रसूरी इत्यादींच्या ग्रंथांत असलेल्या आख्यानांतून आदर्श जीवनमूल्यांचे प्रतिपादन करण्याचा हेतू स्पष्ट दिसतो. जैन व बौद्ध यांचे साहित्य लौकिक जीवनाच्या स्पर्शातून निर्माण झालेले असल्याने या प्राचीन आख्यानांना जिवंतपणा आलेला आहे. विशिष्ट मूल्यांच्या प्रतिपादनाकरिता ही आख्याने निर्माण झालेली असूनही, ती अधिक जीवनस्पर्शी व वास्तवस्पर्शी उतरली आहेत. संस्कृत साहित्यातून आढळणाऱ्या आख्यान वा उपाख्यानाहून प्राकृतातील आख्यानांचा हा वेगळा विशेष महत्त्वाचा आहे. सारांश, प्राचीन संस्कृत वा

प्राकृत साहित्यातून आविष्कृत झालेल्या या आख्यानांत काही भिन्नता असली तरी धार्मिक गरजेतून त्यांची निर्मिती झाली होती हे लक्षात घेता, आख्यानाच्या आशयाचे स्वरूप स्पष्ट होईल व त्याची आतापर्यंतच्या विवेचनावरून काही ठळक वैशिष्ट्येही स्पष्ट होतील. (इतिहास, चरित्र व कथा असे आख्यानाचे संमिश्र स्वरूप असल्याचे दिसते.) तीर्थंकारांचे जे चरित्र प्राकृतातून लिहिले गेले त्यातून अनेक कथा आल्या आहेत. तीर्थंकरांचे हे कथारूप चरित्र हा त्या काळातील इतिहासच आहे. या आख्यानातून शब्दरूप घेणाऱ्या कथांना व चरित्राला परंपरेचा आधार आहे. इतिहास, चरित्र, पुराण, आख्यान, उपाख्यान, वार्ता, कथा वा संलाप या शब्दांच्या अर्थातील भिन्नत्व आज आपल्याला जाणवते. प्राचीन काळात हे सर्वच विषय एकरूप होते. म्हणूनच (संस्कृतातून काय किंवा प्राकृतातून काय, चरित्र व इतिहास यांहून आख्यानाचे वेगळेपण दिसत नाही. परंपरेचा आधार असलेले कथात्मक निरूपण म्हणजेच आख्यान, असेच त्याचे स्वरूप दिसते. हे निरूपण इतिहास असेल, चरित्र असेल, किंवा पौराणिक दिव्योदात्त कथा असतील.)

— ३ —

(प्राचीन मराठी कवितेतून आख्यान, कथा, चरित्र हे शब्द आढळतात. ज्ञानेश्वरीत एके ठिकाणी आख्यान शब्द आला आहे.)

नाना पुरतिये प्रतिष्ठेलागि
सानीव धरूनि आंगीं
पुराणे आख्यानरूपे जगीं
भारता आली

(राजवाडे प्रत १. ४६.)

(यात पुराणातील कथाच आख्यानांचा विषय झाल्या असल्याचे म्हटले आहे. नरेन्द्र पंडिताच्या रुक्मिणी-स्वयंवरात किन्नराची कथा आली आहे. त्या कथेकरिता नरेन्द्राने आख्यान शब्दांचा वापर केला आहे.)

परियसे प्रसिद्ध मधुवन ।
तेथहा किन्नरू करी वेदाध्ययन ।
ययाचे सांधतां आख्यान ।
विचित्र असे ।

( रुक्मिणी-स्वयंवर १५४ )

आख्यान म्हणजे कथा, इतिहास या अर्थाने हा शब्द येथे आला आहे. ' पुराणातुल आनंद समुद्द ' या स्वयंवराख्यानातून वर्णन करीत असल्याचे त्याने म्हटले आहे. परंपरागत चालत आलेली पुराणातील कथाच त्याने आपल्या लेखनासाठी निवडली आहे. परंपरेने सांगितलेल्या कथेकरिता महानुभाव वाङ्मयातून कथा, चरित्रकथा, चरित्र व आख्यान हे शब्द येतात. (त्या काळीं आजच्यासारखे वाङ्मयीन रचनाप्रकार नव्हते. इतिहास, पुराण, चरित्र, कथा, तत्त्वविवेचन हे विषय आजच्यासारखे स्वतंत्र नव्हते. आख्यानातूनच इतिहास असेल, कथा असेल, किंवा एखाद्या चरित्रनायकाचे वर्णन आले असेल.) ज्ञानेश्वरही आपल्या ग्रंथाला कथा म्हणतात याचे कारणही हेच आहे. सामराजाने कथा हाच शब्द रुक्मिणी–हरण यातील लेखनाकरिता वापरला आहे.

तथापि बांधेन कथा विचित्र
पदोपदी पावन जे पवित्रा
तुझे कृपेचा परि ईस पाया
पडे, तयीं हे नपवे अपाया

( रुक्मिणीहरण, ३० )

(सामराजाने रुक्मिणी-हरण महाकाव्याच्या धाटणीवर लिहिले, पण महाकाव्य नसलेले हे कथात्मक काव्य आहे,) व त्याकरिता त्याने कथा हा शब्द वापरला आहे. याचा अर्थच असा की, कथा, चरित्र किंवा आख्यान या शब्दांनी विशिष्ट काव्यप्रकार सुचविण्याचा या कवींचा हेतू दिसत नाही. (आख्यान या शब्दाचा प्राचीन मराठी कवींनी केलेला वापर परंपरेने चालत आलेल्या भव्योदात्त काव्यकथेकरिता केला आहे एवढे निश्चित.)

(आख्यान या शब्दाचा संस्कृत, प्राकृत किंवा मराठी काव्यातील हा वापर एका विशिष्ट मर्यादेपलीकडे या रचनाप्रकाराची कल्पना देत नाही.) संस्कृतात दुष्यंत–शकुंतला या कथेस उपाख्यान म्हटले आहे. आख्यान या शब्दाचा निश्चित कोणत्या अर्थाने वापर झालेला आहे हे जरी स्पष्ट नसले, व आख्यान, उपाख्यान हे शब्द एकाच अर्थाने वापरलेले असले तरी दुष्यंत–शकुंतला, नल दमयंती, सावित्री, कच-देवयानी, तपती, शंतनू-गंगा, विश्वामित्र–मेनका इत्यादींना उपाख्यान म्हटले आहे. संपूर्ण पुराणान्तर्गत कथाप्रवाहाला आख्यान व अनुषंगाने येणाऱ्या स्वतंत्र कथांना उपाख्यान अशा ह्या संज्ञा असाव्यात. आपल्याला मात्र प्राचीन मराठी कवितेच्या स्वरूपाच्या मूल्यांकनातूनच आख्यान ही संज्ञा निश्चित करावी लागेल.)

प्राचीन मराठी कवितेची निर्मिती दोन दिशांनी झालेली दिसते. महानुभाव कवींनी पुराणान्तर्गत श्रीकृष्णकथेची रचना मराठीत केली. महानुभाव कवी विदग्ध पंडित होते. त्यांच्यासमोर संस्कृतातील विदग्ध महाकाव्ये होती. नरेन्द्र, भास्करकवी बोरीकर, दामोदर पंडित या कवींची रचना महाकाव्याच्या वळणाची आहे. त्यांची लेखनशैली ही निश्चित महाकाव्याच्या दिशेकडे वाटचाल करू पाहणारी आहे. विठ्ठलकवी बिडकर, किंवा सामराज यांनीही महाकाव्याचेच अनुकरण केले. संस्कृतात सांगितलेली महाकाव्याची बाह्य लक्षणे त्यांनी आपल्या लेखनातून पाळण्याचा प्रयत्न केला. एका विशिष्ट वाङ्मयीन प्रवाहाच्या अनुकरणातून निर्माण झालेल्या या मराठी कवितेला महाकाव्याच्या पातळीवर जाता आले नाही. (प्रतिभेचे सामर्थ्य, जीवनाची भव्य जाण व पार्श्वभूमी त्यांच्या लेखनाला लाभली नाही. त्यांनी लेखनात महाकाव्याच्या तंत्राचे सांकेतिक अनुकरण केले, परंतु त्यामुळे या कवितेला महाकाव्याची कळा प्राप्त झाली नाही.)

एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, वामनपंडित, मोरोपंत या कवींनी पुराणातील कथांना मराठीत आणले. पुराणान्तर्गत कथांचा आविष्कार कवितेतून करीत असताना त्यांनी महाकाव्याच्या पद्धतीचे अनुकरण केले नाही. परंपरेचा आधार असलेल्या कथेचे निवेदन हेच त्यांचे उद्दिष्ट होते. (संस्कृतात जी विषयाच्या अनुषंगाने स्वतंत्र उपाख्याने आली आहेत, ती या कवींनी कथेचा प्रवाह कायम ठेवून मराठीत आणली. यांनाच आपण आख्यानक

कविता म्हणतो.) विष्णुदास नामा, जनाबाई, एकनाथ, मुक्तेश्वर वा मोरोपंत या कवींच्या काव्याचे स्वरूप तपासले तर, परंपरेचा आधार असलेले (स्वयंपूर्ण कथानक, वर्णनशैलीमुळे किंवा कल्पनाविलासामुळे निवेदनात खंड पडू न देता, जी कथा काव्यात निवेदिली जाते तीस आख्यान म्हणावे, या निष्कर्षाप्रत यावे लागते.) महानुभाव कवींच्या किंवा विठ्ठल सामराज यांच्या कवितेहून ही कविता निश्चितच वेगळी आहे. तिचे निर्मितीचे उद्दिष्ट जसे भिन्न आहे त्याचप्रमाणे तिचे स्वरूपही पृथगात्म आहे. नरेन्द्र–भास्कर–सामराज या कवींनी जाणीवपूर्वक विषय सजविण्याचा प्रयत्न केला आहे. कल्पनाविलास व विस्तृत विषयवर्णन हा यांच्या कवितेचा एक विशेष आहे. केवळ कथा निवेदन एवढाच त्यांचा हेतू नाही. म्हणूनच रुक्मिणीच्या सौंदर्याच्या वर्णनातील नरेन्द्र किंवा भास्कर यांचा शब्दविलास कथानकाची गती रोधतो. मुक्तेश्वराच्या कवितेतूनही हा कल्पनाविलास दिसतो, नाही असे नाही, परंतु ती अनुषंगाने घडलेली क्रिया आहे– त्याच्या लेखनाचा तो प्रधान हेतू नाही. (महानुभावपासूनची सारीच कथात्मक कविता ही आख्यानक कविता नाही) हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

(महाकाव्य, खण्डकाव्य, कथागीत व आख्यान हे मराठीतील कथाकाव्याचे प्रमुख रचनाप्रकार होत. संस्कृतात महाकाव्याची रचना झाली आहे, तशी मराठीत झालेली नाही. राजा शिवाजी, यशवंतराय महाकाव्य रचनेतून महाकाव्याच्या लेखनाचे संकेत पाळलेले असले तरी, त्यातील जीवनपट हा भव्य व व्यापक नाही.) सामराजाच्या काव्याचे गुण नकारात्मक आहेत. दंडीने केलेल्या महाकाव्याची सांकेतिक लक्षणे त्यांच्या लेखनात आढळतात. सामराजाची साचेबंद, सांकेतिक रचना आहे. मराठीतील आख्यानक कविता नरेन्द्र–सामराज इत्यादींच्या कवितेहून वेगळी आहे. (आख्यानात अनेक प्रसंग घेऊन विस्तृत कथारचना केलेली नसते. कथेच्या सरळ निवेदनावरच आख्यानक कवीने आपले लक्ष केन्द्रित केलेले असते. (कथावस्तूच्या केन्द्रस्थानी असलेल्या घटनेवर लक्ष केन्द्रित करून, इतर प्रसंग अनुषंगाने येत असतात. त्यामुळे विस्तृत निसर्गवर्णनाला वा विषयान्तराला आख्यानक कवितेत अवसर नसतो.) (आख्यान हे महाकाव्याच्या तुलनेत संक्षिप्त, पण स्वयंपूर्ण व एकमेव परिणाम करणारे, परंपरेचा आधार असलेल्या कथेचे प्रवाही निवेदन होय.) मराठीत

ही आख्याने पुराणावर आधारलेल्या प्रदीर्घ काव्यरचनेतून जशी विखुरलेली आहेत त्याप्रमाणेच त्यांची स्वतंत्र रचनादेखील झालेली आहे. जनाबाई, एकनाथ, वामनपंडित, मोरोपंत, उद्धवचिद्घन इत्यादींनी काही स्फुट आख्याने रचलेली आहेत, कपोत–कपोती आख्यान, भरतभाव, अभिमन्युवध, दुष्यंत–शकुंतला, हंस–काककथा यांसारखी आख्याने प्रदीर्घ रचनेतून विखुरलेली दिसतात.

मराठीतील खण्डकाव्यातून कथेचा ओघ अखंड वाहात नाही. खण्डकाव्यातून अनेक खण्डांमधून एक प्रदीर्घ कथा सांगितली जाते. मूळ कथावस्तूच्या अनुषंगाने निसर्गवर्णनाला वा कल्पनाविलासाला भरपूर वाव असतो. त्याचप्रमाणे पात्रांच्या अनेक स्वभावविशेषांवर प्रकाश टाकण्याचे कार्य कवी करीत असतो. त्यामुळे कवीची केन्द्रस्थानी असलेल्या कथाभागावरील पकड सैल झालेली असते. 'जयमंगला' या काव्यात मूळ कथावस्तूपेक्षा भावदर्शनावरच कवीचे लक्ष केन्द्रित झालेले असल्याने या काव्यास आख्यानक काव्य मानलेले दिसते (मराठी आख्यानक कविता, पृ. ५, प्रा. प्र. बा. बापट) ते बरोबर नाही. सारांश, आख्यानात परंपरेचा आधार असलेल्या कथेचे ओघवते व स्वयंपूर्ण सलग निवेदन असते. मराठीतील खण्डकाव्यातील कथांना परंपरेचा आधार नाही. माझ्या मते खण्डकाव्य व आख्यानकाव्य यांत विषयाच्या अनुरोधाने फरक करणे जरूर आहे. ज्या काव्याचा विषय एक कल्पित कथा आहे, त्यातील व्यक्ती पूर्णपणे काल्पनिक आहेत, व जे काव्य अशा व्यक्तीच्या एखाद्या प्रसंगावरच रचलेले असते त्याला खंडकाव्य म्हणावे. याच्या उलट, ज्या काव्याचा विषय व व्यक्ती इतिहासदृष्ट्या सर्वविश्रुत आहे, जे एकाच धावत्या वृत्तात अगर अनेक प्रकारच्या वृत्तात गुंफलेले असून, ज्यात पांडित्याचे उत्तम निदर्शन आहे अशा काव्यास आख्यानक अशी संज्ञा देऊन, त्याला इंग्रजीतील Longer Narrative Poems मध्ये समाविष्ट करावे (पुष्पांजलि पृ. १८७, प्रा. द. सी. पंगु) असे प्रा. पंगु यांनी सुचविले आहे. वरील विधानातील सर्वच तपशील मान्य होण्यासारखा नाही. पांडित्यप्रदर्शन हा कवीच्या वृत्तीचा विशेष आहे, सर्वच उत्कृष्ट आख्यानांचा नाही. आख्यानक कवितेची विशिष्ट, धावती निवेदन

पद्धती ही खण्डकाव्याच्या निवेदन पद्धतीहून भिन्न आहे, व म्हणून खंड-काव्याहून प्राचीन आख्यानक कविता वेगळी आहे.)

— ४ —

(प्राचीन आख्यानक कविता ही निरलंकृत, साधीसोपी, कथा-विनेदनाला प्राधान्य देणारी, व सामान्य जनांचे रंजन करून त्यांना परंपरागत जीवन-मूल्याची ओळख करून देणारी, बहुधा ओवी वृत्तातील रचना आहे. आख्यानांची निर्मिती करणारे जनाबाई, एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, कृष्ण-दयार्णव, नामापाठक हे कवी व्युत्पन्न पंडित नव्हते.) संस्कृत साहित्यशास्त्राचा अभ्यास करून प्राकृतात काव्य करणाऱ्या पंडित कवींची परंपरा या आख्यानांची रचना करणाऱ्या कवींहून वेगळी आहे. नरेन्द्र, भास्कर भट्ट, दामोदर पंडित, विठ्ठल, नागेश, सामराज, हे कवी व्युत्पन्न पंडित होते. त्यांना संस्कृत साहित्यशास्त्राचा परिचय होता. विदग्धता हा त्यांच्या वृत्तीचाच विशेष होता असे नाही, तर त्यांनी जी निर्मिती केली त्या कवितेचाही तो विशेष आहे. (पंडित कवी हे रसिक, कलानिपुण, व काव्याच्या निर्मितीची जाणीव असणारे कवी आहेत. याचा परिणाम त्यांच्या कवितेवरही झाला. महाभारत, रामायण किंवा भागवत यांचा आश्रय घेऊनच त्यांनी आपली काव्यकथा लिहिली असली, तरी तिचा प्रवाह वेगळा आहे. विठ्ठलाचे सीतास्वयंवर हे त्याच्या व्युत्पन्न पांडित्याचे निदर्शक आहे.) ‘विद्वज्जीवन’ हे सर्गात्मक काव्य तर मोजक्या पंडित रसिक वर्गाकरिताच विठ्ठलाने लिहिले आहे. (नागेश, विठ्ठल किंवा सामराज यांची कविता ही अलंकारप्रचुर, पांडित्यपूर्ण व क्लिष्ट उतरली आहे. आख्यानक कवितेच्या निर्मितीमागे भक्तीची प्रेरणा आहे. तशी या पंडिती काव्याच्या मागे नाही. या कवींनी संस्कृताच्या वळणाची मराठी कथाकविता निर्माण केली, व स्वाभा-विकच सर्वसामान्यांच्या जवळ जाणाऱ्या आख्यान कवितेहून तिचा प्रवाह वेगळा पडला.) मुक्तेश्वर, वामन किंवा मोरोपंत हेही पंडित होते हे खरे, व त्यांनीही पंडिती वळणाची कविता लिहिली आहे; परंतु त्यांच्या नावावर आख्यानक कविताही आहे. मुक्तेश्वरामध्ये काव्यनिर्मितीच्या नकारात्मक

जाणिवा आहेत. ओवी वृत्तामधील सरळ निवेदन करणारी व अनुषंगाने कल्पनाविलास साधणारी आख्यानक रचना त्याने केली आहे. म्हणून काही कवींनी जशी पंडिती वळणाची कविता लिहिली, तशीच आख्यानक कविताही लिहिलेली आहे.

पंडिती कथाकाव्याचा प्रारंभ महानुभावांच्या कवितेने झालेला असला तरी प्राचीन आख्यानक काव्याची सुरुवात भागवत धर्मीय संतांनीच केली असे म्हणावे लागेल. जनाबाईच्या आख्यानांनी मराठी आख्यानक कवितेला प्रारंभ झाला. हरिश्चंद्राख्यान, प्रल्हादचरित्र, कृष्णजन्म, बालक्रीडा, थालीपाकाख्यान ही जनाबाईची आख्यानरचना स्त्रीसुलभ कोमल भावनांची पखरण व रचनेचा साधेपणा हे तिच्या लेखनाचे विशेष. नामापाठकाने ' भरतभेट ' हे लहान आख्यान लिहिले आहे. ' अश्वमेध ' हा त्याचा ग्रंथ. अत्यंत साधी व सोपी भाषा. या ग्रंथातील चंद्रहासाचे आख्यान अत्यंत रसाळ व प्रवाही उतरले आहे. चोंभा कवीने ओवी वृत्तातच ' उखाहरण ' हे आख्यान लिहिले आहे. यानंतरचा अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आख्यानकवी म्हणजे एकनाथ. आख्यानक कवितेचा खरा विकास एकनाथांच्यापासून झाला. एकनाथांचे सारे लेखन सामान्य जनांकरिता होते. एकनाथासारख्या लोकशिक्षकाची आख्यानक कविता ही कथांच्या द्वारे बहुजनास अध्यात्म सांगण्याच्या प्रेरणेतून निर्माण झाली. त्यांच्या आख्यानक कवितेच्या मागे उभे असलेले मन हे भाविक, सहिष्णू, श्रद्धाशील, व समाजनिष्ठेने भारावलेले आहे. एकनाथ हे कवी होते, संत होते, व समाजशिक्षक होते. या त्रिविध भूमिकांचा मनोज्ञ आविष्कार त्यांच्या रचनेतून जाणवतो. एकनाथांचे नातू मुक्तेश्वर यांनी आख्यानक कवितेचे सारे विशेष पाळले. कथानिवेदनात येणारा त्याचा कल्पनाविलास हा आख्यानाच्या बांधणीत सैलपणा आणतो, व त्यामुळे कथेचा ओघ खंडित होतो. परंतु कथेचे निवेदन हाच त्याचा प्रमुख हेतू असतो. मुक्तेश्वराने ओवी वृत्तातून साधी व प्रासादिक रचना केली आहे. आख्यान या रचनाप्रकाराचे सारे विशेष श्रीधर व मोरोपंत या कवींच्या कवितेतून प्रकर्षाने आढळतात. श्रीधराचा पांडवप्रताप हा ओवी वृत्तातील ग्रंथ सुबोध व प्रासादिक रचनेकरिता प्रसिद्ध आहे. कथेचा अत्यंत कौशल्यपूर्ण विकास याच्या रचनेतून झालेला आढळतो. निवेदनात संयम

पाळलेला असल्याने याची रचना पाल्हाळिक झालेली नाही. कल्पनाविलास किंवा रसाविष्कार हे शैलीचे विशेष याच्या रचनेत नसल्याने कथेचा प्रवाह कुठेही खंडित होत नाही. श्रीधरासारखा अत्यंत लोकप्रिय आख्यानक कवी दुसरा नाही. वामन पंडिताच्या नावावर काही स्फुट आख्यानेही आहेत. (वामन पंडित हा पंडिती कथाकाव्य व आख्यानकाव्य यांना जोडणारा दुवा आहे. याची काही रचना संस्कृत वृत्तातील, कृत्रिम व सालंकृत असली तरी, भारताच्या रचनेकरिता त्याने आख्यानकवींनी लोकप्रिय केलेला ओवी छंद स्वीकारला. वामनाच्या कथाकवितेतून अध्यात्म डोकावतो, परंतु त्याचा हा अध्यात्म साक्षात्कारी नव्हता. तो बौद्धिक असल्याने तो काव्याच्या पातळीवर जाऊ शकला नाही. द्वारकाविजय, मुकुंदविलास, रुक्मिणीविलास-सारख्या कथाकाव्यांतून तर कथानिवेदन करण्याऐवजी, शृंगारासह अध्यात्माचे विश्लेषणच त्यांनी केले, व त्यामुळे मराठी आख्यानक कविता निर्जीव झाली.

काही स्फुट आख्यानांतून मात्र त्यांनी अत्यंत प्रभावीपणे कथेचे निवेदन केले आहे.

(प्राचीन आख्यानक कवितेतील मोरोपंत हे शेवटचे कवी. जनाबाईच्या रचनेपासून सुरू झालेला हा आख्यानक रचनेचा प्रकार मोरोपंताच्या रचनेतून पूर्णाकारात प्रगटला. (कथेचा अखंडित प्रवाह, स्वभावरेखन व वातावरणनिर्मिती हे आख्यानाचे सारे विशेष मोरोपंतांनी पाळले.) (मोरोपंतांनी लेखनाला प्रारंभ केला तेव्हा, आख्यानक कवितेची साडेतीनशे वर्षांची भव्य परंपरा त्यांच्या-मागे उभी होती. इतका काळ लोटलेला असल्याने या वाङ्मय प्रकाराची काही ठळक वैशिष्ट्ये स्थिर झाली होती. त्या साऱ्या वैशिष्ट्यांचा प्रभावीपणे उपयोग करून, मोरोपंतांनी या रचनेचा पूर्ण विकास केला.) पंतांनी संस्कृत वृत्तांचा स्वीकार केला. पंतांची संस्कृतप्रचुर व सालंकृत आख्याने मात्र सामान्य जनापासून दूर गेली. पंतांची महाभारत व रामायणातील स्फुट आख्याने त्यांच्या सामर्थ्याची प्रतीती आणून देतात. (कथेचा गतिशील प्रवाह, कथा-निवेदनाचे संयमी कौशल्य, पात्रांच्या उजळ स्वभावरेखा निर्मिण्याची त्यांची कला, व कथेस उठाव देणारी वातावरणनिर्मिती करण्याचे त्यांचे भाषासामर्थ्य

या गुणांनी पंतांची आख्याने सरस उतरली आहेत. प्राचीन आख्यानांचा हा चार शतकांचा प्रवाह मोरोपंतांच्या अखेरीने संपतो.

पंडिती काव्य व आख्यानक काव्य यांचे आधार रामायण, महाभारत व भागवत हे असले, तरी दोन्ही काव्यांच्या परंपरा वेगळ्या आहेत. (पंडिती काव्याची गंगोत्री संस्कृत महाकाव्ये आहेत.) महाकाव्याच्या वळणाची, परंतु प्राकृतात केलेली रचना म्हणजे पंडिती काव्य. संस्कृतातील संकेतांचे काटेकोर पालन या पंडिती कवींनी केले. रुक्मिणीच्या सौंदर्याचे वर्णन करताना त्यांनी जुने संकेत पाळले. त्यांत बदल केला नाही. त्यामुळे ही सारी रचना अत्यंत सांकेतिक व कमालीची कृत्रिम उतरली आहे. आख्यानक कवींनीही संस्कृतातील संकेतांचा स्वीकार केला; परंतु त्यांचे संदर्भ बदलले व सामान्य जनाकरिता आपण लेखन करीत आहोत ही त्यांची भूमिका होती, त्यामुळे विशिष्ट जाणिवेने त्यांनी कथेचे निवेदन केले. एक प्रकारची समाजाभिमुखता त्यांच्या लेखनात असल्याचे जाणवते. परंपरेचा आधार असलेल्या कथांतून जीवनमूल्याचा प्रसार करणे हा त्यांचा हेतू होता. कथनकौशल्य, पात्रांच्या स्वभावरेखांचे उजळ चित्रण, व वेधक वातावरणनिर्मिती करून आख्यान-कवींनी आपली रचना रोचक करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नामुळेच त्यांच्या आख्यानक काव्याचे स्वरूप पंडिती काव्याच्या स्वरूपाहून वेगळे झाले.)

— ५ —

अभिजात कलेचे धर्म विविध लेखकांच्या लेखनांतून व विविध काल खंडांतून जाणवतात. कोणत्याही काळातील काव्य पूर्णत्वाला पोहोचलेले आढळत नाही. आख्यान या रचनाप्रकाराच्या आकृतिबंधाचा पूर्णाकार मोरोपंतांच्या कवितेतून झालेला आढळत असला, तरी मराठी कवितेचा पूर्ण विकास त्या कवितेत झाला नाही. विकास ही सापेक्ष संज्ञा असल्याने विशिष्ट काळात काव्याचा पूर्ण विकास झाला असे म्हणता येणारही नाही. काळाच्या आणि व्यक्तीच्या मर्यादा काव्याच्या निर्मिती-प्रक्रियेवर होत असतात. काव्याच्या स्वरूपाविषयीच्या, तंत्रासंबंधीच्या प्रचलित कल्पना नि त्या अनुषंगाने निर्माण झालेले काव्य हे त्या काळाच्या अपेक्षा पूर्ण करते.

काव्यासंबंधीच्या ह्या अपेक्षा व कल्पनाच त्या काव्याच्या मर्यादा ठरत असतात.

आख्यानक कवितेच्या जाणवणाऱ्या मर्यादा ह्या त्या कवींच्या जशा आहेत तशाच काळाच्याही मर्यादा आहेत. आख्यानक कवींचा काळ हा भक्तीकडे वळलेला काळ होता. संतांच्या काव्याने समाजाचे लक्ष पारमार्थिक ध्येयाकडे वळलेले होते. भागवत धर्माची एक प्रचंड लाट या काळात मराठी जीवनप्रवाहात आली. संतांनी भक्तीच्या प्रभावी प्रेरणेतून काव्यनिर्मिती केली व कथाकीर्तनांतून ही रचना लोकांपर्यंत पोचली. संत हे साक्षात्कारी युगंधर होते. अध्यात्माचा अर्थ खरोखरच त्यांना कळला होता. डोंगर-दऱ्यांतील वृक्षवेलींशी सोयरेपण जोडण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी आले होते. भक्तीच्या विश्वात ते अधिकारी पुरुष होते. ' ब्रह्म भेटीशी आले गा ' अशीच त्यांची अवस्था होती. साक्षात्काराचा स्पर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वास झालेला असल्याने, त्यांच्या लेखनातही एक प्रकारचे सामर्थ्य होते. संतांची भक्ती शब्दांतून व्यक्त होताना ती केवळ वर्णनात्मक रूप धारण करीत नव्हती. तर प्रत्यक्ष आत्मप्रचीतीचे शब्द बोलत होती. संतांची भक्ती ही त्यांची सेन्द्रिय संवेदनाच होती. साक्षात्काराचे अधिष्ठान या संवेदनेला असल्याने तिचे रूप अत्यंत तरल, सूक्ष्म, शब्दविहीत असे होते. ह्या संवेदनेने घेतलेला शब्दाकारही अत्यंत तरल व अर्थवाही होता. संतांच्या या कार्याचा ठसा त्या काळावर उमटला होता. आख्यानक कवींना ही काळाची प्रेरणा डावलणे शक्य नव्हते. परंतु सर्वच आख्यानक कवी साक्षात्कारी संत नव्हते. आख्यानक कविता लिहिताना केवळ भक्तीची आदर्श कल्पना त्यांच्यासमोर होती. भक्तिमूल्याचा स्वीकार त्यांनी केला होता. पण हे मूल्य संतांसारखे त्यांचे जीवनसर्वस्व नव्हते. जीवनातील अनेक आदर्श-मूल्यांपैकी ते एक होते.

स्वाभाविकच संतांची आत्मनिष्ठ स्वरूपाची भक्ती आख्यानक कवींच्या काळी वस्तुनिष्ठ मूल्य बनली. तशी ती वस्तुनिष्ठ होताच पुन्हा आख्यानक कवींच्या काळात ती वर्णनात्मक, विश्लेषणात्मक झाली. काळ हा भक्तीच्या आदर्श कल्पनेत रमणारा, आणि कवी मात्र दिव्य साक्षात्कार न झालेले, अशी परि-स्थिती निर्माण झाली. या अवस्थेत काळाच्या मागणीची पूर्तता करणारा एकच मार्ग होता, आणि तो म्हणजे, रामायण–महाभारत–पुराणातील

कथांच्या वर्णनाचा. महाभारतासारखा भारतीयांच्या राजकीय जीवनाचा, वास्तवाच्या जवळ जाणारा इतिहास आख्यानक कवींनी मराठीत भक्तिरूपच वर्णन केला. महाभारतामागील राजकीय रहस्य आख्यानक कवींना कळले नसेल असे नाही, परंतु काळानुरूप त्यांनी भक्तीच्या दृष्टिकोणातून या महाकाव्याकडे पाहिले, व मूळ महाभारताच्या निर्मितीमागची बैठकच मराठी आख्यानातून बदलवून टाकली. राजकीय संघर्षाच्या काळात त्यांनी आख्यानांची निर्मिती केली, तरीही महाकाव्यांतून त्यांनी भक्तीची आदर्श कल्पनाच शोधली. भक्तीच्या प्रेरणेतून कथांचे निवेदन करण्याचा परिणाम प्राचीन आख्यानक कवितेच्या अखेरीपर्यंत कायम असल्याने एकच एक रचनाप्रकार या कवींनी हाताळला. याला अपवाद केवळ एकनाथांचाच होता. या काळातील जीवन भक्तिभावनेने भारावलेले होते. परंपरेचा आधार असलेल्या कथांतून जीवनमूल्ये झिरपत झिरपत या काळात स्थिर झाली होती.

त्यांचा संकेत या काळातील जीवनाने स्वीकारला व सारे जीवनच संकेतबद्ध झाले. अशा जीवनातून निर्माण झालेली आख्यानक कविताही संकेतबद्ध असणे स्वाभाविक होते. या काळाची ही मर्यादा आख्यानक कवितेचीही मर्यादा ठरली. या काळात स्थिर झालेला आख्यानांचा रचनाप्रकार पुढील कवींनी स्वीकारला, व अशा रीतीने चार-साडेचार शतके हा रचनाप्रकार अखंड टिकला.

(हा रचनाप्रकार सतत दीर्घकाळ जिवंत राहिल्याने त्याच्या मर्यादा व सामर्थ्य स्पष्ट झाले) या दीर्घकाळ हा रचनाप्रकार लोकप्रिय का झाला? परंपरागत चालत आलेली जीवनमूल्ये आख्यानक कवितेच्या कथेतून पाझरत होती. (महाभारत, रामायण व पुराणे यांत विविध कथांचे भांडार होते, तसेच विविध व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्ती होत्या. या व्यक्तींचे जीवन एखाद्या आदर्श मूल्याकरिता ढवळून निघत होते. या मूल्याची जोपासना करताना कधीकधी या व्यक्तींना प्राणाचा त्यागही करावा लागत होता. या मूल्याच्या आविष्कारासाठीच आख्यानकवींनी कथेचा आलेख उभा केलेला आहे. राम, सीता, सावित्री, अहल्या, द्रौपदी, सुभद्रा, अर्जुन, अभिमन्यू, शंतनू, शर्मिष्ठा, सत्यवती, पाराशर-अशी किती तरी पात्रे आख्यानक कवितेतून येतात. या प्रत्येक पात्राच्या मागे विशिष्ट

मूल्य उभे असल्याचे आपल्याला जाणवते. विविध भावनांचा मनोज्ञ आविष्कारही या आख्यानांतून झालेला आहे. मोरोपंतासारखा कवी तर एखाद्या ओळीतून पात्राची ठळक स्वभावरेखा उभी करतो. विविध पात्रांच्या भावनांचा, संघर्षांचा, सूक्ष्म स्पंदनांचा आविष्कार या आख्यानक कवींनी केलेला आहे. भक्तीच्या प्रेरणेतून परंपरेचा आधार असलेल्या पुराणकथाच त्यांनी आपल्या आख्यानांकरिता निवडलेल्या असल्या तरी त्यांत विविधता आहे.)

(महाभारत, रामायण वा पुराणे यांतील कथांवर आधारलेली आख्याने या कवींनी रचली तरी त्यांची कविता अनुवादस्वरूपाची नाही. ज्या काळात आख्यानकवींनी रचना केली, त्या काळापासून किती तरी लांब अंतरावर महाभारत, रामायणातील घटना उभ्या आहेत.) महाभारताच्या निर्मितीच्या काळात ज्या जाणिवा होत्या त्याहून भिन्न अशा जाणिवा या कवींच्या काळात होत्या. महाभारतातील कथानक संघर्षावर आधारलेले आहे. त्यातील युद्धाच्या वास्तव जाणिवेपासून पात्रांचे जीवन फारसे ढळलेले नाही. (आख्यानक कवींनी भक्तीच्या भावनेने या महाकाव्याकडे पाहिले. युद्धाची जाणीव त्यांनी ठेवलेली नाही.) त्यामुळे आख्यानांची मूळ बैठकच वेगळी आहे.) भीम, अर्जुन, अभिमन्यू, युधिष्ठिर, कर्ण, किंवा श्रीकृष्ण ही पात्रे मराठी आख्यानक कवितेत युद्धाची जाणीव आपल्या मनात निर्माण करीत नाहीत. आख्यानक कवितेतील वीररसही सांकेतिक उतरला आहे. वास्तव जाणीव विश्वातून निर्माण झालेल्या काव्यातील ताजेपणाचा, टवटवीचा, चैतन्यपूर्णतेचा स्पर्शही या कवितेला झालेला नाही. अभिमन्यूचा चक्रव्यूहातील दुःखद अंत पाहून अर्जुनाची मुद्रा शोकाकुल झाली, पण युद्धाच्या भावनेने त्याचे मन या कवितेत पेटलेले दिसत नाही. शोकरसाचे उत्कट चित्र काढण्यात कवी यशस्वी झाला हे खरे, पण मूळ जाणिवेहून हे चित्र वेगळे असल्याचे दिसेल.

(काही आख्यानक कवींच्या काव्यातून शृंगाररसाची वर्णने आली आहेत, याला कारणही मूळ जाणिवेहून वेगळे चित्रण त्यांनी केले हे आहे. स्त्रीपुरुषांची असंख्य पात्रे व घटना त्यांनी महाकाव्यांतून घेतल्या, त्यातील शृंगाराचे वर्णन मुक्तेश्वर, वामन या कवींनी केले. (राजकीय अस्थिरतेच्या वातावरणाने त्या काळचे सामाजिक जीवनही ढवळून निघाले होते. सामा-

जिक जीवनात स्वास्थ्य व शान्तता नव्हती. सामाजिक जीवनात न आढळणारा शृंगार काही आख्यानक कवींनी महाभारतातील पात्रांच्या जीवनातून चित्रित केला.(भक्ती, वीर, शृंगार या रसांनाच प्रामुख्याने आख्यानक कवितेत प्राधान्य असल्याचे दिसते.)

— ६ —

प्राचीन आख्यानक कवितेचे मूल्यांकन करताना, तिच्या मर्यादा व सामर्थ्य स्पष्ट होते. या कालातील साहित्यविषयक व जीवनविषयक जाणिवा ह्या आजच्या जाणिवांहून वेगळ्या होत्या. आख्यानक कवितेचे तंत्र साहित्याकडे पाहण्याच्या या कवींच्या दृष्टीतूनच विकसित झाले आहे.

ज्ञानी निवती परमार्थ बोधे
पंडित निवती पदबंधे
लोक निवती कथा विनोदे
ग्रंथ संबंधे जग निवे

कथा हे जनसमुदायाचे रंजन करणारे व त्यातूनच जीवनमूल्य प्रसारित करणारे प्रमुख साधन आहे असे एकनाथांनी मानले. जनरंजन व लोक-शिक्षण या हेतूने एकनाथांनी आख्यानांची रचना केली. मुक्तेश्वर, वामन व मोरोपंत या आख्यानक कवींनी काव्याकडे कलादृष्टीने पाहिले हे खरे असले, तरी आख्यानक कवितेच्या तंत्रात फरक पडला नाही. मोरोपंतांच्या लेखनविषयक जाणिवांनी तर आख्यानक कविता अधिक रेखीव स्वरूपात निर्माण झाली. रघुनाथ पंडित यांचे दमयंती-स्वयंवर संस्कृत कलाकवींच्या जाणिवा घेऊनच निर्माण झाले. आख्यानक कवितेच्या निर्मितीमागे परंपरेचा आधार असलेल्या कथेचे सलग निवेदन करणे हीच प्रमुख जाणीव होती. मोरोपंतांच्या काळापर्यंत कलाविषयक जाणीवाही काही आख्यानक कवींनी स्वीकारल्या व मोरोपंतांच्या काळी आख्यानक कविता अधिक निर्दोष स्वरूपात निर्माण झाली. पंडिती काव्य निर्माण करणाऱ्या कवींच्या काव्यविषयक जाणिवा ह्या विदग्ध महाकाव्यातून स्वीकारलेल्या होत्या. संस्कृत महाकवींचा

पंथ पाहून काव्य रचण्याचे मनोरथ त्यांनी बांधले होते. महाकवींच्या काव्यातील नवरसाचे मेघ आपल्याही कवितेकडे वळविण्याचा प्रयास त्यांनी केला. पंडित कवींची ही कलाजाणीव विदग्ध काव्याच्या अनुकरणवादी भूमिकेतून निर्माण झाली होती. आख्यानक कवी या जाणिवेपासून लांब होते. सामान्य जनांना जीवनमूल्याचा परिचय करून देणाऱ्या कथांचा आविष्कार त्यांना करावयाचा होता. वाचकाची ही जाणीव ठेवून त्यांनी आपली आख्यानरचना केलेली असल्याने तिचे स्वरूपही साधे व निरलंकृत राहणे स्वाभाविक आहे.

या जाणिवेचा परिणाम आख्यानांच्या निवेदन तंत्रावर जसा झाला, त्याचप्रमाणे त्यांच्या भाषेवरही झाला. संस्कृत भाषेतील निर्मिती या काळात शिष्टमान्य होती हे प्राकृतात रचना करणाऱ्या अनेक कवींच्या उद्‌गारांवरून स्पष्ट होते. मराठी भाषा चोरापासून आलेली नाही, संस्कृत भाषेइतकेच सामर्थ्य याही भाषेत आहे हा विचार विरोधी भूमिकेच्या प्रतिक्रियेतून निर्माण झाला आहे. मराठी भाषेला सामर्थ्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न या काळातील कवींचा प्रमुख प्रश्न असावा असे वाटते. प्राचीन काळातील प्रत्येक कवीने मराठी भाषेचे गोडवे गाइले आहेत, तर काहींनी आक्रमक पवित्र्यात मराठीचे श्रेष्ठत्व विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. कवींच्या या उद्गारांचा नीट अर्थ समजावून घेतला पाहिजे. या उद्गारांच्यामागे उभ्या असलेल्या घटनांचा अर्थ उलगडला पाहिजे.

मराठी भाषा या काळातही दुबळी होती असे नाही. भावनांची सूक्ष्म आन्दोलने व्यक्त करणारी ज्ञानदेव–नामदेवांच्या पदांची भाषा ही प्रौढ नाही असे म्हणता येणार नाही. निसटून जाणाऱ्या गूढ संवेदनांना गोचररूप देताना, त्या संवेदनातील तरलता पेलून धरणारी शब्दावळ लक्षणीय आहे. यापुढील काळात मराठीला जाणीवपूर्वक संस्कृतच्या वळणावर नेऊन, तिला सामर्थ्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न काही कवींनी केला. या काळात फार मोठ्या प्रमाणावर मराठी भाषेचे संस्कृतकरण पंडित कवींनी केले. मराठीवर फारशी व उर्दूच्या होत असलेल्या परिणामातूनही हे घडले असेल, परंतु या कवींची भाषा इतकी संस्कृतप्रचुर झाली की, एक प्रकारची कृत्रिम व निर्जीव रचना या कवींच्याकडून झाली. जेथे आविष्कारासाठी मराठी शब्दांचा वापर

६३०२० काव्य
९०८७ ५।३।७९

करणे शक्य होते, तेथेही अस्वाभाविक रीतीने संस्कृत शब्द अट्टाहासाने या कवींनी वापरले. मोरोपंतांच्या कवितेतील काही संपूर्ण ओळी संस्कृत शब्दांनी गच्च भरलेल्या, परंतु मराठी क्रियापद वापरलेल्या अशा उतरल्या. हे प्रयत्न या आख्यानक व पंडित कवींच्याकडूनच होत होते असे नाही, तर या काळातील शासनानेही हे प्रयत्न केले. या साऱ्याच घटनांचा परिणाम आख्यानक कवितेच्या शब्दकळेवरही झाला. आख्यानक कवींनी जाणीवपूर्वक संस्कृत शब्दांचा वापर केला. वामनपंडित व मोरोपंत यांच्या कवितेतून तर याचा अतिरेक झालेला दिसतो. या काळातील कवितेच्या भाषेचा पद्धतशीर अभ्यास झाल्यास या घटनांचा अर्थ अधिक स्पष्ट होईल.

चार शतके अखंडपणे निर्माण झालेल्या या आख्यानक कवितेने प्राचीन वाङ्मयाचे दालन समृद्ध केले आहे. तिने जसे सामान्य जनांच्या अभिरुचीला एक वळण लावले, त्यांना धर्माभिमुख केले, तसेच मराठी कवितेला आख्यानाचा एक स्वतंत्र रचनाप्रकारही दिला हे या कवितेचे श्रेष्ठत्व मान्य केले पाहिजे. कोणत्याही काळातील कविता ही मागील परंपरेचा त्याग करून निर्माण होत नाही. या प्राचीन आख्यानक कवितेची सामर्थ्यस्थाने व तिच्या परंपरेचा वारसा लक्षात घेऊनच उद्याच्या मराठी कवितेला श्रीमंती लाभणार आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५५७०
स्थळ प्रत

# कपोत-कपोती आख्यान

एकनाथ

कपोतीचें स्नेह गोड
धरोनि स्त्रीसुखाची चाड
वनीं वृक्ष पाहोनियां गूढ
करी नीड कपोता

तेणें वनचरें वनस्थळीं
नीडा माजीं स्त्रीमेळीं
वासु केला बहुकाळीं
भार्ये जवळी भूलला

कपोता आणि कपोती
परस्परें दोघां अति प्रीती
स्नेहो वाढलासे चित्तीं
हृदयीं आसक्ती नीच नवी

येरयेरां वेगळें होणें
नाहीं जीवें अथवा मनें
दोघें वर्तती एकें प्राणें
खाणें जेवणें एकत्र

सेवितां ज्याची अतिगोडी
तें घालिती येरयेरांच्या तोंडी
जीवेंप्राणें शिणोनि जोडी
तें दे आवडी स्त्रियेसी

सदा एकांतीं बसती
एके स्थानीं दोघें असती
दोघें क्रीडाविहार करिती
खेळ खेळती विनोदें

आधींचि प्रिया पढियंती
तेही झाली गर्भवती
जैशी लोभियाचे हातीं
सापडे अवचितीं धनलोहे

तैसे तिच्या गर्भाचें कोड
अधिकाधिक वाढवी गोड
जैसें मदिरा पिऊनि माकड
नाचे तडतड डुल्लतु

अंडें उलोनि आपण
कोंवळीं पिलीं निघालीं जाण
पितरें दृष्टीं देखोन
जीवें प्राणें भुललीं

अत्यंत कोवळीं बाळें
दोघें जणें पुत्रवत्सलें
शांतविती मंजुळें
अति स्नेहाळें प्रजांसी

गोड गोजिरे बोल
ऐकोनि दोघां येती डोल
धावोनियां वेळोवेळ
निंबलोण उतरिती

माता पिता दोघें बैसती
सन्मुख अपत्यें धांवती
लोल वक्र विलोकिती
वेगें दाविती येर-येरां

ऐसीं खेळतां देखोनि बाळें
दोघें धांवति एक वेळे
उचलूनिया स्नेहबळें
मुख कोवळें चुंबिती

एवं टणकीं जालीं बाळें
कुटुंब थोर थोरावलें
अन्न बहुसाल पाहिजे झालें
दोघें विव्हळें गृहधर्मे

यापरी कुटुंबवत्सलें
पुत्रस्नेहें स्नेहाळें
दोघें जणें एके वेळे
अन्न बहुकाळें अर्थिती

सहसा मिळेना अन्न
यालागीं हिंडती वनेंवन
वहुसाल श्रमतांही जाण
पूर्ण पोषण मिळेना

बहुसाल मेळवूनि चारा
दोघें जणें जाऊं घरा
मग आपूल्या लेंकुरां
नाना उपचारां प्रतिपाळूं

ऐस ऐशिया वासना
मेळवावया अन्ना
दोघेंजणें नाना स्थानां
वना उपवना हिंडती

मातापिता गेली दुरी
उडती पिलें नीडाभीतरीं
क्षुधेनें पीडिलीं भारी
निघालीं बाहेरी अदृष्टें

तें वनीं कोणी एक लुब्धक
पक्षिबंधनीं अतिसाधक
तेणें ते कपोत बाळक
अदृष्टें देख देखिले

तेणें पसरोनियां काळजाळें
पाशीं बांधिलीं तीं बाळें
कपोत कपोतींचे वेळे
राखत केवळें राहिला

बाळकांच्या अतिप्रीती
कपोता आणि कपोती
चारा घेऊनि येती
नीडाप्रति लवलाहें

तंव काळजाळीं एके वेळे
कपोती बांधलीं देखे बाळें
तोंड घेऊनि पिटी कपाळें
आक्रोशें लोळे दुःखित

वाळें चरफडितां देखें जाळीं
आक्रंदोनि दे आरोळी
बाळांसन्मुख धांवे वेळोवेळीं
दुःखें तळमळी दुःखित

पुत्रस्नेहें केलें वेडें
गुण आठ–आठवूनि रडें
हिताहित न देखे पुढें
बळेंचि पडे जाळांतु

मायामोहें भुलली कैशी
जेथ बांधलें देखे पुत्रांसी
ते जाळीं घाली आपणासी
मोहें पिशी ते केली

अंतरला स्त्री–बाळकीं
कपोता तो एकाएकीं
रुदन करी अधोमुखीं
अतिदुःखीं विलपतु

जीवाहोनि प्रिय अधिक
ते निर्जीव देखिलें बालक
अनुकुल अनुरूपक
भार्या देख अंतरली

नाशिली स्त्री नाशिल्या प्रजा
येथ म्यां रहावें कवण्या काजा
दुःखें प्राण जाईल माझा
लोकलाजा निंदित

एवढें अंगीं वाजलें दुःख
काय लौकिकीं दाखवूं मुख
भंगलें संसाराचें सुख
जितां मूर्ख म्हणतील

ऐसें बोलोनि केलें काये
मृत स्त्रीपुत्रांकडे पाहे
काळपाशीं बांधिलीं आहे
चेष्टा राहे निःशेष

ऐसें देखतांही अबुद्धी
विवेकें न धरीचि बुद्धी
आपण जाऊनि त्रिशुद्धी
जाळामध्यें पडियेला

जाळीं पडला कपोता दुर्बुद्धी
झाली लुब्धकाची कार्यसिद्धी
सह कुटुंब घेऊनि खांदीं
निघे पारधी निजस्थाना

* * *

# शकुंतलेचा राजसभा प्रवेश

मुक्तेश्वर

ऋषिआज्ञेनें तापसमेळा सहित भरत शकुंतला
गजसाह्वया पातले डोळां लोक देखती कौतुकें १

सभामंडपीं राजनृपति मुनिवरांसीं राजयुवती
राजकुमर धरूनी हातीं उभी ठेली सन्मुख २

बलौदार्यलावण्यगुणी तनुज लाविला जनकाचरणीं
ह्मणे राजया अंकासनीं ठाव देईं बैसावया ३

बहुत दिवस पाहिली वाट निष्ठुर नव्हेसि कां लोभिष्ठ
आतां गृहस्वामिनी वरिष्ठ गृहा पातली आपुलिया ४

सत्यप्रतिज्ञा नरेंद्रोत्तमा आठवूनि आपुलिया नेमा
युवराजीं भरतनामा पुत्र आपुला अभिषेकीं ५

ऐकोनि शकुंतलेचें वचन केल्या कर्माची आठवण
मनें जाणतां आपण जाला नेणता ते काळीं ६

ह्मणे तूं कैंची दुष्ट तापसी कोण कोठील कोणे देसीं
कोणे काळें येकांतवासीं संग जाला मी नेणें ७

नेणतां माझिया सुहृज्जना कैसेनि जालीसि ममांगना
ऋषि राजे पातले लग्ना कोण ते येथें दाखवीं ८

पाहतां साक्षीसि न मिळे कांहीं मज तंव अणुमात्र आठव नाहीं
आतां आलेनि पंथें जाईं सीघ्र येथूनि निर्लज्जे ९

ऐसें बोलतां मेदिनीपाळा क्रोधें संतप्त शकुंतला
जैसी प्रलयाग्नीची ज्वाळा स्पर्शों धांवे गगनातें १०

आरक्तता लेऊनि नयनें अंजन क्षाळिलें अश्रुजीवनें
अधर स्फुरती जेवीं पवनें पद्मपत्रें थरकती ११

ह्मणे धन्य गा पुरुषोत्तमा उत्तम ऐसेचि रक्षिती नियेमा
कर्मसाक्षी अंतरात्मा तृप्त जाला या वचनीं १२

जाणोनियां होय नेण परिचर्य असतां पुसे कोण
हें तवं अधर्माचें लक्षण तुज उत्तमा अयोग्य १३

ईश्वर आणि जोडिलें पुण्य स्मरूनि बोलें यथार्थ वचन
माझी साक्षी तुझेंचि मन तुझे अंतरीं देताहे १४

मी येक सर्वज्ञ जाणता श्रृष्टीं ऐसा अभिमान वाहसी पोटीं
सकळ मूर्खांच्या सेवटीं कर्म करिसी त्यां तुल्य १५

आतां सेवटलिया वचना येकदां ऐकें नरभूषणा
मी जातसें कस्यपारण्या कण्वाश्रमा सखेद १६

ऐसे शकुंतलेचे बोल रायें मानिले निरस फोल
जैसा क्षपणिक निषेधी झोल पिकल्या मधुमोहळांचे १७

तैसीं प्रियेचीं पवित्र वचनें दुष्यंत दूषी आपुल्या वदनें
ह्मणे हे बहुभाषिणी कवणें जिंकीली न वचे बोलतां १८

जीचा उदरीं तवोत्पत्ति तिची निवडली ऐसी गीती
ह्मणोनि खाणी तैसी माती आहाणा लोकीं प्रसिद्ध १९

असो ते अप्सरा केउता ऋषि केउती पिशाच वनतापसी
कैंचा पुत्र हें मानसीं श्रुत दृष्ट मी नेणें २०

गळां पडोनि विपयस्वार्थी संमंध लाविसी मज समर्था
अविचारबुद्धि सांडूनि आतां जाईं स्वस्थळा आपुलिया २१

मंत्रबीजाक्षरांच्या बोळी अबद्ध जपतां भद्रकाळी
क्षोभे तैसी क्रोधानळीं अंगार टाकी शब्दांचे २२

पवित्र विश्वामित्रबाळा शकुंतला अलिकुंतळा
ह्मणे कुंतलमंडळपाळा तूंचि अविचारें जल्पसि २३

पितरां नरकाब्धि तारावया नौका तो येक पुत्र राया
यालागीं तनुज त्यागावया अर्ह नव्हेसी निर्धारें २४

नरेंद्रसिंहा सांडूनि कपट मांडिये बैसवीं कुमर ज्येष्ठ
सत्यधर्म करीं प्रगट वडिलां सर्वां देखतां २५

कोटी पुण्यें जोडिलीं यत्नीं ते जळती येके असत्यवचनीं
जैसी पावकस्फुलिंगकणी नासी कर्पूरगिरीतें २६

सत्यापरता नाहीं धर्म सत्य तेंचि परब्रह्म
सत्यापासीं पुरुषोत्तम सर्वकाळ तिष्ठत २७

भूलिंगासि अधोवदनें गळत्या लाविल्या अश्रुजीवनें
उष्णश्वास धूम्रवर्णें तीव्र सांडी सकोपें २८

वाक्यपुष्पीं पुष्पांजुळी सत्य साक्षीनें राजमौळीं
वोपीतां तंव तेचि काळीं अति आश्चर्य वर्तलें २९

सत्यसत्वें शूलपाणी प्रत्यक्ष जाला तत्क्षणीं
ह्मणोनि अंतरिक्षवाणी होती जाली ते ऐका ३०

रे रे दुष्यंतराजनृपति ह्मणी अवमानिसी हे सती
जे क्षोभल्या सर्व जगती जाळूं शके क्षणार्धें ३१

यालागीं पुत्र आपुला घेणें मानिनी मानें सदना नेणें
आता प्रतारणेचीं वचनें न बोलावीं बहुसाल ३२

पाळूनियां आमुचें वचन अंगीकारावें उभयरत्न
पुढारें बोलसी तरी आण हरिहर देवदेवांची " ३३

ऐसी ऐकतां आकाशवाणी टाळी पिटिली सभास्थानीं
जयजयकाराचिया ध्वनी परम आल्हाद समस्तां ३४

राजा म्हणे, " वृद्ध ! हो ऐका हा सर्व अर्थ मज ठाउका
परी शंकोनियां लौकिका कृत्रिमवाक्यें बोलिलों ३५

पहिलेंचि करितां अंगीकार लोक भाविती अनाचार
कामबुद्धि राजेश्वर ह्मणती निंद्य राहटला ३६

आतां ईश्वरवचनसाक्षी अंगीकारीन मृगसावाक्षी "
परिसोनि सुहृज्जन स्वपक्षी धन्य म्हणती ऋषिवर्य ३७

मग उठोनि लवलाहें पुत्र कडिये घेतला मोहें
आवडी चुंबोनियां पाहे वारंवार वदनातें ३८

जनाची दृष्टि लागेल ह्मणें म्हणोनि अपार धनधान्यें
वोंवाळूनि सांडिलीं तेणें याचक जाले कुबेर ३९

करूनि मूर्धावघ्राण स्नेहें देऊनि आलिंगन
युवराजीं अभिषेचन करिता जाला तात्काळीं ४०

" भरत पुत्र हे दुष्यंत " ऐसें बोलिले देवदूत
यालागीं नाम ठेविलें भरत जनकें तया आवडी ४१

आदरें प्रिया धरूनि हातीं नेली अंतरगृहाप्रती
आलिंगोनि ह्मणे, " चित्तीं विषाद कांहीं न मानावा ४२

सत्य प्रगटावया साचारें वाक्य बोलिलों लोकाचारें
तें त्वां न मनूनियां चतुरे क्षमा करणें मजलागीं " ४३

ह्मणोनि वस्त्रें दिव्याभरणें वोपिलीं जैसीं शचीही नेणें
राज्यसंपत्ती निज ठेवणें निवेदिलें ती हातीं ४४

* * *

## व्याधाख्यान

वामनपंडित

एके दिनीं कौळिक पारधीतें, गेला वना घेउनि शस्त्रअस्त्रें,
फिरे वनीं लक्षितसे मृगातें, उष्णीं न दीसे मृग लोचनातें
भ्रमत भ्रमत तेव्हां पातला पर्वतातें,
कठिण बहु गुहा ते देखिली लोचनातें,
मृगवत तनु ज्याची ते तनू भासलीसे,
अतिशय मग व्याधू बाण योजीहि हौसें
गुहेमाजि तो तापसी कोणि एक, बहुकाळ ध्यानस्थ त्यागी स्वलोक,
निराहारि तो निर्जळी एकचित्ती, स्मरे अंतरीं तो रमाकान्तमूर्ति.

व्याधें लक्षुनि बाण लावुनि गुणीं संधान जों योजिलें,
तों तेथें मनुजाकृती स्वनयनीं तात्काळ त्या देखिलें,
तेजःपुंज बहू तपोधन महा ध्यानस्थ तो देखिला,
शस्त्रें टाकुनि सत्वरें अतिशयें साष्टांग तो वंदिला.

अनूतापें तेव्हां " हर ! हर ! " वदे, " जी पशुपती !
कशी झाली होती अनुचित कथा आजि नसती,
महा ब्रह्महत्येचें दुरित घडतें हो ! अवचिता,
पुढें जन्मोजन्मीं सतत नरकीं कोण बुडता ? "

त्यानंतरें व्याध पुसे मुनीतें, " कां सेविलें कानन ? सांग मातें.
संसारदुःखें अनुताप जाला, वैराग्यभावें भजतां अजाला
कीं राज्य गेलें धन हारवीलें, कीं शत्रुचें तें भय फार जालें,
कीं तस्करीं सर्व हिरोनि नेलें, कीं सोयरे सर्व उदास केले.
पत्नी नसे देइन आपुली जी अभीष्ट तें मानस कोण कीं जी
जें इच्छिलें पूर्ण करीन आर्ते ', वेगें वदावें " म्हणे सुव्रतातें.

उपरि बोलतसे मुनिराव तो, " परियसीं बरवा अभिप्राय तो,
पातलोंचि मिहि या वनिं पारधी, लक्षितों, परि नव्हे मृगपारधी."
वदत व्याध, " कथा मृगलक्षण, अणिन मी, मजला नलगे क्षण."
मुनि म्हणे, परिसें अरे भाविका ! हेंचि लक्षण मृगासिनें भावि कां.

चहूंही हातांतें मृगपद तनू शामळ असे,
गळां माळा कांसे कसुनि पिवळें वस्त्र विलसे,
चहूं हातीं चाऱ्ही जडित मकराकार असती,
जया पायीं लेणीं रुणझुण बहू नाद करिती.

हे ऐकुनीयां मुनिची सुवाणी, बोले तयातें मग व्याध वाणी,
" करीन आज्ञा अजि ! सत्वरेंसीं, सांगा तयाचें स्थळ आदरेंसी
झाडावरी कीं विवरांत राहे, खातो फळें कीं तृण भक्षिताहे,
सांगा असा नेम कटाव त्याचा, धरोनि आणीन यथार्थ वाचा."

मुनी बोले, सर्पावरि निजतसे एक दिवशीं,
कधीं पक्षीपाठीं बसुनि उडताहे गगनिशीं,
बहु स्थानें त्याचीं मजहि न कळे, लोक जपती,
त्वरें आतां जाईं, उशिर न लवीं गा ! मजप्रती."

घेऊनि आज्ञा मुनिची त्वरेंसीं, शोधी वनें जाउनि उत्तरेसी,
केला मृगाचा बहु यत्नलाहो, तो अस्तमाना रवि चालला हो !

असाध्य देखोनि पडे विचारीं, मनीं म्हणे, " काय करूं मुरारी !
आलों द्विजा देउनि भाकदान, न साधितां होइल अस्तमान.

शब्दा गुंतुनि तापसा भरंवसा म्यां दीधला आसता,
जावें काय घरा फिरोनि मजला मी त्यागितों जीविता,
सांगों काय तया तपस्विमुनिला जावोनियां ते स्थळीं ? "
एसें बोलुनि शस्त्र काढुनि करें कंठासि जों आकळी,

तदा देवा त्याचें अति निकट निर्वाण कळलें
पुढें त्याच्या कैसें प्रगट करुनी रूप धरिलें ?
चहूं हातीं चाऱ्ही अयुध असती पिच्छ मुकुटीं
असें त्या व्याधानें प्रगट हरिला देखत दिठी.

व्याधें पाहुनियां हरि स्वनयनीं, संधान जों योजिलें
माजाचें कटिबंधन झडकरी कंठास तें घातलें,
घेवोनी अतिसत्वरें तपसियासंनीध जों पातला
बोलें दीर्घस्वरें, " अरे तपसिया ! घे सावजा आपुल्या. "

मुनी पाहे तेंव्हां सगुण हरिचें रूप नयनीं,
म्हणे " हें आश्चर्य त्रिभुवनपती शेषशयनी,
श्रुती नेती नेती विधिहर जयातें हुडकिती
असा त्या व्याधानें प्रगट करवीला निजमती.

नमो विश्वोद्धारा अधमतिहरा कंजनयना
क्षिराब्धीयावासी श्रुतिविनित कर्कोटशयना
स्तुती गाती योगी नमुनि हरितें नम्रवदनीं
कृपासिंधू ! देवा ! स्थिर ये उभया मूल सदनीं.'

बहू योगी ध्याती हृदयकमळीं ह्याचि चरणा
न लाभे हें तेंची मम दृढ कसें बंधहरणा. "

उभा केला व्याधें त्वरित मग भावें गवसिला
न लाभे वेदा हा अजित तपयज्ञीं न शिणला.

नमो विश्वानंदा निजप्रणवकंदा अगणिता
नमो जी स्वच्छंदा सकल भवबंधा उफणिता,
मला तूझा धंदा अणिक मतिमंदा न लवि हो !
नमो जी गोविंदा ! तव पदिं, मुकुंदा ! जवळि हो.

कृपा आली देवा त्वरित करुनी दिव्य स्वरुपा
स्वलोकीं नेऊनी दिधलि उभयां मुक्ति सरुपा
ऋषी ब्रह्मादीक सुरवर मुनी स्तुति करिती
बहू साधूवृंदें हरिपदयुगीं प्रेम धरिती

ऐसे परी हरिहि भाविक या जिवाला,
दावी क्षणा न लगतां पदराजिवाला
हा प्रत्ययो दृढतरें बरवा मनाला,
आला म्हणोनि हरिछंदहि वामनाला.

* * *

# हंसदूत

**रघुनाथपंडित**

तो मंडळाकृति फिरे उतरावयाला
भैमी-मुखेंदु-परिवेष म्हणों तयाला
तेथें महीवरि असा खग बैसताहे
ते सुंदरी निज कुतूहल जेविं पाहे

जो बैसतां चपळ पक्ष-पुटीं धरेला
हाणीतसे फडफडा ध्वनि हो उदेला
पाहे तया खग-वरासि वरानना हे
मानी मनीं नवलही मग बोलताहे

" असा पक्षी लक्षी बहु-विहग-लक्षीं न मिळता
सु-वर्णी जो वर्णी वद कवण वर्णी कवयिता
अगाई, हा बाई त्वरित वरि जाईल पळुनी
धरूं जातें हातें हळुहळु तयातें न कळुनी "

ऐसें वदे मग तयास धरावया हे
ते होय हंस-गमना पहिलीच आहे
वाजेच ना वलय नूपुर-नाद नोहे
तो तद्गतीस निरखूनि कसा न मोहे

हे मंद-मंद-पद सुंदर कुंद-दंती
चाले जसा मद-धुरंधर इंद्र-दंती
हंसा धरूं जवळि जाय कृशोदरी ते
निष्कंप-कंकण-करासि पुढें करीते

गवसलाच तसा खग भासला तरि तदीय सखी-जन हांसला
मग सवेंच बुझावुनि हांकिला उडविलाचि पिटाळुनि टाकिला

कांहीं उडोनि गगनीं मग नीट येतो
नाहींच दूर न समीप बसे तसा तो
पाहे सुधाकर-मुखी कलहंस-राया
लाहे मनोरथ तयास पुन्हा धराया

"हंस* धरीन म्हणोनि मनोरथ हा मज होय विनोद तुम्हांला
हा कलहंस पिटाळवितांहि, पुन्हा उडवाल तया विहगाला
जा परत्याच, तुम्ही नलगोच," असें वदुनी नृपराज-सुता ते
राहविला सखिचा जन आपण-मात्र तयास धरूं मग जाते

रागेजली अरुण-कांति विराजवीते
हे एकली सु-तनु चंद्रकला तसी ते
गेली हळूच कलहंस समीप केला
कांहीं पुढें फडकला अवलोकिजेला

आणीकही पद न वाजत मंद चाले
जो चालतां पदर सांवरिला न हाले
हेही करी निज-करीं खग सांपडेसा
तोही हळू हळुच होय पलीकडेसा

मद-गज-गमनेनें मागुती चाल केली
विनत-तनु-लता हे तत्समीपास गेली

पुनरपि फडके हा फारसा दूर नाहीं
जवळि जवळि ऐसा भासला हंस कांहीं

हंसे तसी चतुरसंमत युक्ति केली
ते चालवीत सु-तनू बहु दूर नेली
छाया तियेशि दुसरी तिसरी वनाळी
जे सांवळी युवति-तुल्य दिसे निराळी

तया वनांत एकली विलासिनी विलोकिली
मदें भरोनि डोलतो तियेस हंस बोलतो

" भूमि–भागीं फिरणार तूं तुला मी । कसा सांपडेन सांग गगन-गामी
बाळ बाळे जरि होय चंद्र-कामी । हस्त त्याचा लागेल काय सोमीं
असो, सांपडतों तुझ्या करामाजी । पुन्हा सुटका करितेस काय माझी
कसा पातेजू बाळ-बुद्धि तूझी । स्त्री-स्वभावें बहु आणशील बाजी "

चतुर नर जसा हा बोलतो हंस तैसा
तरि न धरि मृगाक्षी विस्मयीं भाव कैसा
" पळुनि मज निखंदी," तीस तो खेद नाहीं
शिणहि विसरली ते बोलती होय कांहीं

" कोण तूं या कोठील कवणियाचा कसा झाला तव देह सोनियाचा
कशी आली ही तूज मनुज-वाचा काय भाग्योदय तूंचि या वनाचा
धरिल पाहिल सोडील असा पाहीं मजवरता विश्वास तुझा नाहीं
असो, पुसतें ते सांग कथा कांहीं जाइं अथवा मग याच वनीं राहीं "
असें बोलोनी मौन धरूनि राहे काय बोले तो हंस असें पाहे
तदा त्याचा वचनौघ असा वाहे, " राज-कन्ये तूं आयकें गिरा हे
ब्रह्मदेवाचे बहु विमान-वाही हंस आहेती ऐकिलें तुवांही
तया वंशीं सौवर्ण-देह हाही ज्यासमान सखि सर्व-मान्य नाहीं

मंदाकिनीमधिल जी कनकारविंदें
तीं जेवितों मृदल-नाल-मृणाल-कंदें
आम्ही असों नृप-सुते तरि कांचनाचे
जें कार्य तें धरिल कीं गुण कारणाचे
जो मानसीं विहरतो विहरो परी तो
कां आमुची कुल-सती अ-सती करीतो
राखीं नळा निज-यशोमय-हंस राया
आलों महीवर फिराद अशी कराया
मीं गुंतलों नळ-महीन्द्र-गुणौघ-पाशीं
सेवेसही मग करोनि तयाच पाशीं
आलोकुनी कवण या चतुरा न नाचे
लोकेशता विभवही चतुराननाचें
एकान्त लेखनहि वाचनही करी तो
माझी तनु-द्युति समीप तदा धरीतों
याकारणें नळ मला बहु आप्त मानी
तो सांगता निज मनोरथ होय कानीं "
आधींच नैषध कथा नवनीत-मेला
होता अलंकरण—रूप इच्या जिभेला
हंसोदयें विघरतां अधरीं धरी ते
स्वीकारितां वचन तें मग आदरीते

" नळें तुजशीं एकान्त काय केला तोचि ऐकाया जीव हा भुकेला
तया बोलोनी निववि या भुकेला ऐकवावें मज म्हणुनि नायिकेला
नळाशीं जो एकान्त तुझा तो कां प्रकट कीजे म्यां सांग इतर लोकां
धन्य डोळे न करोनि तदालोका नळ-कथेनें हे कर्ण धन्य हो का "
निषध-राजीं हे फार दिसे राजी असें इंसें जाणोनि मनामाजी

बोलिजेली नळराज-कथा हे जी मला हेजीब त्याशि म्हणे हे " जी "
" नळ म्हणाला मज सरळ धरुनि बाहीं तुला कोठेंही वंक अटक नाहीं
सकळ भुवनें तरि फिरुनि राज-गेहीं एक नवरी मज योग्य बरी पाहीं

एकान्त हाच वदला मज जाण बाळे
तूं सांग तो वर तुला रुचला रसाळे"
येणेंपरी परिसतांच तया अनन्या
ते बोलते चतुर सुंदर राजकन्या
" मी जाण देवनळही स्वकरीं धराया
सांगेन काय चतुरा मज लाज जाया
काळें करूनि सुख जोंवरि होय लेखी "
हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी
श्लेष-शब्दें इणें भाव सांगीतला
नैषधाधीश तो नाथ मागीतला
होय जाणीयली घे त्रपा-कंचुला
हंस बोलावया हालवी चंचुला
" गांठ्याळ जें हृदय सान्द्र न होय ज्याचें
नामेंचि देवनळ कार्य नसे तयाचें
धत्तूरही कनक-नाम सदा धरीनो
होईल काय रसिका कनकापरी तो "
ती बोलते युवति, " लाज मनीं दडाली
होती, तुवां विघरतां मन ते उडाली
आतां वरूं नळवरासि तुला नवाजूं
गाऊं तुझी स्तुति करूनि कशास लाजूं"
परिसुनि वच ऐसें जें इणें बोलिजेलें
पतग–कुल-वतंसें अंतरीं ध्याइजेलें

पर-वश हृदया हे नैषधें राज-हंसें
म्हणुनि समजतां हे बोलिजे राजहंसें

" जशी रंजलीसि तूं निषध-भूपीं तसा तोही रंजला तुझ्या रूपीं
दैव-घटनें अन्योन्य व्हाल सोपीं तुम्ही नांदाल सत्य हें निरोपीं
कोण योजावी नोवरी नळाला ब्रह्मदेवानें हा विचार केला
तुझा नामाक्षर-संघ घेइजेला असें भासतसे माझिया मनाला

नळ-रहित वराशीं तूज योजूनि पाहे
तरि मग विधि ऐसा कोण तो मूढ आहे
अ-चतुर नर तोही जाहल्या जेविता कीं
सळमिसळ करीना सर्वथा क्षीर ताकीं

कशाला हें बोलणें काय येणें तुवां वरिला नळ-राज तूंहि तेणें
सफळ माझें हें येथवरी येणें राजकन्ये नीरोप मला देणें

* * *

# अभिमन्युवध

श्रीधर

जो सच्चिदानंद कमळा-पती
तो झाला पार्थाचा सारथी
जो भक्ताचे मनो-रथीं
बैसोनि सूत्र हालवी १

युद्धास गोविला अर्जुन
इकडे काय झालें वर्तमान
चक्रव्यूह गुरुद्रोण
रचिता झाला अद्भुत २

सुपर्ण-व्यूह पांडव रचित
धर्मासि अवघेचि रक्षित
युद्ध मांडलें अद्भुत
द्रोणें आणि भीमसेनें ३

नकुळ सहदेव पांचाळ
अवघे युद्ध करिती सबळ
परी चक्र-व्यूह भेदावया बळ
कोणासही दिसेना ४

धर्म म्हणे, असता पार्थ
तरी हा व्यूह भेदिता निश्चित
तों पुढें येऊन सुभद्रा-सुत
धर्म-राजास विनवीतसे ५

तुम्ही मज आज्ञा द्याल जरी
तरी हा व्यूह भेदीन निर्धारीं
धर्म म्हणे ते अवसरीं
तूं बाळक सु-कुमार ६

मग बोले पार्थ-नंदन
आम्हां क्षत्रियां रण हेंचि धन
ताता तुमचे दयेंकरून
व्यूह भेदून जाईन मी ७

घनश्याम वर्ण राजीव नयन
आ-जानु-बाहु सुहास्य वदन
जो पांडवांसी प्राणांहून
आवडता पांचांसही ८

ऐसा तो उत्तरा-वर
रथावरी चढला सत्वर
उदयाद्रीवरी दिनकर
तैसा सुंदर दिसतसे ९

केला धर्मास नमस्कार
युद्धा निघाला पार्थ-कुमर
तो सहस्रवधी राज-पुत्र
व्यूहाप्रती रक्षिती १०

व्यूह भेदीत जाय सौभद्र
दश सहस्त्र मारिले कुंजर
एक अयुत महा-वीर
अश्वांसहित पाडिले ११

एक अयुत महारथी
तात्काळ पाडी उत्तरापती
जेथें शंभर राजपुत्र रक्षिती
त्या स्थळासी पातला १२

दळासहित राज-कुमर
एकल्यावरी सोडिती शर
परि तो आनक दुंदुभि-कन्या-कुमर
तितुके तोडी क्षण-मात्रे १३

तितुक्यांचें बाण-जाळ
एकसरें भेदी सुभद्राबाळ
जैसें उगवतां सूर्य-मंडळ
भगणें सर्व लोपती १३

एक उठतां विनायक
असंख्य संहारती दंदशूक
कीं सुटतां चंड-वात देख
जलद-जाळ वितुळत १५

एक-विष्णु-नामेंकरून
असंख्य दुरितें जाती जळून
कीं चेततां कृशान
असंख्य वनें दग्धती १६

ग्रंथ संग्रहालय ... ९५५६०

तैसा एकलाच धनंजयकुमर
परी सैन्यें केलीं अवघीं जर्जर
कोणी उचलितां कर
शस्त्रासहित भुजा छेदी

दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मण
त्यासीं युद्ध केलें निर्वाण
घेतला तात्काळ त्याचा प्राण
शीर उडवूनी पाडिलें १८

बाण सोडीत धांवला कर्ण
तों दो बाणीं छेदिले त्याचे कर्ण
आंग काढून भानु-नंदन
पळता झाला एकीकडे १९

दश बाणीं सुयोधन खिळिला
द्रोण पांच बाणीं विंधिला
जयद्रथ तात्काळ पळविला
एका बाणेंकरोनी २०

अश्वत्थामा कृपाचार्य
हेही पळती गत-वीर्य
देखोनी अभिमन्यूचें शौर्य
द्रोण मस्तक डोलवी २१

व्यूहामाजी सांपडला पार्थकुमर
साहा जण महावीर
सोडिते झाले निर्वाण शर
एकलिया बाळावरी २२

... ग्रंथ संग्रहालय, ...
... ७१९२९ ... ची८८

सुकुमार तो सौभद्र
एकल्यासि हाणिती महावीर
चहूंकडे पाहे सुंदर
आपुलें कोणी दिसेना २३

असता पिता अर्जुन
तरी साह्य करिता येथें पूर्ण
जयद्रथ व्यूह-द्वार धरून
शिव-वरदें नाटोपे २४

आक्रान्त भोंवे पांडव-दळीं
जवळी नाहीं पार्थ-वनमाळी
व्यूह फोडी ऐसा बळी
कोणी नाहीं पांडवांत २५

युद्ध करित अभिमन्य
कर्णें सोडिले निर्वाण बाण
हातींचें धनु तोडून
बाणभाता छेदिला २६

सारथी घोडे ते वेळे
द्रोणाचार्यें मारिले
मग अभिमन्यें खड्ग घेतलें
रथाखालीं उतरला २७

जैसी वीज लखोनि जाये
तैसा अभिमन्य तळपताहे
तों दुर्योधनें खड्ग लवलाहें
एके बाणें छेदिलें २८

मग गदा घेऊन पार्थसुत
अमित वीरांतें पाडित
तों दुःशासनें त्वरित
गदा छेदिली हातींची २९

मग घेतलें रथचक्र
रणीं तळपे सुभद्रा-कुमर
जैसा कृष्ण चक्र-धर
तैसा वीर दिसतसे ३०

कर्ण द्रोण दुर्योधन
सोडिती बाणापाठीं बाण
हातींचें रथ-चक्र जाण
अश्वत्थामियानें छेदिलें ३१

तों दुःशासनाचा पुत्र दौःशासनी
वेगें आला गदा घेउनी
अभिमन्यें तेच क्षणीं
गदा दुसरी घेतली ३२

दोघीं गदा-युद्ध मांडिलें
सकळीं बाण-जाळ घातलें
दौःशासनीस केलें
अभिमन्यें मूर्च्छित ३३

सवेंच दुःशासन-सुतें
हाणीतलें अभिमन्यातें
दोघे पावले मूर्छेतें
गदा-घातें एकमेक ३४

मूर्छा सांवरोनि दौःशासनी
वेगें आला गदा घेउनी
विकल सौभद्र पडलिया रणीं
त्याचे मस्तकीं घातली ३५

तेणें चूर्ण झालें शीर
पडला पार्थाचा कुमर
तों अ-शरीरिणी वदली उत्तर
"धर्म-युद्ध नव्हे हें" ३६

सकळ दळ-भार एकवटला
भोंवता पहावया पाळा पडला
त्यांत जयद्रथें हाणीतला
अभिमन्यु लातेनें ३७

द्रोणें धिक्कारिलें जयद्रथा
"दुर्जना, वीरा हाणिशी लत्ता
त्या अभिमन्यें बाणावरीं झोडितां
पळालासी सत्वर" ३८

कौरव गेले समस्त
अभिमन्य धायें विलपत
श्रीहरीचें स्मरण करीत
वाट पहात पार्थाची ३९

पांडव-दळीं आक्रान्त दारुण
धर्मराज करी रुदन
आतां येईल अर्जुन
त्यासि काय वदन दाखवूं ४०

दिवस गेला अस्तमानासी
वधून येतां समसप्तकांसी
अप-शकुन पार्थासी
मार्गी येतां होतसे ४१

धर्माजवळी आला अर्जुन
अवघे देखिले अधो-वदन
पार्थ पुसे कोठें अभिमन्य
कां उत्साह मंदिरीं न दिसे ४२

धर्म बैसला अधो-वदन
कां मौन धरी, भीमसेन
म्हणे, 'संसार-यात्रा अभिमन्य
त्यजुनी गेला स्वर्गातें' ४३

रथाखालीं पडला अर्जुन
पुत्र-शोकें करी रुदन
मग श्रीकृष्णें संबोखून
सावध केलें पार्थासी ४४

अर्जुन अवघ्यांसी धिक्कारित
'जळो जळो तुमचा पुरुषार्थ
इतुके असतां माझा सुत
कां पाठविला संग्रामा' ४५

उपलव्य नगरीहुनी
उत्तरा, सुभद्रा, द्रौपदी धांऊनी
त्वरें आल्या बसोनी वहनीं
हृदय पिटीत अति-दुःखें ४६

सुभद्रेतें न धरवे धीर
शरीर टाकिलें पृथ्वीवर
‘ माझा अभिमन्य सुकुमार
दावा एकदां पाहीन मी ’ ४७

द्रौपदी म्हणे, अभिमन्या
हे वत्सा, सद्‌गुण-निधाना
हे तरुणा, तुझी अंगना
उत्तरा आतां करील काय ४८

उत्तरेच्या गळां मिठी घालिती
सुभद्रा द्रौपदी शोक करिती
तें देखोनि पार्थ श्रीपती
शोकार्णवीं बुडाले ४९

बोले सभुद्रा वेल्हाळ
‘ इतुके वीर असतां सबळ
सांपडला व्यूहामाजी बाळ
पाठी कोणी न राखेची ५०

विकळ पडतां माझें किशोर
जयद्रथें दिधला लत्ता-प्रहार
धिक् गांडीव धिक् तूणीर
धिक् यदु-वीर पार्थ पैं ’ ५१

यावेगळा अपरिमित
धर्माच्या शोकासि नाहीं अंत
तों व्यास आणि ब्रह्मसुत
नारद-स्वामी प्रकटले ५२

सर्वांचेंही समाधान
करी सत्यवती-हृदय-रत्न
म्हणती, " सुभद्रे तूं सुजाण
भगिनी होसी सर्वोत्तमाची ५३

वीर-पत्नी वीर-जननी
वीर-कुमरी यदुवीरभगिनी
अभिमन्यु पडला समरांगणीं
शोक न करी तयाचा ५४

ऐकें धर्मा भीमार्जुना
शोक करितां कोण्या कारणा
हे अवघी ब्रह्मांड-रचना
लया जाणार कल्पान्तीं ' ५५

असो, व्यासें सांगोनि बहुत कथा
सावधान केलें कुंती-सुतां
नारद आणि श्री-शुक-पिता
अंतर्धान पावले ५६

सुभद्रेसी म्हणे पार्थ
उद्यां वधीन जयद्रथ
कौरव-दळ समस्त
तृणवत् जाळीन पैं ५७

कोठें पडला रणीं बाळ
तो पहावया पार्थ घन-नीळ
निघते झाले तात्काळ
निशीमाजी तेधवां ५८

रथ वेगें चालविला
चंद्र-ज्योतीचा प्रकाश केला
रण शोधावया निघाला
पार्थ-वीर तेधवां ५९

देखती सौभद्रें पाडिलें रण
आश्चर्य करिती कृष्ण-अर्जुन
बहुत केलें रण-शोधन
परी बाळ कोठें न सांपडे ६०

तों मंजुळ हरीचें स्मरण
ऐकतां होय अर्जुन
‘ हे जगन्निवास मन-मोहन
मधु-सूदन श्रीहरी ’ ६१

अभिमन्याचे शब्द कोमळ
अर्जुनें वोळखिले तात्काळ
रथारूढ पार्थ घन–नीळ
आले जवळ धांवोनी ६२

सौभद्रें नेत्र उघडिलें
पार्थं आंग धरणीसी टाकिलें
अभिमन्यासी पोटीं धरिलें
पार्थें मांडिलें शोकातें ६३

“ अरे माझीया सुकुमारा
बाळया अभिमन्या सुंदरा
मजवांचुनि राज-कुमारा
कां आलासी ये स्थळीं ६४

तैं पार्थाचिये कानीं
हळूच अभिमन्य बोले वाणी
" मी पडलों घोर धरणीं
याचा खेद मज न वाटे ६५

मी निचेष्टित पडलों येथें
मज लत्ता-प्रहार केला जयद्रथें
तेणें सर्वांग तिडकतें
हें मज दुःख अति भारी " ६६

ऐसें ऐकोन वचन
मग संबोखी वीर अर्जुन
" तुझें उसणें घेईन
कांहीं खेद न करावा ६७

बा रे सुकुमारा परियेसीं
उद्यां जरी न मारीन जयद्रथासी
तरी अग्निकाष्ठ भक्षीन निश्चयेंसी
तुझीच आण अभिमन्या " ६८

तों न्याहाळीत कृष्ण-वदन
मुखीं करीत हरि-स्मरण
अभिमन्यें सोडिला प्राण
श्रीकृष्ण आपण पाहतसे. ६९

* * *

# सावित्री–आख्यान

## मोरोपंत

धर्म पुन्हा त्यासि म्हणे, ' मार्कंडेया मुनीश्वरा आर्या,
आढळली तुज लोकीं सत्त्वाढ्या आमुची जशी भार्या ' १

मुनि त्यासि म्हणे, ' होती सावित्रीनाम अश्वपति-तनया
तच्चरित श्रवण करीं, ऐकाया योग्य साधु, पतित न या २

होय प्राप्त विधि-स्त्री-सावित्रीच्या वरेंचि ती राया
यत्कीर्ति जना म्हणती, ' कर देत्यें रे अघाब्धि-तीरा या ३

झाली भक्त-सुता ती श्रीसावित्रीच उद्धरायाला
श्री क्षीरधिला जन्मुनि जें दे यश तेंच शुद्ध रायाला ४

अश्वपति म्हणे, ' वत्से चिंता मज हेचि एक परमा गे
झालीस दान-योग्या परि कोणीही तुला न वर मागे ५

जा शोधुनि ये वत्से वरुनि मनें मानिल्या कुलीनातें,
कीं तुजकडेचि आहे शत-पुत्रांचेंहि गे मुली नातें ' ६

' स्व-वर पहा जा ', ऐसें योग्य जनीं तोचि तीसचि वदाया
गुरुच्या वचनें गेली आपण घेऊनि ती सचिव दाया ७

अनुरूप वर विलोकुनि आली तों त्या नृपा परम-हर्षी
सांगत होता सु-कथा श्री-नारद जो कृपा-पर महर्षी ८

ती दोघांतें वंदी, तों तीस ब्रह्म–काय–भू पाहे
स-स्मित असें पुसे कीं, ‘ त्वत्तनया होय काय भूपा हे ९

कोठें गेली होती श्वशुर-गृहाहूनि काय आणविली
हा ! सचिवांनीं आझुनि दानोचितता इची न जाणविली ’ १०

भूप म्हणे, ‘ परिसावें तेंचि तुवां सर्वसाधु-कुल-गीतें
म्यां पाठविलें होतें स्व-वर पहाया स्वयें स्व-मुलगीतें ११

वद वत्से, काय कसें ? वर बरवा पाहिला ? न लाजावें
या गुरुनें ‘ धन्य ’ असें म्हणुनि स्व-मुखें तुला मला, जावें १२

सांगे ती सावित्री, ‘ नृप द्युमत्सेन शाल्व-पति आहे
जरि वृद्ध अंध रिपु-हृत-राज्य वन-स्थहि न काळजी वाहे १३

कुल-शील-सत्त्व-गुण-निधि तो पुत्र-कलत्र-मात्र-परिवार
परि वार सर्व सण त्या, कीं मथिला स्वांतर-स्थ अरि-वार १४

तो श्वशुर मानला मज, चित्तें त्याचा कुमार म्यां वरिला
जरि लाजविति सख्या, अनुसरली गौरी हरा, न त्या हरिला १५

नारद म्हणे, ‘ नृपा हे चुकली योजूनि सत्यवान् नवरा
न वरावा जरि गुणवान्, योजू अन्या, असे उणें न वरा १६

भूप म्हणे, “ सर्वज्ञा देवा उमजे असेंचि सांग मला
गुणवान् युवा कुल-ज-वर जरि तरिहि तुला आ-योग्य कां गमला १७

काय इणें न धरावें अ-धन-त्यें भूप-जन-वरा जीवीं
कां न प्राशावें मधु मधुपानें कूप-ज-नव-राजीवीं ” १८

मुनि सांगे, “ वर्षान्तीं येइल त्या भूप–पुत्रका व्यसु–ता
अन्य वरू, वृतहि कच त्यजुनि वरी भूप-पुत्र काव्य-सुता ” १९

भूप म्हणे, 'न वरावा वत्से जरि सु-गुण-सागर ल्वायु
शीतल मंद सु–गंधहि वद सेवावा कसा गरल वायु.' २०

ती सु-मति म्हणे, 'ताता न त्यजुनि पयोधिला नदी परते
न पतंग-चित्त-वृत्ति क्षणही रत्नीं, त्यजूनि दीप, रते २१

वरिला तो वरिलाचि, स्पर्शावा या न अन्य कायातें
हा दृढ निश्चय माझा, स्तवितील कुलीन कन्यका यातें २२

आयुष्य असो किति तरि, मज तदितर पुरुष तुज-समचि राया
मन न चळेलचि येइल जरि चरचर हा गळा यम चिराया, २३

देवर्षि म्हणे, 'त्यासचि दे साध्वी-व्रत-परा सुता राया
शुचि निश्चयाहुनि अधिक अमृत–रस नसे परासु ताराया २४

होतें सद्धर्माच्या कासेला लागतां सदा शिव हो
येतों, बसा, प्रसन्न प्रभु मृत्युं-जय तुम्हां सदा-शिव हो, २५

गेला मुनि जो भगवत्–कीर्ति-महा-काम-धेनुचा दुहिता
नेउनि दिली नृपें ती सद्विधितें सत्यवत्करीं दुहिता २६

झाली तपोवनांत स्वीकारुनि वल्क तापसी ते, तें—
अद्भुत सत्त्व तिचें बा, तितका नव्हताचि ताप सीतेतें २७

वेद श्वशुर, श्वश्रू स्मृति, ती स्वाचार-पद्धतीच सती
मुनि म्हणति, 'या नृपाच्या उटजीं सिद्धि स्नुषा-मिषें वसती' २८

तो सत्यवान् म्हणे, 'हे पितृ-राज-श्री तपोवनांत पती—
हो आपन्मुक्त म्हणुनि बहुधा आपणहि या मिषें तपती २९

तत्सद्गुणें प्रमुदितें झालीं केवळ मनांत न तिघें तीं
सकळें स-देव-तापस-वृंदेंहि तपोवनांत नति घेती ३०

ती स्व-मनांत म्हणे, 'तुज तनु रडविल सर्वकाळ, जीवा हे
सोड इला वेड्या, बुध न कु-संगति धरुनि काळजी वाहे ३१

ऐसें चिंती, बाळे, मोजी उर्वरित दिवस महिने ती
नसतें तसें, तरि सुखें वय, भोगुनि तदधिक श्रमहि, नेती ३२

उरतां चार दिवस ती करि वांचाया पति व्रतारंभा
तन्नियमीं प्रिय-वाक् कीं शुकीं विलोकी न तीव्रता रंभा ३३

श्वशुर म्हणे, 'त्रि-दिन-व्रत झालें कीं ? वंश धन्य केला गे
कर पारणा, क्षुधा बहु पूर्ण-वया-माजि कन्यके लागे ३४

ती, 'संकल्पीं आहे सूर्यास्तीं पारणा करायाची'
ऐसें श्वशुर-श्वश्रू-चरणांतें जोडुनी करा याची ३५

फल-मूलार्थ निघे पति, त्यासि म्हणे, 'मजहि सत्तमा न्या हो
वन पाहेन, तुम्हां हे न प्रथम-प्रार्थना अ-मान्या हो, ३६

चित्राश्व म्हणे, 'दयिते गमली वन-सरणि काय कोमळ ती
श्रमशिल, शिबिका-स्थाही दुर्ग-वन-पथांत बायको मळती ३७

उपवास ती दिसांचा तूं आधींच प्रिये सु-मृदुला गे
न्यावें कसें चरण-युग नवनीता-परिसही सु-मृदु लागे ३८

मज सोसेल कशी, जी न पशवे स्त्री-व्यथा नरा नीचा
श्रम-दा प्रमदा-हृदया कथितीहि कवी कथा न रानींच्या ३९

येणारचि तरि साध्वी, श्वश्रू-श्वशुरांसि पूस मग ये, तें-
योग्य तुज मजहि, मानिति गुर्वाज्ञाधिक सु-बुद्धि न गयेतें' ४०

सावित्री त्यांच्याही आज्ञेतें तत्प्रसाद साधुनि घे
उटजांतूनि सतीसह वंदुनि तो स्व-पितृ-पाद साधु निघे ४१

ती न स्त्री, रक्षाया त्यासि निघे आर्त्त-मूर्ति जनकाशी
परमशिव जीत नांदे म्हणुनि जिला म्हणति सुज्ञ-जन ‘ काशी ’ ४२

जे पक्षी जे श्वापद-संघ अधिष्ठूनि कानना वसती
त्यांचें तद्वचनामृत-पानार्थ पुसेल कां न नांव सती ४३

पात्र भरूनि फळांनीं काष्ठें फोडी वनांत, सत्त्व-रतें
पाहूनि तत्कलत्रें स्मरलें मुनि-वच मनांत सत्वर तें ४४

जों साध्वी हळुच म्हणे, ‘ हा नाथा नियत-मान-दा रुचिरा
मूर्ति श्रमत्ये, भ्रमत्ये मति, कीं जी प्रियतमा न दारु चिरा ४५

तोंचि म्हणे तो, ‘ उठल्या करिल्या स्मृति-हानि वेदना, लागे
शूल-शत शिरीं, जाणों सखि अ-क्षम हा निवेदनाला गे ४६

तुझिया मृदु-शीतांकीं शिर ठेवुनि वाटतें निजावें गे
त्वत्स्पर्श अमृत म्हणवुनि या मत्तापें पळोनि जावें गे ४७

मांडी देउनि पतिचें मस्तक हस्त-कमळें सु-धी रगडी
दे धैर्य सतीस तिचा निज-निश्चय जो खरा सु-धीर गडी ४८

सीता दश-कंठा जसि तशि सत्त्वें भी न तीव्र-तापा हे
तों पाश-पाणि-पुरुषा-प्रति पति-पार्श्वीं पति-व्रता पाहे ४९

क्षितिवरि पति-शिर उतरुनि स-विनय झडकरि उठोनि कर जोडी
नमुनि म्हणे, ‘ देव तुम्हीं, असि कैची अन्य दर्शनीं-गोडी ५०

केलेंचि धन्य दर्शन-दानें येऊनि कानना मातें
अजि देवेश, निवावे बहु हे सेवूनि कान नामातें ’ ५१

देव म्हणे, “ सति यम मी ”; “ कां आलां ?” “न्यावया तुझ्या पतीतें ”
“ हें दूत-कार्य कीं जी ”; “ जें सेवक-कृत्य वेगळें सति तें ५२

हा सत्यवान् सु-कृतवान् गुणवान् त्यावा न सेवकांनीं कीं
ज्या कर्मीं योग्य-त्व स्वामीचें तें न सेवकांनीं कीं ” ५३

अंगुष्ठमात्र पुरुषाप्रति यम पाशेंकरूनि आकर्षी
तैं “ हाय हाय ” म्हणती बहु सद्गद्-कंठ साश्रु नाकर्षी ५४

त्यांतें बांधुनि घेउनि यम-धर्म प्रभु निघे अवाचीतें
म्याला सतीस बहुधा जें ब्रह्म-लिखित बरें न वाची तें ५५

त्यामागें तीहि निघे धर्म म्हणे, “ भागलीस, जा परत
स्नेह-ऋण फेडिलें त्वां, करुनि स्व-पति-क्रिया रहा स्मरत ५६

साध्वी म्हणे, “ प्रभो पति जिकडे जावीच मूर्ति हे तिकडे
स्व-गुरु-व्रत-प्रसादें मद्गतिसि न रोधितील हेति कडे ५७

संत म्हणति, ‘ सप्त-पदें सह-वासें सख्य साधुशी घडतें ’
सन्मित्रचि न व्यसनीं अन्याखिल-मित्र संकटीं पडतें ” ५८

तुज संत म्हणति, “ पितृ-पति सम-वर्ती धर्म-राज बापा, हें
सत्य यश म्हणुनि याही कन्येसि दया करूनि बा पाहें ” ५९

ऐसें सती वदे, ते बोल शशी, देव तोहि सागर-सा
प्रेमें उचंबळे हो, धरि कारुण्यें द्रवासि साग रसा ६०

धर्म म्हणे, “ साध्वी बहु श्रमलीस स्वाश्रमासि जा मागें
जो मागशील तो वर देतों, घे, इष्ट तें मला मागें ” ६१

“ देवा व्हावे चक्षुस्तेजस्संपन्न आश्रमा-माजी ”
मामाजी ऐसें घ्या मति साहेनाचि त्या श्रमा माजी ६२

“ दिधलें ” धर्म म्हणे, परि जातचि होती तशीच मागूनी
देव म्हणे, पुनरपि, “ जा वत्से, घे वर दुजाहि मागूनी ” ६३

ती सु-मति म्हणे, " राज्य भ्रंशें बहु खिन्न सासरा होतो
पावुनि भवत्प्रसादें निज-पद बहु काळ सासु राहो तो " ६४

" होइल जा ", धर्म म्हणे परि करि अनु-गमन स-बहु-मान सती
कीं जी हंसी हंसावांचुनि मानील न बहु मानस ती ६५

धर्म म्हणे, " गे बाई करिसी कां व्यर्थ या श्रमास, तिजा—
वर घे, नकोचि मागों, आलीस सु-दूर, आश्रमा सति जा " ६६

त्यासि म्हणे सावित्री, " संपन्न असो पिता सु-तनय-शतें
हा लक्ष्मी-सुत कवि किति लिहिल, सतीचें उमा-सुत न यश तें ६७

उडुपा उडुसें धर्मोदार्या लाजोनि अभ्र मुरडे हो
सावित्रीच्या सु-यशीं न दिसे पति म्हणुनि अभ्रमु रडे हो ६८

ऐसें शिरोनि चित्तीं घेउनि भारीहि तीन वर देवा
सोडीना, सोडविल्यावांचुनियां ती सती नवर-देवा ६९

देव म्हणे, " तूं स्वच्छा स्व-च्छायाशीच मागतीं सति घे
वर घेउनि जा चवथा देतों मागोनि मागतीस तिघे ७०

" व्हा सु-प्रसन्न, ' वत्से तुज हो सुत-शत ' असें वदा, न्या हो
सु-यशो-राशि स्वर्गी, लज्जा-प्रद सुर-नगा वदान्या हो " ७१

भुलला धर्म द्युतिला धृतिला मतिला तिच्या तथा स्तुतिला
न करुनि विचार जावी मागें म्हणवुनि म्हणे " तथास्तु " तिला ७२

हळुचि म्हणे सावित्री, " पावेन वरेंकरूनि संततिला
तुमचा प्रसाद म्हणुनि प्रेमें गातील सर्व संत तिला ७३

तरि मत्पति मज द्या कीं तुमची पावेल मान सत्या गी
यश रक्षाया प्राणहि सत्य-गुणासक्त-मानस त्यागी " ७४

रोमांचित धर्म म्हणे, " बाई गातिल तुझा प्रभाव सती
पतिशीं अ-विना-भावें वसशिल रविशीं जशी प्रभा वसती ७५
राज्य चतुःशत वत्सर करिल तुझा कान्त सोडिला जा गे
हा स्वन्महिमा जागो, सीतेनें जेविं जोडिला जागे " ७६
तें वृत्त वर्तमान स्वल्पहि न कळे तिच्या बरा पाशीं
जातां यम सावित्री धांवत आली कलेवरापाशीं ७७
पुनरपि तशीच बसली अंकीं घेऊनियां स्वपति-शिर ती
जशि चेतना धवांगीं होय, इचीं जीवितांत मति शिरती ७८
वन–देवता म्हणति त्या, " बा गा मूर्च्छोत्थिता चकोरा हो
स्वस्थ, ज्योत्स्ना कीं हे, द्रुत उठचि नमावया नको राहों " ७९
नेत्रें उघडुनि पाहे तो दयितेच्या मुखासचि वनीं, ती
दे त्यासि जसि नृपासि व्यसनीं देती सुखा सचिव–नीती ८०
स्रीस म्हणे, " सु-भगे त्वां मृदु मांडी मांडिली उशी, रमला
आत्मा निद्रेशीं, रवि मावळला लागला उशीर मला ८१
पुरुष श्याम महौजा ओढित होता बळेंचि मजला जो
तो कोण, पुसेन तथा नसतां स्वप्नोत्तमर्ण मज लाजो " ८२
" कथिन उद्यां, झाली बहु रात्रि, बळ असेल तरि उठा राया
देत्यें हात चला जी, घेत्यें फळ–भाजना कुठारा या " ८३
नेत्रें पुसोनि पदरें पतिस म्हणे, " भेटतील मामाजी
' बाई ' म्हणतां रडतां पडतां दाटून कां श्रमामाजी ८४
भेटवित्यें ताताला मातेला, या उठा " असें वदली
आली घेउनि, अद्भुत वाटे कलभाशि सांवरी कदली ८५

— **वनपर्व**

* * *

## आ धा र ग्रं थ

१. एकनाथी भागवत
२. आदिपर्व
३. वामन पंडितकृत कवितासंग्रह– भाग ३ रा
४. दमयंती स्वयंवर ( प्रियोळकर प्रत )
५. पांडव-प्रताप
६. वनपर्व

# टीपा

# एकनाथ

एकनाथांनी भागवत धर्मात आपल्या दूरदृष्टीने व समन्वयशील वृत्तीने नवे चैतन्य आणले. संस्कृतापासून दूरावलेल्या समाजाला वेदान्त स्वभाषेत कळेल अशा रीतीने सांगून, भागवत धर्माला नवी शक्ती व प्रेरणा मिळवून दिल्या. ' जे कथा परमार्थ ज्ञानगाथा ' तिचा आधार घेऊन, अध्यात्म सुगम केला. एकनाथांच्या जीवनात एक सामाजिक समतेचा मूल्यविवेक आढळतो. त्यांच्या दृष्टीचा परिणाम आख्यानक कवितेच्या स्वरूपावर झाला. एकनाथांच्या पूर्वी भागवत धर्मीय संतांनी कथेचा आश्रय घेतलेला दिसतो. आत्मनिष्ठ अभंग-वृत्तीतून एकनाथपूर्वकालीन संतांनी अध्यात्म सांगितला. नामदेव बहुजनातील विकसित झालेले व्यक्तिमत्व खरे, पण त्याच्या सभोवतीच्या जनतेची मानसिक अवस्था अशी विकसित झाली नव्हती. साक्षात्कारी अनुभव हा व्यक्तिनिष्ठ असल्याने त्याच्या उंचीवरून तत्कालीन समाजाची उंची मोजणे चुकीचे ठरेल. त्याचे अभंग धुंद होऊन गायिले गेले असतील, पण सामान्य मनाला अध्यात्म अगम्यच राहिला होता. स्थूल घटनांच्या द्वारे एखादे जीवनमूल्य प्रतिपादन केले तर अपरिष्कृत मनाला ते लवकर कळते, हे भागवत धर्मीय संतांत एकनाथांनी प्रथम ओळखले व अभंगासारख्या कृतीतून व्यक्त होणारा अध्यात्म त्यांनी कथेच्या द्वारे सांगण्याचा प्रयत्न केला. प्राचीन साहित्यातील या प्रवृत्तीला कथेच्या द्वारे वाहती करून एकनाथांनी सारस्वतात एका नव्या युगाला प्रारंभ केला.

एकनाथांनी प्राचीन आख्यानक कवितेचा प्रवाह सामान्य जनापर्यंत नेऊन पोचविला. कथेच्या आश्रयाने मानवी जीवनमूल्यांचा आविष्कार करण्याचा एकनाथी तंत्राचा परिणाम प्राचीन आख्यानक कवितेवर झाला. एकनाथांच्या

कालखंडापासून प्राचीन आख्यानक कवितेला मुक्तद्वार मिळाले व तिचा विकास होऊ लागला. याचा परिणाम महाराष्ट्रातील इतर कवींवर झाला, व त्यांनी एकनाथांच्या अनुकरणाने—पण स्वतंत्र आख्यानक कविता निर्माण केली. एकनाथांनी नव्या दृष्टीने आख्यानक कवितेला केवळ वळण दिले नाही, तर आख्यानक कवींची लक्षात घेण्यासारखी एक परंपरा निर्माण केली. इतर काळात झालेला श्रीधर हा याच परंपरेतील श्रेष्ठ कवी झाला.

सामाजिक अन्यायाची जाणीव जितकी तीव्रतेने या काळात त्यांना झाली, तशी समकालीन कवीला झाली असल्याचे आढळत नाही. सामाजिक जीवनात प्रत्ययाला येणारी दांभिकता, ढोंग त्यांनी भारुडांची रचना करून लोकांच्या निदर्शनास आणले. अनेक व्यथित आत्म्यांचे मूक आसू त्यांनी भारुडांतून वेचलेले आहेत. भारूड हा समूहजीवनाचा उद्रेक आहे. भारुडे ऐकताना समाजमन एकतान होते, व ज्या पद्धतीने या भारुडांच्या संपादण्या आजही म्हटल्या जातात त्याचा इच्छित परिणाम घडून येतो.

भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी-स्वयंवर, स्फुट अभंग, पदे, गौळणी अशी विविध रचना त्यांनी केली आहे. पण नाथांच्या प्रतिभेचा विलास भागवतात दिसतो. तत्त्वज्ञान हे सामान्य जनतेच्या आकलनाचा विषय करायचे असेल तर ते आख्यानक रूपाने निरूपले जावे म्हणून नाथांनी यात या रचना-प्रकाराचा आश्रय घेतला आहे. भागवताच्या सातव्या अध्यायात 'कपोत-कपोती आख्यान' आले आहे. श्रीकृष्ण उद्धवास उपदेश करीत असता त्यांनी अवधूताच्या चोवीस गुरूंचे वर्णन केले आहे. पृथ्वी, वायू, जल, आकाश, अग्नी, चंद्र, सूर्य यांच्या अनुकरणीय गुणांचे विस्तृत वर्णन करून, भगवंताने स्त्री-सहवास का त्यागावा याविषयीचे विवेचन केले आहे. ते करीत असता त्यांनी कपोत-कपोती आख्यान निवेदन केले आहे. या आख्यानातून नाथांनी मानवी जीवनाचे, प्रतीके घेऊन वर्णन केले आहे. यातील घटना व प्रसंग धावते वर्णिले असल्याने सबंध आख्यानात कथेचा ओघ कायम टिकला आहे. कपोत व कपोतीच्या अंतःकरणातील आर्तता टिपण्यात नाथांचे प्रतिभासामर्थ्य प्रकट होते. उत्कट प्रसंग, वातावरणाची विषयानुरूप निर्मिती, आणि रेखीव स्वभाव-

चित्रे यांनी हे आख्यान सरस उतरले आहे. जाळे खांद्यावर टाकून निघालेला पारधी–हे शब्दचित्र वेधक आहे. नाथांच्या काव्याचे सारे गुणविशेष या आख्यानात प्रकटले आहेत.

* * *

# मुक्तेश्वर

प्राचीन आख्यानक कलाकवींच्या परंपरेतील मुक्तेश्वर हा श्रेष्ठ कवी होय. एकनाथांच्या मुलीचा हा मुलगा. त्याच्या वडिलांचे नाव चिंतामणी, व मुद्गल हे त्याचे व्यक्तिनाम आहे. मुक्तेश्वर हे त्याच्या आराध्यदेवतेचे नाव असून, महाभारत रचताना त्याने ते कवी म्हणून धारण केले, व त्याच नावाने मराठी साहित्यात तो प्रसिद्ध आहे. मुक्तेश्वराचा जन्म पैठणास झाला, व त्याच्या जीवनाचा बहुतेक काळ येथेच गेला. नाथांच्या संस्कारपूत जीवनाचा वारसा त्याला लाभला. आपल्या लेखनातून विश्वंभराचा– दत्ताचा उल्लेख तो करतो, यावरून मुक्तेश्वर दत्तसंप्रदायी असावा. एकनाथांचे गुरू जनार्दन स्वामी दत्त-संप्रदायी असल्याने मुक्तेश्वरालाही दत्तसंप्रदायाची ओढ त्यांच्या चरित्रामुळे लागली असावी. औरंगाबादपासून काही अंतरावर असलेल्या कायगाव टोके येथील गोदा–प्रवरेच्या अत्यंत रमणीय संगमावर सिद्धेश्वर व मुक्तेश्वर यांची प्राचीनतम देवालये आहेत. येथील मुक्तेश्वर हेच कवी मुक्तेश्वराचे आराध्य-स्थान असणे संभवनीय आहे. स्थान–पोथीत पूर्वाभिमुख असलेल्या मुक्ते-श्वराच्या देवालयाचा जो उल्लेख आलेला आहे तो गोदा–प्रवरेच्या काठा-वरील याच देवालयाचा असावा.

मुक्तेश्वराचे सारेच वाङ्मय अजून उपलब्ध झाले नाही. संक्षेप–रामायण हा मुक्तेश्वराचा पहिला ग्रंथ होय. प्राचीन संस्कृत कवींच्या ब्याच श्लोकांचे भाषान्तर यात त्याने केले आहे. काव्यदृष्ट्या हा ग्रंथ सामान्य आहे; त्याच कल्पनांची पुनरावृत्ती यात ठिकठिकाणी झाली आहे. शब्दांची व यमकांची ओढाताण, रचनेतील शिथिलता व अनेक व्याकरणदोष यांमुळे मुक्तेश्वराचा हा ग्रंथ सामान्य असा झाला आहे. संपूर्ण महाभारतावर याने मराठीत

रचना केली असावी, पण याच्या नावावर अजून तरी पाच पर्वे– आदी, सभा, वन, विराट व सौप्तिक उपलब्ध आहेत; व हरिश्चंद्राख्यान, गजेन्द्रमोक्ष, विश्वामित्र-भोजन, अर्जुनकामपूर्ति, शुकरंभा-संवाद, कालियामर्दन, गरुडगर्व-परिहार, अहिमही-आख्यान ही आख्याने, व भगवद्गीता, एकनाथचरित्र, दत्ताची पदे, आरत्या एवढी रचना त्याने केली आहे.

मुक्तेश्वर हा भारत-रचनेमुळे आज प्रसिद्ध आहे. व्यासाचे महाभारत एक प्रचंड सोन्याचा डोंगर आहे, त्या सोन्याचे देशभाषेत मी अलंकार तयार केले, अशा सार्थ अभिमानाने त्याने भारताची रचना केली आहे. ओघवती, रसाळ व प्रसादपूर्ण अशी भाषा 'नवरसांची मंदाकिनी' आहे. भावना व कल्पना यांचा कलात्मक आविष्कार मुक्तेश्वरी रचनेतून झाला असून शृंगार, वीर, रौद्र, करुण या विविध रसांनी त्याची कविता ओथंबली आहे. विषय खुलविण्यासाठी मूळ महाभारतात नसलेले अनेक प्रसंग त्याने चित्रित केले आहेत, त्यामुळे महाभारतावर अनेकांनी रचना करूनही मुक्तेश्वराच्या महाभारताइतकी काव्यात्मकता क्वचितच इतर ग्रंथांना आली आदिपर्वामधून येथील आख्यान संपादून घेतले आहे.

आख्यानक कवींपैकी मुक्तेश्वर हा खऱ्या अर्थाने कलाकवी आहे. त्याच्या काव्याच्या निर्मितीमागील प्रेरणा या सामाजिक नाहीत, वा कोणत्याही प्रयोजनाकरिता त्याने काव्यनिर्मिती केलेली नाही. एकनाथांच्या जीवनाचा व लेखनाचा समोर आदर्श असताही त्याने नाथांचे वळण गिरविले नाही. नाथांच्या काव्यनिर्मितीमागील प्रेरणा ही उद्‌बोधनाची होती, नव्हे मराठी कवितेच्या जन्मक्षणापासूनच ही प्रेरणा तिच्यामागे आहे. मुक्तेश्वराने उद्‌बोधनाच्या जाणिवेची मराठी कवितेवरील पकड सैल केली. मराठी आख्यानक कवितेत कलात्मक जाणिवेचा प्रवाह त्याने आणला. त्याच्या काव्यामागील ही जाणीव मराठी कवितेलाही उपकारक ठरली. काव्याकडे पाहण्याची ही नवी दृष्टी मुक्तेश्वराच्या लेखनापासून उदयास आली. मराठी काव्याच्या अभिरुचीत हे सूक्ष्म स्थित्यंतरच घडून आले. या सूक्ष्म बदलाची जाणीव मुक्तेश्वराला नसेलही, पण त्याच्या मनात नाथाहून वेगळी काव्य-रचनेची कल्पना असावी.

मुक्तेश्वराच्या मनात असलेल्या या जाणिवेचा परिणाम आख्यानक कवितेच्या स्वरूपावर झाला. आख्यानक कवितेस अनेक नवे विषय त्याने दिले. त्याच्या प्रतिभेचे निर्मिति-सामर्थ्य आपल्या प्रत्ययास आल्यावाचून रहात नाही. आख्यानातील त्याचे वातावरणनिर्मितीचे, स्वभावपरिपोषाचे, कथा निवेदन करण्याचे व प्रसंग चित्रित करण्याचे भाषेचे सामर्थ्य अनन्यसाधारण आहे. दुष्यंत, शकुंतला, दमयंती, शंतनू, मत्स्यगंधा, गंगा, शर्मिष्ठा, देवयानी, दुर्योधन या पात्रांचे लेखन त्याने इतके रेखीव केले आहे की, वाचकाच्या मनावर त्याचा ठसा उमटल्यावाचून राहात नाही. सौप्तिक पर्वातील बुद्धिमान, राजधुरीण, न्यायशील धर्माच्या व्यक्तिचित्रणातून मानवी भावनांचा आविष्कार करून मुक्तेश्वर धर्माविषयीची आपुलकी, जिव्हाळा व जवळीक निर्माण करतो। नळाने त्याग केल्यानंतरची दमयंतीची करुण अवस्था, तिची व्यथा मुक्तेश्वराने उत्कटतेने वर्णन केली आहे. शंतनू–गंगेचा विलास, ययाती–शर्मिष्ठा–देवयानी यांच्यातील प्रीतिभावनेच्या विविध छटा, विश्वामित्र–मेनका यांच्या मीलनातील उत्तानता, सत्यवतीच्या मनातील भीती व स्त्रीसुलभ लज्जा इत्यादी भावनांना कलारूप देताना मुक्तेश्वराची अभिजात सौंदर्यदृष्टी व्यक्त होते. विविध भावनांची गुंतावळ व त्यांचे उत्कट चित्रण हा मुक्तेश्वराचा विशेष आहे. विविध भावनांचे रंग एकाच आख्यानात इतके मिसळलेले असतात की, त्या रंगांचे इंद्रधनुष्यच त्यांच्या संपूर्ण आख्यानातून आकारते. सत्यवतीच्या जीवनातील चढउताराची किती तरी हृदयस्पर्शी चित्रे त्याने काढली आहेत. निसर्गचित्रण हा प्राचीन आख्यानक कवींत केवळ मुक्तेश्वराचा अनन्यसाधारण गुण आहे. निसर्गातील बदलत्या विविध दृश्यांचे सजीव चित्रण त्याने आपल्या रचनेतून केले आहे. कथा निवेदण्यात या वर्णनाने खंड पडतो हे खरे, पण कथेचा परिपोष होण्याकरिता तेथील वर्णनांची अनुरूपताही जाणवते. कथेचे निवेदन करताना मुक्तेश्वर शब्दांच्या बाबतीत कृपण नाही. नावीन्यपूर्ण शब्दांची श्रीमंती मुक्तेश्वराला लाभली आहे. कथा संक्षेपाने निवेदन करावी असे त्याला वाटतच नसावे. कथा निवेदण्याचा ओघ सुरू झाला की, त्याला अनेक निसर्ग-भाववर्णने येऊन मिळतात व कथा विस्तृत उतरते. मोरोपंताच्या लेखनातून आढळणारा संक्षेप व त्यामुळे जाणवणारा कोरडेपणा मुक्तेश्वरात नाही.

शब्दार्थ मोतियांचा चारा
चरोनि देती सुखढेंकरा
आणि पुढे प्रार्थिती मुक्तेश्वरा
कथा सादर परिसावी

मुक्तेश्वराचे काव्य वाचताना अशी वाचकांची अवस्था होते हे खोटे नाही.

या विस्तृत वर्णनाच्या हव्यासामुळे आख्यानक कवी म्हणून अनेक दोष त्याच्या रचनेत येतात. कथेचे मुख्य सूत्र अनेकदा तो सोडतो व सभोवतीचे विस्तृत वर्णन देतो. आख्यानाच्या वातावरण निर्मितीला त्याचा चांगला उपयोग होत असला तरी वाचकाचे लक्ष मूळ प्रसंगावरून ढळते. त्यामुळे आख्यानाचा अपेक्षित परिणाम होत नाही. वातावरण निर्मिती ही केन्द्रस्थानी असलेल्या प्रसंगावर लक्ष ठेवून करावयास हवी. मुक्तेश्वराच्या अनेक आख्यानांतून तिकडे दुर्लक्ष झाले आहे. मुक्तेश्वराच्या आख्यानातून काल-विपर्यास आढळतो. याला त्याची राष्ट्रीय वृत्ती कारण असावी असे टीकाकार म्हणतात. पण त्याच्या राष्ट्रीय वृत्तीविषयी निश्चित माहिती नाही. त्याच्या काव्यावरून काढलेले हे अनुमान आहे. विस्तृत वर्णनाच्या ओघात तत्कालीन परिस्थितीचे चित्र तो उभे करतो. दुष्यंताच्या राज्याचे वर्णन करताना म्लेंच्छ, यवन, फिरंगी, इंग्रज या त्याच्या काळातील परकीय लोकांची यादी तो देतो. हे त्याचे अवधान की राष्ट्रीयत्व ? या लोकावर दुष्यंताचे स्वामित्व असल्याचे वर्णन मुक्तेश्वर करतो. मराठी भाषा व महाराष्ट्र देशाच्या वैभवशाली परंपरेबद्दल रामायणाच्या युद्धकांडात त्याने स्वाभिमानाचे उद्‌गार काढले आहेत. कालविपर्यासाचा दोष हा मात्र त्याच्या अनवधानाने आला आहे असे वाटते. मुक्तेश्वराच्या रचनेतून अतिशयोक्ती, उत्तानता, अश्लीलता व अनावश्यक पाल्हाळ दिसून येतो. पण त्याच्या गुणाच्या पर्वतात ह्या दोषाच्या टेकड्या लोपून जातात. विविध भावनांतील कलात्मक आविष्कार, व्यक्तिचित्रणातील सूक्ष्मता व मानवी स्वभावांची विविधता, संस्कारपूत भव्य कल्पना, रसाळ व ओघवती शैली या गुणांनी मुक्तेश्वराची कविता ही रसिकमान्य झाली. भाविकतेची दृष्टी न सोडता भारतातील कथांचे देशी भाषेत कलात्मक निवेदन करून, आख्यानक

कवितेला एकनाथी वळणाहून वेगळे वळण देणारा मुक्तेश्वर श्रेष्ठ आख्यानक कवी आहे. \

मुक्तेश्वराच्या आदिपर्वातील सोळाव्या अध्यायातून हे आख्यान संपादून घेतले आहे. व्यासांच्या महाभारतातील नाममात्र कथानक घेऊन मुक्तेश्वराने येथे स्वतंत्र निर्मिती केली आहे. व्यासांचा दुष्यंत विवाहाची इच्छा प्रथम प्रकट करतो व नंतर आपली वासना व्यक्त करतो. मुक्तेश्वराचा दुष्यंत शकुंतलेच्या सौंदर्यावर आसक्त होऊन नंतर विवाहाची इच्छा व्यक्त करतो. दुष्यंत आणि शकुंतलेचे व्यक्तिचित्रण अत्यंत आकर्षक करण्यात मुक्तेश्वराचे कौशल्य प्रकट झाले आहे.

पौरवकुळातील दुष्यंत नावाचा राजा एकदा मृगयेकरिता अरण्यात गेला असता, मालिनी नदीच्या काठावर त्याला कण्वमुनीचा आश्रम दिसला. मालिनीच्या परिसरात तपस्वी लोकांचे तपाचरण पाहून राजाने आदराने त्यांना नमस्कार केला व सैन्याला तेथेच ठेवून एकटाच कण्वमुनीच्या आश्रमात गेला. कण्वमुनी आश्रमात नसल्याने शकुंतलेने राजाचे स्वागत केले. शकुंतलेच्या सौंदर्याने व चतुर बोलण्याने राजा तिच्यावर मोहित झाला. " कण्व ऊर्ध्वरेता असता तू त्यांची मुलगी कशी ? " असा प्रश्न राजाने तिला विचारला. शकुंतलेने राजाला तिच्या जन्माची कथा सांगितली. ' विश्वामित्र नावाच्या ऋषीचे तपःसामर्थ्य भंग करण्याकरिता पाठविलेल्या मेनका नावाच्या अप्सरेपासून शकुंतलेचा जन्म झाला ' हे ऐकून राजा आनंदित झाला.

ही क्षत्रियकन्या आपली पत्नी व्हावी असे त्यास वाटले. आपली इच्छा त्याने शकुंतलेजवळ बोलून दाखविली. शकुंतलेनेही " तुझियाऐसी माझिया चित्ती, वर्तताहे अत्यंत प्रीती " अशी आपल्या अंतःकरणातील प्रीतिभावना स्पष्ट केली. वडिलांच्या आज्ञेवाचून विवाह करणे अनुचित असल्याचे व थोड्याच अवधीत कण्वमुनी आश्रमात आल्यावर त्यांना प्रत्यक्ष दुष्यंतानेच विचारावे असे तिने राजाला सांगितले. दुष्यंताने उपदेश करून तिचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. या वेळी शकुंतलेने सावधान राहून राजाकडून ' होणाऱ्या मुलाला युवराज करावे ' असा वर मागितला. राजाने शकुंतलेला तसे वचन दिले, व गांधर्वविधीने दोघे विवाहबद्ध

झाली. कण्वमुनी या वेळी आश्रमात परत येतील व आपल्याला शाप देतील या भीतीने राजाने शकुंतलेला राजधानीत सन्मानाने नेण्याचे आश्वासन दिले व तो एकटाच राजधानीत परत गेला. कण्वमुनी आश्रमात परत आले असता, दिव्यदृष्टीने त्यांना घडलेली घटना कळली. शकुंतलेची उचित निवड पाहून त्यांना आनंद झाला व तिला त्यांनी आशीर्वाद दिला.

पुढे शकुंतलेला आश्रमात मुलगा झाला. मुलगा मोठा झाला असताही राजाने तिला बोलावणे पाठविले नाही. इंद्रासारख्या पराक्रमी पुत्राची त्याच्या वडिलांशी भेट व्हावी म्हणून तपस्वी लोकांच्या बरोबर कण्वाने त्यांना दुष्यंताकडे पाठविले. राजसभेत मुलासह तिने प्रवेश केला. दुष्यंताला त्याच्या आश्वासनाची व वचनाची तिने आठवण करून दिली. पण राजाने तिला ओळख दाखविली नाही. उलट तिच्या आईवडिलांच्या चारित्र्याची आठवण देऊन त्याने तिची निर्भर्त्सना केली. आतापर्यंत शान्त वृत्तीने बोलणारी शकुंतला आपल्या आई–वडिलांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडताच खवळली. त्याच्याच भाषेत तिने राजाचा उपमर्द केला. निदान सर्वदमनाचा राजाने स्वीकार करावा अशी विनंती तिने केली, पण तिची विनंती राजाने नाकारली. संतप्त झालेली शकुंतला आश्रमात परत जाण्यास निघाली. इतक्यात आकाशवाणी झाली. शकुंतलेचा स्वीकार करण्याची दुष्यंताला आज्ञा केली गेली. 'माहीत असूनही लोकनिंदेच्या भीतीने आपण असे वागलो' असे सांगून दुष्यंताने तिचा स्वीकार केला.

मुक्तेश्वराच्या लेखनाचे सारे विशेष या आख्यानात प्रकट झाले आहेत. उत्तुंग कल्पनाशक्ती व प्रतिभासंपन्नता या गुणांनी मुक्तेश्वराचे लेखन सजिवंत झाले आहे. कथानिवेदनातून त्याच्या रसिक वृत्तीचा व सौंदर्यलक्ष्मी दृष्टीचा प्रत्यय येतो. दुष्यंत--शकुंतलेच्या जीवनातील अनेक नाट्यमय प्रसंगांतील सौंदर्य मुक्तेश्वराने शब्दाङ्कित केले आहे. सुवर्णकेतकीरत्नवर्णा असलेल्या शकुंतलेच्या रूपयौवनावर राजा आसक्त होतो व तिला पत्नी होण्याची विनंती करतो, या प्रसंगातील शकुंतलेच्या मनातील कातरता, सूक्ष्म संवेदना, भीतियुक्त उत्कट प्रीतिभावना याचा मुक्त आविष्कार मुक्तेश्वराने केला आहे. या प्रसंगातील काव्य व नाट्य आविष्कृत करताना त्याची भाषाही कमालीची

कोमल झाली आहे. शकुंतलेच्या मनात भावनांच्या लाटा निर्माण झाल्या असताही ती व्यवहार विसरत नाही. दुष्यंताच्या मनातील कामभावना औचित्यपूर्ण वर्णिली आहे. दुष्यंताची कामार्तता, उत्सुकता वर्णन करताना मुक्तेश्वराने भाषेत संयम पाळला.

दुष्यंत–शकुंतला यांच्या मनातील उत्कट प्रीतीचे दर्शन मुक्तेश्वराने हळुवार हाताने घडविले आहे. येथे वृत्तीने कोमल असलेली शकुंतला दुष्यंताकडे येते. त्या वेळी प्रखर ज्वालेसारखीच भासते. तिच्या मनातील त्वेषाला शब्दरूप देताना मुक्तेश्वराची प्रतिभा भव्य झेप घेते. ‘ अधर स्फुरती जेवीं पवनें, पद्मपत्रें थरकती ’ या ओळीतून आवेशयुक्त, पण स्त्रीसुलभ भावनांचा उन्मेष, अपरिहार्य अशा शारीरिक प्रक्रियेच्या वर्णनासह कलात्मक रीतीने चित्रित केला आहे. दुष्यंताने तिच्या आई–वडिलांवर चारित्र्यहीनतेचा आरोप करताच तीदेखील प्रखर शब्दांचे प्रहार त्याच्यावर करते. राजसभेत शकुंतलेच्या स्वभावातील सर्व कोमल, उदात्त, गंभीर, त्वेषयुक्त, प्रसंगी असहाय, स्वाभिमानी अशा विविध वृत्तिछटा मुक्तेश्वराने वर्णन केल्या आहेत. केळफुलाच्या गाभ्याहूनही कोमल असलेली मुक्तेश्वरी शैली येथे शकुंतलेच्या स्वभावातील छटांना रंग भरताना प्रखर होते. प्राचीन मराठी कवितेच्या इतिहासात मुक्तेश्वराने वर्णिलेला शकुंतलेचा राजसभेतील हा प्रवेश रुपेरी अक्षरांनी कायमचा नोंदविला जाईल.

मुक्तेश्वर मानवी स्वभावातील सूक्ष्म भावछटांना कलारूप देण्यात सिद्धहस्त आहे. वर्णनाचा पाल्हाळ लेखनातून जाणवतो, पण तेथे भारतीय कथांहून वेगळे रचनाकौशल्य व्यक्त होते. मालिनी नदीच्या काठावर शकुंतलेला एकटी सोडून गेलेला दुष्यंत परत येत नाही. या काळातील शकुंतलेच्या विरही भावनांना आविष्कृत करण्याची संधी मुक्तेश्वराने गमावली आहे. मोरोपंतानेदेखील या विरही भावनेचे चित्रण केले नाही. मोरोपंताने शब्दसंक्षेप केला असल्याने दुष्यंताच्या शिकारीचे, कण्वमुनीच्या आश्रमाचे, मालिनी नदीच्या काठावरील तपस्वी लोकांचे, दुष्यंत-शकुंतलेच्या पहिल्या भेटीच्या प्रसंगाचे, पुत्रजन्माचे, राजसभेतील शकुंतलेच्या प्रवेशाचे– मुक्तेश्वरासारखे विस्तृत वर्णन केले नाही. मुक्तेश्वराच्या लेखनामधील कल्पनाविलास, भव्यता मोरोपंताच्या

त्या आख्यानातून जाणवत नाही. मुक्तेश्वराच्या विमुक्त शैलीतून मात्र या साऱ्या प्रसंगांचे विस्तृत वर्णन येते. मुक्तेश्वराचे दुष्यंत-शकुंतला हे आख्यान एका विशुद्ध काव्याचा आनंद देते. प्राचीन आख्यानक कवींत मुक्तेश्वराइतके काव्यप्रचीतीचे यश दुसऱ्या कवीला मिळाले नाही.

* * *

## वामनपंडित

ज्याच्या चरित्रविषयक व रचनाविषयक माहितीत विद्वानांची अजूनही एकवाक्यत होऊ शकली नाही, असा आख्यानक कवीतील वामन हा एकमेव कवी होय. वामनाच्या नावावर जे ग्रंथ आज उपलब्ध आहेत त्यात आढळून येणाऱ्या भिन्न भिन्न प्रवृत्तींमुळे वामनाविषयीचे कुतूहल अधिकच वाढले आहे. वामन एक, दोन, की अनेक असा संभ्रम अभ्यासकांना पडावा अशा वामनाच्या रचना प्रकाशात येऊ लागल्या आहेत. आपल्या विद्वत्तेचा गर्व वाहणारा, यथार्थदीपिकेची रचना करणारा हाच आख्यानक कवी म्हणून प्रसिद्ध असलेला वामन होय.

वामनाने आपल्या ग्रंथांत रचनाकाळ दिलेला नाही. अभ्यासकात निर्वाण-कालाविषयी ( शके १९१७ ) एकमत आहे. श्री. दा. के. ओक हे वामनाचा जन्मकाळ शके १५२५ ते १५३० च्या दरम्यान यावा असे मानतात. वामनपंडित हा नांदेडच्या शेष घराण्यातील पुरुष होय अशी नवी माहिती श्री. कानोले यांनी उपलब्ध केली असून, हरिविजयाच्या प्रकाशित होऊ घातलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते या मताचा पुन्हा प्रपंच करणार आहेत.

सुश्लोक वामनाचा अशी ज्याची ख्याती त्या वामनाच्या नावावर यथार्थ-दीपिका, निगमसार, कर्मतत्त्व, समश्लोकी हे ग्रंथ असून अनुभूतिलेश, सिद्धान्तविजय, गजेन्द्रमोक्ष, वामनचरित्र, भरतभाव, द्वारकाविजय, अहिल्योद्धार, लोपामुद्रासंवाद, राधाविलास, राधाभुजंग, रुक्मिणीविलास, शुक–रंभा-संवाद, दशावतारचरित्र व वामन पंडितकृत कवितासंग्रहाच्या तिसऱ्या भागातील पदे व आख्याने वामनाच्या नावावर मोडतात. वामनाच्या काव्यसंग्रहाच्या तिसऱ्या भागातून येथे ‘ व्याधाख्यान ’ घेतले आहे.

या आख्यानातील कथाभाग रंजक आहे. एक व्याध मृगयेकरिता अरण्यात गेला असता त्यास एका गुहेत एक पुरुष योगसाधना करीत असलेला आढळतो. ‘ आपण असे आयुष्य का घालवीत आहा ? जीवनात आपणास कोणते दुःख प्राप्त झाले ? आपणास काही हवे असल्यास मी देतो ’ असे व्याध योग्यास म्हणतो. त्यावर श्रीविष्णूचे वर्णन करून, योगी पारध्यास त्याची भेट व्हावी असे सुचवितो. पारधी दिवसभर अरण्यात विहरतो, पण योग्याने वर्णन केलेली मृगया त्यास प्राप्त होत नाही. आपण दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यास असमर्थ आहो म्हणून पारधी प्राण देण्यास सिद्ध होतो. इतक्यात श्रीविष्णू त्याच्यासमोर प्रगट होऊन त्यास वाचवितात. पारधी त्यांना घेऊन योग्याकडे येतो, व अशा रीतीने आपल्या वचनाची सांगता करतो.

वामनाची स्फुट आख्याने भक्तिपर आहेत. लहानसा कथाभाग, एखाद-दुसरा प्रसंग घेऊन त्याने ही आख्याने लिहिली आहेत. त्याच्या काही आख्यानात उत्तान शृंगाराची छटा दिसते, पण त्याच्यामागे भक्तीने ओथंबलेले मन उभे असते. या आख्यानात तर त्याने भक्ताचे महत्त्व सांगितले आहे. येथील भक्त हा व्याध आहे. त्यास ईश्वराच्या सगुण रूपाची यथार्थ कल्पनादेखील नाही. पण दिलेल्या वचनाची पूर्तता प्राण देऊन केली पाहिजे या उदात्त मूल्यावर श्रीविष्णू जणू प्रसन्न होतात आणि दर्शन देतात. ईश्वराची कल्पनाही या व्याधास नाही. त्यास तो योग्याकडे घेऊन जातो व नंतर विष्णूचे माहात्म्य वर्णन केलेले दिसते. व्याधाच्या चित्रणालाच प्राधान्य दिलेले असल्याने व आख्यानातील प्रसंग त्या भोवतीच निर्माण झालेले असल्याने यास व्याधाख्यान हे नाव पंडितांनी दिले असावे.

वामन पंडिताचे गुणदोष यात प्रकट झाले आहेत. ऱ्हस्व-दीर्घाच्या चुका सर्वच लेखनात आढळतात. निवेदनशैलीतील गती, कथानकाचा ओघ लक्षणीय आहे. मोजक्या शब्दात साधलेले व्याधाचे व्यक्तिचित्र उठावदार झाले आहे.

# रघुनाथ पंडित

वामन पंडितात विद्वत्व व कवित्व एकात्म पावले होते. अंतःकरणातील भक्तीच्या ओलाव्याने त्याची प्रकरणे रखोत्कट उतरली आहेत. भक्तीचा ओलावा, कथनकौशल्य, शब्दसामर्थ्य, कथा निवेदण्यातील चातुर्य, व प्रसंग चित्रित करण्याची शैली वामन पंडिताजवळ असल्याने त्याची आख्याने सरस उतरली. पांडित्य प्रदर्शनाची हौस व शब्दचमत्कृतींचा सोस यामुळे काही ठिकाणी त्याची रचना कृत्रिम व क्लिष्ट झाली आहे. 'राधाविलास, रास-क्रीडा, राधा भुजंग, भामाविलास' या प्रकरणांतून उघड्या व उत्तान शृंगाराचा अतिरेकही जाणवतो. वामनाची भागवत–रामायणातील आख्याने मात्र काव्यात्म अशी उतरली आहेत. वामनाने ही प्रकरणे लिहून प्राचीन आख्यानक कवितेला ऐश्वर्य मिळवून दिले. वामनाने आख्यानक कवींची एक शिष्यपरंपराच निर्माण केली यात त्यांच्या यशाचे सामर्थ्य साठले आहे.

वामनाच्या नंतर निर्माण झालेल्या आख्यानक कवितेने वामनाचे गुण जसे उचलले तसे दोषही स्वीकारले. स्वतंत्र प्रज्ञेचा कवी जेव्हा लेखन करतो तेव्हा त्याच्या गुणामुळे त्याचे दोषही सहन केले जातात. पण अनुकरणात दोष तीव्रतेने बोचतात. वामनाच्या नंतर जी आख्यानक कविता निर्माण झाली तिच्यावर त्याची गडद छाप पडलेली दिसते. हरी, बापू वामन, साम्राज्य वामन, विश्वनाथ, नरहरी, नागेशसुत या त्याच्या शिष्यांनी तर वामनाचे इतके अनुकरण केले की, त्यांची रचना वामनाची म्हणूनच समजली गेली, व वामन एक की अनेक असा संभ्रम टीकाकारांना पडला. हरीच्या 'भीष्मयुद्ध', साम्राज्य वामनाच्या 'सुदाम चरित्र', 'राजयोग',

'ब्रह्मोपदेश' ह्या प्रकरणातून, वामनाचा मुलगा रखुपती याच्या 'नैषधकाव्य', 'कृष्णकौतुक' या सार्‍या रचनेतून वामनाचे स्पष्ट अनुकरण जाणवते. वामनाच्या सार्‍याच शिष्यांनी श्रीकृष्णाच्या चरित्रावर आख्याने लिहिलेली दिसतात. शके १५५० ते १६३० हा वामनाच्या व त्याच्या वळणाने निर्माण होणार्‍या आख्यानक कवितेचा काळ होय. वामनाची श्लोकबद्ध रचना, संस्कृतप्रचुरता, तज्जन्य क्लिष्टता, व रसहीन पांडित्य प्रदर्शनाचा हव्यास याचा प्रभाव या काळातील प्राचीन वाङ्मयावर पडलेला आढळतो. आख्यानक कविता याच काळात कीर्तनसंस्थांच्या द्वारे ऐकली जाऊ लागली, व आख्यानक कवितेला एक वेगळे क्षेत्र मिळाले. जनमनाशी आख्यानक कवितेचा वाढता संबंध कीर्तनातून या काळात येऊ लागल्याने स्वाभाविकच लोकाभिरुचीचा परिणाम लेखनावर झाला. रामाच्या जीवनापेक्षा श्रीकृष्णाचे जीवन विविधतापूर्ण, नाट्यपूर्ण व सामान्य जनाच्या अभिरुचीला प्रिय होईल असे असल्याने या काळातील पुष्कळशा रचनेचा विषय श्रीकृष्ण, त्याच्या लीळा, लग्नसोहळा, व सुदामाच्या भेटीचा प्रसंग झाल्याचे दिसून येते. प्राचीन आख्यानक कवितेचाच हा विशेष आहे. श्रीकृष्णाच्या चरित्रात विविध रसांचे प्रसंग आढळत असल्याने कवींच्या प्रतिभेचे नवे नवे उन्मेष ह्या वर्णनात प्रकट झाले आहेत.

वामनाच्या रचनेचा प्रभाव या काळावर पडला होता असे दिसून येते. स्वतंत्र वैशिष्ट्य प्रकट होईल अशी आख्यानक रचना या काळात अपवादात्मक अशीच लिहिली गेली. या काळातील कविता ही अनुकरणात्मक, नीरस व कंटाळवाणी अशी निर्माण झाली. संस्कृत महाकाव्याचा आदर्श समोर ठेवून, ह्या वळणाने मराठी कविता निर्माण होऊ लागली. नागेश, विठ्ठल व सामराज हे याच परंपरेतील व काळातील कवी होत.

नागेशाने 'चंद्रावळी, सीता–स्वयंवर, आर्य-टीका रुक्मिणी स्वयंवर, रत्नमंजरी, शारदा विनोद' ही रचना केली आहे. नागेश वर्णनाच्या भरात कथावस्तूचे सूत्र सोडून पाल्हाळिक वर्णन करतो. त्याच्या वाङ्मयात अश्लील वर्णनेही विपुल सापडतात. विनोदबुद्धी हे त्याच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. बीडचा विठ्ठल कवी याचे 'रुक्मिणी स्वयंवर, पांचाली-स्तवन, सीता-स्वयंवर, रत्न-मंजरी, द्रौपदी-वस्त्रहरण, विद्वज्जीवन, बिल्हण चरित्र' हे ग्रंथ आहेत.

याची रचना संस्कृत महाकाव्याच्या वळणाची असून, ' सीता स्वयंवर व रुक्मिणी स्वयंवर ' या काव्यांची सर्गबद्ध रचना त्याने केली आहे. 'रुक्मिणी स्वयंवरा 'त त्याने चित्र-काव्य रचनेचे कौशल्य प्रकट केले आहे. त्याची सारी रचना संस्कृत वृत्तात्मक आहे. कूटरचना व शब्दचमत्कृती याचा अतिरेक म्हणजे विठ्ठलाचे काव्य होय. विठ्ठलाचे हे काव्य पाहून मन आदराने भारावते, पण दिव्य काव्यानंदाने धुंद होत नाही. त्याच्या बुद्धीचे नानाविध खेळ पाहण्यात क्षणभर मौज वाटते, पण मनाला दिव्यत्वाचा स्पर्श होत नाही. कृत्रिम व रसहीन बौद्धिक चातुर्यच सर्वत्र आढळते. संस्कृत महाकाव्याचा आदर्श समोर ठेवून या काळातील कवींनी आपली रचना केली; पण साऱ्यांनीच प्रत्यक्ष महाकाव्य निर्माण केले नाही. तसा प्रयत्न याच काळात सामराजाने करून पाहिला, व ' रुक्मिणीहरण ' हे सर्गबद्ध काव्य त्याने लिहिले. संस्कृत महाकाव्याचा आदर्श समोर ठेवून रचलेले प्राचीन साहित्यातील पहिले महाकाव्याच्या वळणाचे काव्य म्हणून सामराजाच्या 'रुक्मिणीहरणा'चा उल्लेख करावा लागेल. हा महाग्रंथ संस्कृत महाकाव्याप्रमाणे आठ सर्गांचा असून, विस्तृत असा आहे. कथारचनेत सामराजाने बऱ्याच ठिकाणी स्वातंत्र्य घेतले असल्याने काव्य सरस उतरले आहे. श्रीकृष्ण-रुक्मिणीच्या मीलनाचा प्रसंग रसोत्कट आहे.

सारांश, प्राचीन आख्यानक कविता या काळात संस्कृतच्या वळणाने निर्माण होऊ लागली. काही ठिकाणी हा महाकाव्याचा आदर्श यशस्वी रूप घेऊ शकला, तर काही ठिकाणी आख्यानक रचना झाली. विठ्ठलाच्या चित्रबद्ध व कूटरचनेच्या हव्यासातून याच काळातील कविता कमालीची कृत्रिम झाली. त्याच विषयावरील शके १५५० ते १६३० मधील कविता मात्र काही अपवाद सोडल्यास अनुकरणात्मक व नीरस अशी उतरली आहे. या काळातील कवींना उत्स्फूर्त भावनेच्या आविष्कारापेक्षा शब्दपांडित्य महत्त्वाचे वाटत होते. त्यामुळे आख्यानक कवितेतील काव्य लोपले व यान्त्रिक शब्दरचनेचा सोस वाढला. याच काळात रघुनाथ पंडिताने ' दमयंती-स्वयंवर ' या नावाचे आख्यानक काव्य लिहिले व आख्यानक कवितेच्या एका वेगळ्या प्रवाहाला प्रारंभ केला. शृंगार व करुण या मानवी जीवनात प्रमुख स्थान असलेल्या रसांना नल-दमयंती यांची कथा लिहून व त्यांना मानवी स्वभाव

देऊन आख्यानक कवितेच्या बोधवादी परंपरेत रंजकता व अभिजात कलात्मक रसिकता यांना महत्त्व प्राप्त करून दिले. वामनशिष्य, नागेश, विठ्ठल यांची एकीकडे कृत्रिम व नीरस रचना होत असतानाच रघुनाथ पंडिताने नल–दमयंतीच्या जीवनातील कोमल भावनांना कलारूप दिले. रघुनाथ पंडिताच्या या काव्याने मानवी भावनांना, मानवी पातळीवरून पात्रांच्या व्यक्तिमत्त्वांना, प्राचीन आख्यानक कवितेत प्रथमच स्थान मिळून, तिच्यात व्यापकता व विषयांची विविधता आली.

रघुनाथ पंडिताची चरित्रात्मक माहिती फारशी उपलब्ध नाही; व जी आहे तीविषयी विद्वानांत अजून एकवाक्यता नाही. कै. ज. बा. मोडक यांनी आनंदतनय अरणीकराचे ‘ताटकावध’ हे काव्य प्रसिद्ध केले. ‘आनंदतनय व रघुनाथ पंडित हे परस्पर व्याही होते.’ अशी तळटीप त्यांनी वरील काव्यात दिली आहे. रघुनाथ पंडिताने आपली मुलगी आनंदतनयाच्या मुलास दिली होती. आनंदतनयाचे वंशज तंजावरास होते. कै. वि. का. राजवाडे तंजावरास गेले असता, तिकडे त्यांना रघुनाथ पंडिताची ‘गजेन्द्रमोक्ष व रामदासवर्णन’ ही दोन काव्ये मिळाली. याच भागात त्यांना रघुनाथ पंडिताच्या चरित्राविषयीच्या अनेक आख्यायिका ऐकावयास मिळाल्या. कै. घ. सां. मळकर्णेकर यांना कारवार येथे ‘दमयंती-स्वयंवरा’ची एक हस्तलिखित प्रत मिळाली.

‘नळातें देऊनी वर पियुषपानींहि गगनीं
निघाले; त्यामागें नळसहकरी राजगमनी
स्वराज्यीं सर्वांतें द्विजऋषि जनांतें सुखि करी
कथा ऐसी चंद्रावरकर रघूनाथचि करी.’

असा एक श्लोक या हस्तलिखित प्रतीच्या शेवटी आहे. त्यातील ‘चंद्रावरकर’ या शब्दावरून हा कवि चंद्रावर–तंजावरचा असल्याचे निश्चित झाले.

वरील चार ओळीतील ‘स्वराज्य’ हा शब्द येथे वेगळ्या संदर्भात वापरलेला असला, तरी शिवाजीच्या त्या वेळच्या राज्यावरून त्याला हा शब्द सुचला असावा. तसे असेल तर ह्या कवीचा काळ निश्चित करिता येईल.

शिवकाळातील ऐतिहासिक कागदपत्रातील भाषेशी रघुनाथ पंडिताच्या काव्यातील भाषा, तिचे वळण, फारशी–अरबी शब्दांचा त्याने केलेला वापर बराच मिळता आहे. आनंदतनय व सामराज या शिवकालीन कवींच्या भाषेशी त्यांच्या भाषेचे असलेले साम्य लक्षात घेतले तर हाही त्यांचा समकालीन कवी असावा असे वाटते. आनंदतनय व रघुनाथ पंडित यांनी एकमेकांचे काव्य पाहिले असावे.‡ स्वाभाविकच रघुनाथ पंडित आनंदतनयाचा समकालीन कवी ठरतो.

कै. राजवाडे यांना मिळालेल्या ‘ रामदास वर्णना ’ची श्लोकसंख्या एकूण अकरा असून त्यात आलेले रामदासांचे वर्णन वाचून हा कवी रामदास संप्रदायी व त्यांचा समकालीन असावा असे वाटते.

रघुनाथ पंडिताच्या स्थळकाळाविषयीचे निश्चित मत मान्य होण्यासारखे असले, तरी रघुनाथ पंडित हा कोण याविषयी संशोधकात एकमत नाही. रघुनाथ पंडिताविषयी चार प्रमुख मते प्रचलित आहेत. ज. र. आजगावकर व वा. र. वालावलकर यांना मळकर्णेकरांना उपलब्ध झालेल्या कारवार प्रतीतील ‘ कथा ऐसी चंद्रावरकर रघूनाथचि करी ’ या उद्‌गारावरून व काही कोकणी शब्दांच्या उपयोगावरून हा कवी कारवारकडील तंजावरचा सारस्वत ब्राह्मण असावा असे वाटते. अ. का. प्रियोळकर यांनी रघुनाथ पंडित हा तंजावरचा देशस्थ ब्राह्मण शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकी न्यायशास्त्री पंडितराव रघुनाथ पंडित हा असावा या मताचा पुरस्कार केला आहे. याकरिता त्यांनी ‘ पंडितराव बखरी ’चा आधार घेतला आहे. प्रियोळकरांच्या या मताला सर्वमान्यता अजून मिळाली नाही. प्रा. द. सी. पंगू यांनी ‘ राज्यव्यवहार कोशा ’चा कर्ता रघुनाथ नारायण हणमंते हाच ‘ दमयंती स्वयंवरा ’चा कर्ता आहे असे प्रतिपादन केले आहे. कोशकार रघुनाथ नारायण हणमंते याची माहिती या कोशाचे संपादक श्री. रा. गो. काटे यांनी अशी दिली आहे : कोशकाराचे घराणे मूळचे चिंचवडचे. तेथील हेरंब ( गणपती ) देवतेचे उपासक; मुद्गल गोत्री, अग्निहोत्री ब्राह्मण;

‡ महाराष्ट्र सारस्वत पृ. ५२४
वि. ल. भावे

त्यांच्या आईचे नाव राजाई, व पत्नीचे सीता असे होते. त्याना नारोबा व तिम्मप्पा अशी दोन मुले होती. * श्री. कात्रे यांनी 'चिकित्सामंजरी, व नाडीज्ञान विधी हे दोन संस्कृत ग्रंथ प्रकाशित केले असून त्यांच्या दीर्घ प्रस्तावनेत त्यांनी एक नवे मत मांडले आहे. रघुनाथ मनोहर कवीच्या 'गंगालहरी' या अनुवाद-काव्यातील काही श्लोकांचा तुलनात्मक अभ्यास करून 'दमयंती स्वयंवरा'चा कर्ता व 'गंगालहरी'चा कर्ता एकच (रघुनाथ मनोहर हा) असावा असे म्हटले आहे. रघुनाथ मनोहर कवीने अनुवादात घेतलेले स्वातंत्र्य, व्याकरणदोष, व एकूण भाषेचे स्वरूप लक्षात घेता रघुनाथ पंडित म्हणजेच रघुनाथ मनोहर हे श्री. कात्रे यांचे मत मान्य होणारे नाही.

रघुनाथ पंडिताच्या नावावर 'दमयंती स्वयंवर' हे एक आख्यानक काव्य व कै० राजवाडे यांना मिळालेली 'रामदास वर्णन, व गजेन्द्रमोक्ष' ही काव्ये आहेत. 'दमयंती स्वयंवराख्यान' त्याने नैषधकाव्याचा आधार घेऊन लिहिले असून यातील काही श्लोक अनुवादून घेतले आहेत. हे स्वयंवराख्यान असल्याने दमयंतीच्या त्यागाचा व नंतरचा कथाभाग या आख्यानात आला नाही. रघुनाथपंडिताची रचना संस्कृतप्रचुर असूनही सुबोध आहे. आख्यानात कथानिवेदन अखंडित, ओघवते साधले आहे. समयोचित भावनाविष्कार व कलात्मक स्वभावपरिपोष करण्यात रघुनाथ पंडिताने कौशल्य प्रकट केले आहे. दमयंतीच्या सौंदर्याची गुप्तचरांकडून माहिती कळताच नळाच्या अंतःकरणातील तिच्या प्राप्तीविषयीची ओढ, त्याची व्याकुलता, दमयंतीच्या मनातील सुप्त प्रीती, हंसाने केलेल्या नळाच्या वर्णनाने दमयंतीच्या मनातील आतुरता, नंतरची आर्तता, व मीलनाची उत्सुकता या विविध भावनांचा उत्कट आविष्कार रघुनाथ पंडिताने केला आहे. प्रसंग मूर्तिमंत समोर उभा करण्याचे त्याचे शब्दसामर्थ्य व कल्पना-विलास असामान्य आहे. नळाचे रसिक, उदार, धीरगंभीर व उदात्त व्यक्तिमत्त्व चित्रण करिताना अनेक कलात्मक प्रसंगांचा वापर करण्यात कवीची अभिजात दृष्टी व्यक्त झाली आहे. राजहंसाच्या बोलण्यातून नळाचे स्वभाव

* राज्यव्यवहार कोश पृ. १०

विशेष सांगण्यात समयोचितता जशी प्रकट झाली, तशी कवीची कल्पकताही ! घटनांचे चित्र डोळ्यासमोर उभे करण्यात व त्यास सजीवता देण्यात कवी यशस्वी झाला आहे.

आख्यानक कवितेच्या विषयात व आशयात कवीने नावीन्य आणले आहे. ओवी या मराठी वृत्तातून यापूर्वीची पुष्कळशी प्राचीन कविता लिहिली गेली. या काळातील आख्यानक कविता ही प्रामुख्याने संस्कृत वृत्तांचा वापर करू लागली. विठ्ठलसारखा कवी तर मराठी वृत्तांच्या वाटेलाही जाताना दिसत नाही. संस्कृतातील शब्दार्थालंकारांचा जाणीवपूर्वक वापर हाही या काळातील आख्यानक कवितेचा विशेष दिसतो. ही सारी वैशिष्ट्ये रघुनाथ पंडिताच्या आख्यानातही प्रकट झाली आहेत. यातील पदरचना पाहून हे आख्यान कीर्तनाकरिता रचले असावे असे वाटते. विषयानुरूप वातावरण-निर्मिती, प्रसंग उभा करण्याची शब्दसमृद्धी, घटनांतील नाट्य जिवंत करण्यात मिळालेले भरपूर यश, नळ-दमयंती नि राजहंस यांची रेखीव स्वभावचित्रे, विविध भावनांचा कलात्मक व रसपूर्ण आविष्कार, कथावस्तूचा कायम टिकलेला बंध, संस्कारपूत रसाळ गुणवती भाषा या विविध वैशिष्ट्यांनी रघुनाथ पंडिताचा हा कलाविलास रमणीय व लक्षणीय झाला आहे.

महाभारताच्या वनपर्वात एकूण २८ अध्यायांत दमयंती स्वयंवराची व नळाच्या दुःखपूर्ण जीवनाची कथा आली आहे. पहिल्या पाच अध्यायांत स्वयंवर कथा आली असून, श्रीहर्षाने आपले काव्य या पाच अध्यायांच्या आधारेच निर्मिले आहे. रघुनाथ पंडिताच्या समोर श्री. हर्षाचेच काव्य असल्याने नळाच्या जीवनातील पुढील कथाभाग येथे आलेला नाही. दिव्यास्त्र मिळविण्याकरिता अर्जुन स्वर्गलोकात गेला असता, धर्मादी बन्धू त्याच्या विरहाने व्यथित होतात. या वेळी बृहदश्वा नावाचे ऋषी त्यांच्याकडे येतात. धर्म ऋषीला 'आमच्यासारखे दुःखी यापूर्वी कोणी झाले काय ?' असा प्रश्न विचारतो. त्यावर बृहदश्वा 'पांडवां'ना ही कथा सांगतात. महाभारतात ही कथा द्यूत खेळाचा अनर्थ दाखविण्याकरिता आली आहे. मुक्तेश्वर, मोरोपंत या आख्यानक कवींनीही ही कथा वर्णिली आहे. त्यांच्या लेखना-मागील दृष्टी व रघुनाथ पंडिताची दृष्टी यांत अंतर असल्याने तिन्ही आख्याने आगळी उतरली आहेत. मुक्तेश्वर–मोरोपंत यांचे नळ–दमयंती देवांश

वाटतात. रघुनाथ पंडिताच्या काव्यातून त्यांना मानवी स्वभाव लाभले आहेत. उदात्त मानवी जीवनाचा कलात्मक सौंदर्यपूर्ण आविष्कार म्हणजे रघुनाथ पंडिताचे ' दमयंती स्वयंवर ' होय.

पुण्यश्लोक नळराजा विदर्भ देशाच्या भीम राजाची कन्या दमयंती हिच्या सौंदर्याची ख्याती ऐकून तिच्यावर आसक्त झाला. त्याचे गुप्तचर कुंडिनपुरात एकदा गेले असता, त्यांना दमयंतीच्या मनात नळाविषयी उत्कट प्रेम आहे असे आढळून आले. नळाकडे येऊन त्यांनी ही बातमी निवेदन केली व त्या लावण्यराशीचे वर्णन केले. यापूर्वीच अंकुरत असलेली दमयंतीविषयीची प्रीती नळाच्या मनात वाढली. तिची माहिती गुप्तचराकडून मिळाल्या दिवसापासून राज्यकारभारातून नळाचे लक्ष उडाले. आपल्या सैन्यासह तो एकदा वनविहाराकरिता गेला असता, एका उपवनातील सरोवरात त्याला सोनेरी पंखांचे राजहंस दिसले. एका राजहंसाला नळाने आपल्या हातांनी धरले. हंसाने राजाला आपल्या संसारातील व्यथा सांगून स्वतःला सोडवून घेतले. त्याच्या दुःखाने द्रवलेल्या राजानेही त्याला आनंदाने सोडले. नळाच्या या सहृदयतेचा व जिव्हाळ्याचा परिणाम राजहंसावर झाला. नळाने आपल्याला काही काम सांगावे अशी विनवणी हंसाने केली. नळ राजाने आपल्या मनातील विरहव्यथा राजहंसाला निवेदन केली. राजहंस त्याचा निरोप घेऊन दमयंतीकडे गेला.

यापुढील कथाभाग येथे निवडलेल्या भागात आला आहे.

कुंडिनपुरात राजहंस आला असता, विलासवनात आपल्या मैत्रिणींसह राजकन्या खेळत असलेली त्याला दिसते. दमयंतीचे लक्ष वेधले जाईल असा आपल्या पंखांचा फड् फड् आवाज हंस करतो व जवळच खाली उतरतो. सोनेरी पंखांचा नवखा राजहंस पाहून दमयंती त्याला धरू जाते, इतक्यात तिच्या मैत्रिणी खळखळून हसतात. राजहंस त्या हास्यविनोदाने बुजतो व दमयंतीला दिसेल अशा अंतरावर जाऊन बसतो. दमयंती पुन्हा त्याला धरण्याचा प्रयत्न करते. दमयंतीच्या हातात त्वरित न लागता तो हळूहळू दूरदूर सरकतो, व दमयंतीला एकटीला तिच्या मैत्रिणींपासून लांब अंतरावर नेतो. दमयंतीच्या हातात सापडेल अशा वेळी ' पुन्हा मोकळे सोडण्याचे आश्वासन ' तो घेतो. राजहंसाचे मानवी शब्द ऐकून ती उल्हासते. राजहंस

तिच्या मनातील नळाविषयीची भावना जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. आपला प्रीतिभाव दमयंती व्यक्त करते. नळराजाच्या सौंदर्याचे वर्णन करून राजहंस तिच्या मनातील प्रीतिभावना वाढवितो. राजहंस 'तुम्ही दोघे एकमेकांवर अनुरक्त आहा; तुम्ही एकत्र नांदाल' असे सांगून तिचा निरोप घेऊन नळाकडे येतो. नळाला सारी कथा निवेदितो.

रघुनाथ पंडिताच्या या आख्यानातील हंसाने नळाचे दूतत्व स्वीकारून दमयंतीच्या मनातील प्रीतिभाव टिपून घेणे इथपर्यंतचा कथाभाग काव्य व कथा या दोन्ही दृष्टींनी विलोभनीय आहे. रघुनाथ पंडिताने या आख्यानात काही श्लोक श्रीहर्षाच्या ग्रंथातून अनुवादून घेतले आहेत हे खरे असले, तरी त्याचे स्वतःचे असे रचनाकौशल्य निश्चितच दिसून येते. राजहंस नळाकडून विदर्भ देशात आल्यावर राजकन्या त्याला विलासवनात क्रीडा करीत असल्याचे दिसते. राजहंसाला दमयंती पाहते व त्याच्या सुवर्णपंखावर मोहित होते. ती त्याला धरण्याचा प्रयत्न करते. हा प्रसंग रघुनाथ पंडिताने अव्याज-मनोहर व आकर्षक शैलीने वर्णिला आहे. 'अगाई, हा बाई त्वरित वरि जाईल पळुनी' यासारख्या ओळींतून दमयंतीच्या तोंडी घातलेल्या भाषा-प्रयोगातील सहजता, स्वाभाविकता जशी स्पष्ट होते, तसेच तिच्या वृत्तीतील उत्कटता व उत्सुकताही व्यक्त होते. तिचे बांगड्यांचा निनाद न होऊ देता मंद मंद चालणे, तिच्या हातास राजहंस लागणार तोच सख्यांचे खळखळून हसणे, सख्यांवरील राग प्रकट करणे, राजहंसाला धरण्याकरिता पुन्हा त्याच्याकडे गेली असता दमयंतीला तिच्या मैत्रिणींपासून वेगळी व दूर नेण्याकरिता त्याचे चातुर्याने हळूहळू लांब जाणे, या प्रसंगांतील स्वाभाविक काव्यात्मकता रघुनाथ पंडिताच्या रसवृत्तीने टिपून घेतली आहे. भावगर्भ प्रसंगाचे वर्णन करताना रघुनाथ पंडित साधी व सुबोध भाषा वापरतो; त्यामुळे प्रसंगातील मूळ सौंदर्य व नाट्य अधिक खुलते.

या आख्यानातील राजहंसाचे शब्दचित्र अत्यंत रेखीव व कलापूर्ण असे उतरले आहे. नळ व दमयंती यांच्या स्वभावचित्रापेक्षाही वाचकाचे लक्ष राजहंसाच्या चित्रणावर अधिक काळ खिळून राहते; इतकी सजीवता या चित्रणात आली आहे. नल–दमयंतीच्या मीलनातील प्रमुख दुवा म्हणजे राजहंस आहे. राजहंसाची नळाविषयीची कृतज्ञता, विनम्रता, विलास-वनात

दमयंतीच्या दृष्टीस पडावे म्हणून त्याने जाणीवेने केलेली सुवर्णपंखांची फडफड, नळाचे वर्णन चारचौघात करण्यापेक्षा दमयंतीला एकटीलाच निवेदण्यात त्याने दाखविलेली चतुराई, "तुला नळ आवडला काय?" असा तिला विचारलेला सरळ प्रश्न, नळाचीही तिच्याविषयीची उत्कट प्रीती सांगून दमयंतीच्या भावनांना त्याच्या शब्दांनी मिळालेला निश्चित आधार, — पुन्हा दमयंतीच्या मनात नळाला भेटण्याविषयीची वाढविलेली आतुरता व या विविधतेतून राजहंसाचे स्वभावलेखन अत्यंत रेखीव व आकर्षक असे उतरले आहे. रघुनाथ पंडिताचा हा राजहंस सुवर्णपंख फुलारून कुंडिनपुराच्य सौंधावर बसला आहे इतका जिवंत वाटतो. राजहंसाचे सजीव शब्दचित्र काढण्यात रघुनाथ पंडिताची प्रतिभासंपन्नता, अभिजात रसिकता व विदग्धता प्रकट झाली आहे.

* * *

# श्रीधर

प्राचीन आख्यानक कवितेला अशिक्षितापर्यंत पोचविण्यात व तिला व्यापक लोकप्रियता प्राप्त करून देण्यात श्रीधर स्वामींचा फार मोठा वाटा आहे. एकनाथाचे लोकशिक्षणाचे व उद्‍बोधनाचे प्रयोजन डोळ्यासमोर ठेवून रामायण, भारत, भागवत यांतील आख्यानांची रचना त्यांनी केली. प्राचीन कवींत श्रीधराइतका सर्व थरातील लोकांस प्रिय झालेला आख्यानक कवी एकनाथावाचून दुसरा कोणी नाही. एकनाथांनी बहुजनांच्या भाषेत भारूड रचना करून अध्यात्म सांगितला. समाजातील दोष दाखविण्याचा प्रयत्न केला, व भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. श्रीधरस्वामींचा भक्तिपूर्ण दृष्टिकोण व कथानिवेदनातील सहजरम्यता व सुबोधता यांमुळे त्यांचे ग्रंथ घरोघर वाचले गेले. कथांच्या द्वारे त्यांनीही भक्तीचा पुरस्कार केला, पण त्याहीपेक्षा या कथांनी श्रमिकांचे श्रमही कमी केले. श्रीधरात संपन्न प्रतिभेचे गुण नाहीत, पण अपरिष्कृत लोकांच्या भक्तिमय अंतःकरणाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या निवेदनात निश्चितच आहे. काव्यगुणांनी त्यांचे ग्रंथ उणे असले तरी मराठी आख्यानक कवितेचा विस्तार, व्यापकता व सर्वजनप्रियता मिळवून देण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले. उद्‍बोधनाचा दृष्टिकोण वामन, मोरोपंत यांचाही होता, पण ती कविता विद्वानांच्या क्षेत्रापलीकडे जाऊ शकली नाही. तिने मराठी आख्यानक कवितेचे जणू क्षेत्र ठरवून घेतले होते. पण श्रीधराची कविता मात्र खऱ्या अर्थाने खेड्यापाड्यात गेली व संत साहित्याला लाभलेली अमाप लोकप्रियता त्यांनी मराठी आख्यानक कवितेलाही मिळवून दिली. श्रीधराचे काव्य हे खऱ्या अर्थाने लोकधन व लोकसाहित्य ठरले.

संतवाङ्मयाच्या निर्मितीच्या मागे जशी आत्मोद्धाराची, तशी लोकोद्धाराची तळमळ व कळकळ होती. या जाणीवेची पकड संत साहित्यातून कुठेही सैल झालेली नसल्याने सरलता हा तिचा प्रमुख विशेष ठरला. तुकारामासारख्या संतांची आत्मप्रचीतीची वाणी तिच्यातील प्रामाणिक कळकळींने, त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाने व सामान्यत्वापासून असामान्यत्वापर्यंत विकसित झालेल्या व अभंगांतून व्यक्त झालेल्या त्यांच्या भावजीवनाने जशी आपल्याला आकर्षित करिते, त्याचप्रमाणे त्यांच्या लोकभाषेच्या वापराने व सरळ अभिव्यक्तीनेही आपल्याला वेड लावते. " कथा देवाचें हें ध्यान, कथा साधन मंडण, कथे ऐसें पुण्य, आणिक नाही." सर्वथा तुकारामाच्या वाणीतील हे पुण्य श्रीधराने जोडले होते. ' कथा त्रिवेणी संगम, देव, भक्त आणि नाम ' अशी त्यांचीही विचारधारा होती.

अबलांसि न कळे संस्कृत वाणी
जैसे आडांतले गोड पाणी
परी तें — दोर पात्रा वांचोनी
अशक्त जना केंवि निघे
तोचि तडागासि येता त्वरें
तात्कालचि तृषा हरे
तेवि अबलाजन तारावया ईश्वरें
प्राकृत ग्रंथ निर्मिले

मराठी कवितेच्या प्रारंभीचा हेतू श्रीधराने प्रत्यक्ष कृतीतून उतरविला व रामायण—भागवतातील कथांना अपरिष्कृत मनात कायम स्थान मिळवून दिले. श्रीधराचे हे कार्य मराठी आख्यानक कवितेला उपकारक ठरले. तिच्या विषयात, आशयात व निवेदण्याच्या स्वरूपात वेगळेपण आले व ती व्यापक प्रमाणात लोकाभिमुख झाली.

पंढरपुरापासून आठ मैलांवर असलेले नाझरे हे श्रीधरस्वामींचे मूळ गाव. त्यांचे घराणे खडके या नावाने ओळखले जात असे. त्यांच्या वडिलांचे नाव ब्रह्मयानंद व आईचे नाव सावित्रीबाई असे होते. गृहस्थाश्रम स्वीकारूनही

ब्रह्मयानंद उदासीन वृत्तीने जीवनक्रमण करीत असत. त्यांनी शके १६१५ मध्ये चंद्रभागेच्या काठी पंढरपूर येथे समाधी घेतल्याचा उल्लेख श्रीधराने ' ज्ञानेश्वर चरित्रा 'त केला आहे. श्रीधरस्वामी गृहस्थाश्रमी होते. पण तेही उदासीन वृत्तीनेच राहिले. त्यांचा मृत्यू शके १६५१ मध्ये झाला. श्रीधर स्वामींची पंढरपुरास समाधी आहे.

हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, जैमिनी अश्वमेध, शिवलीलामृत हे श्रीधरस्वामींचे अत्यंत लोकप्रिय ग्रंथ होत.

पांडवप्रताप हा स्वामींचा महत्त्वाचा ग्रंथ होय. या ग्रंथाची ओवीसंख्या १३,३९७ असून, एकूण ६४ अध्याय आहेत. पाडवांच्या जीवनातील प्रमुख प्रसंग घेऊन, श्रीधराने या ग्रंथाची निर्मिती केली आहे. मुक्तेश्वराच्या महाभारत रचनेचा श्रीधराने लेखनात उपयोग करून घेतला असून, त्यांच्या काव्यात मुक्तेश्वरी वळणाच्या अनेक कल्पना विखुरलेल्या आढळतात. तरीही श्रीधरांच्या काव्याचे वेगळेपण लक्षात आल्यावाचून रहात नाही. श्रीधरांची काव्यनिर्मितीमागची प्रेरणाच मुक्तेश्वराच्या निर्मितीप्रेरणेहून वेगळी असल्या-मुळे दोघांच्या काव्याच्या स्वरूपावर त्याचा परिणाम झालेला आहे. एकनाथांच्या लोकशिक्षणाच्या कार्याचे सूत्र श्रीधराने स्वकृतीने पुढे चालविले. उद्‌बोधन हा हेतू मनात असल्यामुळे व समोरील अपरिष्कृत माणसे आपल्या ग्रंथाचे खरे वाचक आहेत याची जाणीव सतत मनात ठेवल्यामुळे श्रीधरांची रचना अत्यंत सुबोध आहे. त्यात कधी कधी निवेदनावर अधिक भर असल्याने गद्यप्रायता येते, पण ज्या भावनांचा आविष्कार श्रीधर करतात, त्या भावनांचे आकर्षण सामान्यजनांना अधिक असल्यामुळे ती गद्यप्रायता त्यांना बोचत नाही. पांडवप्रताप या ग्रंथात वीरशौर्याचे जे प्रसंग श्रीधराने शब्दांकित केले आहेत ते अत्यंत चित्तवेधक आहेत. अभिमन्युवध हे आख्यान श्रीधराच्या वरील ग्रंथातील पंचेचाळिसाव्या अध्यायातून संपादून घेतले आहे.

सर्वांना परिचित असलेल्या अभिमन्यूच्या वधाची कथा या आख्यानात आली आहे. अर्जुन लढण्यात गुंतला असता, द्रोणाचार्यांनी चक्रव्यूहाची रचना केली. चक्रव्यूह भेदण्याची कला अभिमन्यूला गर्भावस्थेत असताना कळली होती. भीमास बरोबर घेऊन तो चक्रव्यूहाच्या भेदास तयार झाला,

कौरवसैन्याची फळी फोडून तो आत शिरला. महारथी योद्धयांना त्याने युद्धात जेरीस आणले, पण पांडवांच्या सैन्यापासून दूरावलेला अभिमन्यू चक्रव्यूहात सापडला. धनुष्य मोडले, तर तो वीर शत्रूंशी तलवारीने लढला. तलवार मोडली, तेव्हा गदेने युद्ध केले. दुःशासनाने गदा फोडली, तेव्हा त्याने रथचक्र घेतले. शत्रूंचे शरसंधान परतविले. दुःशासनाचा मुलगा दौःशासनी गदा घेऊन त्याच्यावर चालून आला. दोघांनी एकमेकांवर वार केले. त्यात दोघेही धारातीर्थी पडले. दौःशासनी काहीसा सावध होताच मूर्च्छित पडलेल्या अभिमन्यूवर गदेचा प्रहार करून त्याने त्यास अधर्माने मारले.

वीररसात्मक असे प्रसंग निवडून एवढा कथाभाग श्रीधरांनी संक्षेपाने वर्णन केला आहे. शब्दांचा पाल्हाळ न लावता श्रीधर प्रसंगातील नाटय अलगद टिपून घेतात. रणभूमीवरील प्रत्यक्ष युद्धाचे श्रीधरस्वामींनी केलेले वर्णन अत्यंत रोमहर्षक आहे. अर्जुन तेथे आला असता त्याच्या हृदयातील दुःखावेग स्वामींनी समर्पक शब्दांत वर्णन केला आहे.

“ सौभद्रें नेत्र उघडिले
पार्थें आंग धरणीसी टाकिलें
अभिमन्यासी पोटीं धरिलें
पार्थें मांडिले शोकातें.”

यातील उत्कटता, आर्तता व व्याकुलता हृदयास स्पर्श करणारी आहे. नाटयपूर्ण प्रसंगांची निर्मिती तर या आख्यानात आहेच, पण रसपोषक वातावरण निर्मितीही चांगली साधली आहे. श्रीधरांची निवेदनातील रसाळपण व विषयात त्यांची प्रगट झालेली आत्मीयता चिरकाल लक्षात राहते.

★ ★ ★

# मोरोपंत

प्राचीन आख्यानक कवितेला पंडिती वळण लावण्याचा प्रयत्न वामन पंडित, रघुनाथ पंडित, सामराज, विठ्ठल या कवींनी केला. संस्कृतातील विविध वृत्तांचा वापर त्यांनी आख्यान रचनेत केल्यामुळे एकनाथ मुक्तेश्वर यांच्या कवितेचा अभंग व ओवी ही मराठी वृत्ते मागे पडली.

एकनाथ मुक्तेश्वराच्या कवितेचा सुबोधता हा विशेष आहे; पण नंतरची आख्यानक कविता ही संस्कृत प्रचुरतेने क्लिष्ट झाली. एकनाथांनी लोकशिक्षण हा हेतू प्रमुख मानला असल्यामुळे त्यांची रचना सामान्य वैष्णवापर्यंत पोचली. वामन पंडित, सामराज, विठ्ठल या कवींनी भक्तीची कास धरली तरी त्यांची रचना अपरिष्कृत मनापर्यंत तिच्या पांडित्याच्या स्वरूपामुळे पोचू शकली नाही. विठ्ठलाच्या बिल्हण चरित्रांचा अपवाद वगळल्यास त्याची इतर रचना चमत्कृति-पूर्ण रचनेने अतिशय क्लिष्ट झाली, व मराठी आख्यानक कवितेच्या रसिकांचे क्षेत्र मर्यादित केले. श्रीधराच्या काव्याने पुन्हा मराठी आख्यानक कविता एकनाथी प्रेरणेतून निर्माण होऊ लागली. श्रीधराच्या कवितेने रसिकांचे क्षेत्र व्यापक केले. यानंतर पुन्हा मोरोपंतांनी आख्यानक कवितेला पंडिती वळण दिले. आख्यानक कवितेच्या इतिहासात विपुल व विविध रचना करणारे कवी म्हणून त्यांचा सन्मानपूर्वक उल्लेख करावा लागेल. मोरोपंतांनी मराठी कवितेला अनुपम भारदस्त व प्रौढ भाषेचे लेणे दिले. अनेक वृत्तात्मक रचना ही पंतांच्या पूर्वी इतर प्राचीन आख्यानक कवींनीही केली होती, पण पंतांनी वृत्तरचनेत शिथिलता येऊ दिली नाही. व्याकरणशुद्ध रचना म्हणून पंतांच्या रचनेचा विशेष सांगता येईल. पंडितांच्या काव्याचे सारे गुण-दोष पंतांच्या कवितेतही प्रखरतेने जाणवतात हे खरे, पण उभी हयात काव्य निर्माण

करण्यात घालवून मराठी काव्यसरितेत ‘ उदंड जाहले पाणी ’ असे त्यांच्या रचनेमुळे म्हणता येऊ लागले. मराठी आख्यानक कवितेला श्रीमंती डौल पंतांनी प्राप्त करून दिला.

पंतांचा काळ हा महाराष्ट्राच्या जीवनात अत्यंत धावपळीचा कालखंड आहे. पेशवाईच्या उत्तर काळात अनेक राजकीय वडामोडी झाल्या. सामाजिक जडणघडण झाली. पण त्याचे पडसाद पंतांच्या काव्यातून उमटले नाहीत. एकनाथ मुक्तेश्वराच्या काव्यातून सामाजिक तथा राजकीय आन्दोलनांच्या स्पष्ट अस्पष्ट खुणा उमटलेल्या दिसतात. मोरोपंतांचे मन रामायणातील कथा–आख्यानातच रमलेले दिसते. एकनाथांनी भारत–रामायणातील आख्यानांवरच आपली दृष्टी केन्द्रित केली होती, पण त्यांच्या लेखनातून त्यांची सामाजिक जागरूकता दिसून येते, तशी पंतांच्या काव्यातून दिसत नाही. हा पंतांच्या लेखनाचा दोष आहे, असे मात्र म्हणता येणार नाही. काव्यातून काळाचे प्रतिबिंब पडले पाहिजे ही जाणीव अलीकडची आहे.

पंत मनाने या स्थित्यंतरापासून दूर होते हे स्पष्ट होते. पंतांनी भक्तीचा हेतू समोर ठेवून काव्यरचना केली. ही भक्ती चार–चौघांच्या प्रामुख्याने पंडितांच्या नजरेत भरावी असा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. त्याचा परिणाम संस्कृत कवितेच्या वळणाने ती निर्माण झाली. संस्कृत प्रचुरतेमुळे ती पंडितात लोकप्रिय झाली, पण सामान्य मराठी मनापासून दूर गेली. रामायणाच्या विविध रचनेमुळे त्यांच्या वृत्तीची उपक्रमशीलता प्रकट झाली, ती कौतुकाचा विषय झाली, पण ती सामान्य मराठी मनाशी जिव्हाळ्याचे व जवळचे संबंध जोडू शकली नाही. व सामान्य जनासाठी निर्माण झालेली प्रारंभीची आख्यानक कविता ही सामान्यांना दूरावली.

या पंडिती परंपरेचे मोरोपंत हे शेवटचे वारसदार होत. रत्नागिरी जिल्ह्यातील सौंदळ हे मोरोपंतांचे मूळ गाव. कोल्हापूर दरबारात पंतांचे वडील रामचंद्रपंत यांना नोकरी मिळाल्याने पन्हाळगडच्या त्या वेळी राजधानी असलेल्या गावी ते राहावयास आले. येथेच पंतांचा सन १७२९ मध्ये जन्म झाला. पुढे रामचंद्रपंतांनी पन्हाळगड सोडले व ते बारामती येथे राहावयास आले. येथील बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे जावई जहागीरदार बाबूजी नाईक यांच्याकडे त्यांनी नोकरी पत्करली. यांच्या घरीच सालीना ५००

रुपयांवर पंतांनी पुराण सांगण्याची कामगिरी पत्करली. तेथेच ते शेवटपर्यंत होते.

मोरोपंत धर्मनिष्ठ, शान्त वृत्तीचे गृहस्थ होते. पुराण सांगणे व काव्य निर्माण करणे याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कार्यात त्यांनी लक्ष घातले नाही. त्यामुळे त्यांचे जीवन अत्यंत निर्वेध, प्रक्षोभखळबळरहित असेच होते. मानसिक स्वास्थ्य लाभल्यामुळेच पंतांनी विपुल अशी ग्रंथरचना केली. काशीयात्रेस पंत गेले असता तेथील पंडितांनाही त्यांची रचना आवडली. इ. स. १७८४ साली पंत कैलासवासी झाले. आयुष्याच्या अखेरीपर्यंत पंत अव्याहत काव्यरचना करीत होते.

**इ. स. १८५२–१७६१**—पंतांच्या काव्यलेखनाचे एकूण चार कालखंड विद्वान मानतात. कुशलवाख्यान ही पंतांची पहिली रचना होय. ब्रह्मोत्तर खंड-रचना ही याच काळातील होय. कृष्ण-विजयाचा पूर्वार्ध या वेळी त्यांनी लिहिला. सार रामायण, प्रल्हादविजय, व इतर पौराणिक स्फुट आख्यानांची रचना त्यांनी केली. संस्कृतातील महाकाव्याचा आदर्श या वेळी त्यांच्यासमोर होता.

**इ. स. १७६२–१७७२**—या कालखंडात पंतांनी कृष्ण-विजयाचा उत्तरार्ध पूर्ण केला. केकावली, संशय रत्नमाला, काही स्फुट आख्याने, निरोष्ठ व संकेत रामायण, यांचीही रचना याच काळात झालेली असून, सीतागीत, रुक्मिणीगीत व सावित्रीगीत ही ओवीबद्ध स्त्रीगीते निर्माण केली. या काळातील लेखनात शब्दचमत्कृतीचा हव्यास, पांडित्य प्रदर्शनाची हौस दिसून येते.

**इ. स. १७७३–१७८२**—या काळात पंतांनी महत्त्वाची रचना केलेली दिसते. महाभारताची १७ हजार ओळींची रचना पंतांनी याच काळात केली. मंत्र भागवत, दशमस्कंध, वामनचरित्र, अमृतमंथन अशी सुंदर प्रकरणे या वेळीं लिहून झाली. भारत रचनेत पंतांच्या प्रतिभेचा पूर्ण विकसित विलास बघावयास मिळतो. या दृष्टीने पंताच्या लेखनात या कालखंडाचे विशेष महत्त्व आहे.

**इ. स. १७८३–१७९३**—या कालखंडात संकीर्ण १०८ रामायणे त्यांनी लिहिली. श्लोक केकावली, काशी-यात्रा प्रकरण, काही स्तोत्रे, संत स्तवने अशी संकीर्ण रचना त्यांनी केली.

७३९२९ chicति
९९७७ ५।३।७७



पंतांच्या आर्याभारताने मराठी सारस्वतात महत्त्वाची भर घातली आहे. या ग्रंथाने मराठीतल्या अनेक अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले. मराठीतील सर्वश्रेष्ठ कवी म्हणून त्यांचा काहींनी गौरव केला, तर काहींना पंत हे कवीच नव्हेत असेही वाटले. पंत हे उद्यमशील प्रकृतीचे पंडित होते. अलौकिक काव्यगुण त्यांच्या रचनेतून दिसणार नाहीत. त्यांच्या शब्द-संक्षेपांमुळे असेल कदाचित पण रम्य कल्पनाविलास व रसवत्ता पंतांच्या काव्यात कमी आहे. शब्दालंकारांची पंतांनी इतकी कसरत केली आहे की, त्यामुळे ग्राम्यता, क्लिष्टता, दुर्बोधता, दूरान्वय, रसहानिकारक उपमा-दृष्टान्त, इत्यादी दोष निर्माण झाले आहेत. महाभारत, रामायण, भागवत या ग्रंथांतील कथा मराठीत आकर्षक शैलीने निवेदण्याचे महत्त्वाचे कार्य पंतांनी केले. त्यांच्या लेखनात काही दोष निश्चितच आहेत, तरीही कथा रंजक करून सांगण्याची पंतांची पद्धती असल्याने त्यांची आख्यानक रचना आकर्षक झाली आहे. सूक्ष्म, तरल भावाविष्कार त्यांच्या रचनेतून कमी प्रमाणात होत असला तरी मानवी मनाचे विविध धर्म, त्या त्या पात्रांची स्वभावचित्रे रंगविण्याची कलात्मक जाणीव, संवादरूपाने कथानकाला दिलेली गती व त्यातूनच पात्रांचे केलेले स्वभावलेखन, कथानकाशी सुसंगत अशी वातावरणाची निर्मिती, नाट्यात्मकता व रचनाचातुर्य इत्यादी गुण पंतांच्या आख्यानात प्रकट झाले आहेत.

आख्यानक कवी म्हणून पंतांना लाभलेले यश फार मोठे असून, मराठी कवितेत त्यांनी स्वतः असे वेगळे वैशिष्ट्य प्रकट केले आहे. मराठी कवितेत स्वतंत्र परंपरा निर्माण करणारे कवी म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. पंतांच्या कवितेचा मराठी कवितेवर व भाषेवर निश्चित असा परिणाम झाला. या परिणामाच्या खुणा अभ्यासण्याचा प्रयत्न झाला तर मराठी पद्यातील पंतांचे स्थान किती मोठे व महत्त्वाचे आहे याची कल्पना येईल.

पंतांच्या वनपर्वातील हे शेवटले आख्यान आहे. द्रौपदीला धरून नेले असता तिचा कौरवांकडून अनन्वित प्रकारचा छळ होतो. द्रौपदीला सोडवून आणल्यानंतर, मार्कंडेय पांडवांना राम–सीतेची कथा सांगतात. व यानंतर मार्कंडेयाला द्रौपदीसारखी पतिव्रता तुम्ही पाहिली काय? असा प्रश्न धर्म विचारतो. त्यावर मार्कंडेय ही कथा सांगतात. येथे पंतांनी मूळ भारतातील कथानकात बदल केलेला नाही. पंतांचे अत्यंत लोकप्रिय आख्यान म्हणून

९५५६०

याचा उल्लेख करावा लागेल. आख्यानाचे सारे विशेष पंतांनी येथे प्रकट केले असून शब्दसंक्षेपामुळे कथावस्तू बांधीव, रेखीव झाली आहे.

मद्रदेशाचा राजा अश्वपती याची सावित्री या नावाची कन्या होती. ती उपवर झाली तरी तिला कोणीही मागणी घातली नव्हती. याची चिंता राजाला लागली होती. अश्वपती तिला वरसंशोधन करावयास सांगतो. वडिलांच्या आज्ञेने सावित्री मंत्री व सेविका यांच्यासह वर शोधण्यास निघते. अनुरूप असा द्युमत्सेन राजाचा मुलगा सत्यवान वर म्हणून ती निश्चित करते व वडिलांकडे परत येते. त्या वेळीं तेथे नारदमुनी आलेले असतात. अश्वपती तिला 'वर शोधून आलीस काय ?' असा प्रश्न विचारतो. तेव्हा ती सत्यवानाचे नाव सांगते. नारद 'हा तुला योग्य वर नव्हे' असे सांगतात. अश्वपती त्याला कारण विचारतो, तेव्हा 'सत्यवानाला एका वर्षाच्या आत मरण येईल' असे सांगतात. अश्वपती व नारद तिला तिच्या निश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. त्यात त्यांना यश येत नाही. अश्वपती सावित्रीचा सत्यवानाशी विवाह लावून देतात.

सावित्री वनात सत्यवान श्वश्रू, श्वशुर यांच्या समवेत राहते. तिची सेवापरायण वृत्ती व पतिनिष्ठा पाहून त्या वनात राहात असलेल्या ऋषिमुनींना आनंद होतो. वर्षाचे चार दिवस उरले असता पतीला वाचविण्याकरिता ती पण करते. तिचा सासरा तिला व्रताचे दिवस पूर्ण झाल्यावर पारणे फेडण्याविषयी सांगतो. ती सायंकाळी पारणे फेरीन असे म्हणते. त्या दिवशी सत्यवान अरण्यास जावयास निघतो. सावित्री त्याच्याबरोबर वनात जाण्याची इच्छा प्रकट करिते. सत्यवान 'तिला वनातील मार्ग बिकट, काटेरी असतात; तुला ते सोसवणार नाहीत' असे सांगतो. तरीही यायचेच असेल तर सासू-सासऱ्यांची आज्ञा घे व मग ये असे सुचवितो. ती त्यांची परवानगी मिळविते. दोघे वनात जातात.

वनात सत्यवान फळांनी पात्रे भरतो. लाकडे तोडू लागतो. या वेळी सावित्रीला नारदाचे शब्द आठवतात. ती सत्यवानाला "तुम्ही श्रमला असाल, तुम्हाला बुद्धिभ्रम झाला असेल. तुम्ही आता लाकूड तोडू नका" असे सांगते. तोही "स्मरण नाहीसा करण्याच्या वेदना" होत असल्याचे सांगतो व तिच्या मृदू व कोमल मांडीवर डोके ठेवून झोपण्याची इच्छा प्रकट

करतो. आपल्या मांडीवर त्याचे डोके घेऊन ती त्याचे डोके दाबते. इतक्यात हातात मृत्युपाश घेतलेला यम तेथे येतो. सावित्री पतीचे डोके जमिनीवर ठेवून यमाला नमस्कार करून, आपण दर्शन देऊन मला धन्य केले असे म्हणते. यम तिला तेथे येण्याचे कारण सांगतो, व सत्यवानाचे प्राण घेऊन निघतो. सावित्रीही त्याच्या मागोमाग वाटचाल करू लागते. यम तिला परत फिरण्यास व पतीची उत्तरक्रिया करण्यास सांगतो, सावित्री त्याच्याशी मधुर वाणीने बोलते व आपले पतिकर्तव्य सांगते. तिच्या बोलण्यावर यम संतुष्ट होतो व तिला वर मागण्यास सांगतो. पहिल्या वराने सासऱ्यास दृष्टी, दुसऱ्याने सासऱ्याचे गेलेले राज्य, तिसऱ्या वराने स्वपित्याला शंभर औरस पुत्र मागते. तरीही यमाच्या मागोमाग ती जातच असते. यम तिला चवथा वर माग म्हणून सांगतो. ती “ वत्से, तुज हो सुत-शत ” असा वर द्या म्हणते. यम तिला “ तथास्तु ” म्हणतो. सावित्री संतांची वाणी खोटी ठरत नाही, असे म्हणते; व त्याचा आशीर्वाद सत्य ठरावा याकरिता सत्यवानाचे प्राण परत मागते. यम तिच्यावर संतुष्ट होतो. “ हा तुझा पती मी मोकळा केला. तो चारशे वर्षे जगेल.” असा वर देऊन निघून जातो. यम गेल्यावर आपल्या पतीचे डोके मांडीवर घेऊन सावित्री बसते. सत्यवान जागा होतो. सत्यवान तिला “ मी झोपलो होतो त्या वेळी एक पुरुष मला ओढीत होता. तो कोण ? ” असे विचारतो, व सावित्री “ मी उद्या सांगेन. आपण आता घरी जाऊ.” असे म्हणून त्यासमवेत घरी परत येते.

पंतांनी मूळ महाभारतातील कथावस्तूत फारसा फरक केलेला नाही. मूळातील प्रसंग संक्षेपाने सांगितलेले आहेत. संपूर्ण आख्यानातील कथानक ओघवते वर्णिलेले असून, मोरोपंताच्या क्लिष्टतेचा येथे अभाव जाणवतो. राजा व नारद यांनी सावित्रीच्या मतपरिवर्तनाचा केलेला प्रयत्न व सावित्रीचा दृढनिश्चय हा प्रसंग पंतांनी धावत्या शैलीत रंगविला आहे. येथील सावित्रीच्या निश्चयी उत्तराने कथानकाच्या वातावरणनिर्मितीत रसपोषक अशी भर पडली असून सावित्रीच्या स्वभावातील वैशिष्ट्य व्यक्त केले आहे.

काही प्रसंगांचा संक्षेप करून पंतांनी केन्द्रबिंदू असलेल्या घटनेला प्रमुख स्थान दिले आहे. सावित्रीच्या लग्नाचा प्रसंग पंतांनी केवळ एका ओळीत

वर्णन केला आहे. हा प्रसंग गौण आहे याची जाणीव पंतांनी ठेविलेली आहे. अरण्यातील ऋषींचे विस्तारपूर्वक वर्णन न देता केवळ सावित्री-विषयीची त्यांची मते देऊन पंतांनी कलात्मता साधली आहे; अनावश्यक घटनांचा असा संक्षेप करून मूळ कथेवरील लक्ष पंतांनी ढळू दिले नाही. या आख्यानाचा आणखी एक विशेष म्हणजे यातील संवादरचना हा होय. संवादातून कथानकाची गतीही वाढली पाहिजे, तिला खंड पडता कामा नये. पंतांनी यम–सावित्रीचा संवाद सुंदर रीतीने घडवून आणला आहे. येथील कथाभाग ओघवता ठेवण्यात व स्वभावरेखन उठावदार करण्यास संवादांचा उपयोग करून घेण्यात पंतांचे रचनाकौशल्य दिसून येते.

पंतांची ही रचना अत्यंत सुबोध उतरली आहे. सावित्रीच्या व्यक्ति-चित्रणात विविध रंग ओतले आहेत. भारतीय स्त्रीची परंपरा, तिचा दृढ निश्चय, तिचे स्वतंत्र विचारवैभव, सेवापरायणता, पतिनिष्ठा, यमाशी केलेल्या संभाषणातील तिची विनम्रता व चातुर्य– या विविध वैशिष्ट्यांनी सावित्रीचे उठावदार चित्र पंतांनी काढले आहे.

९५५६०
REFBK-0015570
REFBK-0015570
६३०२० ५१००१ २०६१ ४१३१६१